


म. ग्रं. सं. ठाणें
विषय जिल्हा
सं. क्र. ५५४५

REFBK-0006125

रजि. नं. १५२
ता. नं. १००७३२

नवें लेणें

रु. २—०—०

आत्माराम प्रिंटींग प्रेस, खारीवाव, बडोदें


# नवें लेणें

(उत्कृष्ट मराठी ललितनिबंधांचा प्रातिनिधिक संग्रह)

संपादक :
सौ० कमलाबाई टिळक
रामचंद्र रावजी नातू
पुरुषोत्तम आत्माराम चित्रे

REFBK-0006125

" जीवन ... ाहित्य "



मुद्रक व प्रकाशक: पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.,
आत्माराम प्रिंटिंग प्रेस, खारीबाव, बडोदें.
ता. ७-१२-४१

# निवेदन

'ललित-निबंध' या वाङ्मयप्रकारानें महाराष्ट्रशारदेच्या आभरणांत एका बहुमोल 'नव्या लेण्या'ची भर टाकली आहे यांत शंका नाहीं. गेल्या सुमारें पंधरा वर्षांत या वाङ्मयप्रकारांत नांव घेण्याजोगी जी निर्मिति झाली तिची निवड, वैचित्र्य व प्रातिनिधिकता यांची दृष्टी राखून, प्रस्तुत संग्रहांत आम्ही केली आहे.

अनेक कारणांमुळें अजूनही कांहीं चांगले ललितनिबंधकार या संग्रहांत येऊं शकले नाहींत याची आम्हांला जाणीव आहे. वाचकांना प्रस्तुतचा प्रयत्न स्वागतार्ह वाटला तर लवकरच 'नवें लेणें–दुसरा खंड' प्रकाशित करून ही उणीव भरून काढण्याचा विचार आहे.

प्रस्तुत संग्रहांतील निबंधांचा अनुक्रम हा कोणत्याही उच्चकनिष्ठतेचा दर्शक समजण्यांत येऊं नये. लेखकाच्या अनुमतीची सुलभता हीही बाब संग्रहाची छपाई चालु असतांना आम्हांला ध्यानीं घ्यावी लागली ही एकच गोष्ट आमच्या विधानाचें अंशतः स्पष्टीकरण करूं शकेल. नाहींतरी, वाचकांशीं संभाषणाचा मेवा लुटण्यास निघालेल्या ललितनिबंधलेखकांच्या या वर्तुळपरिषदेंत लहानथोर कसे ठरविणार ?

छपाईच्या महर्गतेच्या या काळांत आमच्या या धाडशी योजनेची फलद्रुपता बव्हंशीं लेखकमित्रांच्या सहकार्यानेंच शक्य झाली आहे. तेव्हां त्यांच्याबद्दल प्रथम कृतज्ञता व्यक्त करणें अवश्य आहे.

ज्या बडोदें वाङ्मयपरिषदेच्या ८ व्या अधिवेशनप्रसंगीं हा संग्रह प्रसिद्ध होत आहे, त्याचे स्वागताध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण सखाराम भावे यांच्याच प्रोत्साहनानें हें कार्य आम्हीं शिरावर घेतलें. कार्यव्यापृततेमुळें प्रो. वि. द. साळगांवकर संपादनांत प्रत्यक्ष सहाय्य करूं शकले नाहींत, पण त्यांच्या बहुमोल सूचना फार उपयोगी पडल्या. माझे रसिक सहकारी सौ. कमलाबाई टिळक व श्री. रामचंद्र रावजी नातू यांच्या निरलस परिश्रमांचें प्रत्यंतर तर या संग्रहाच्या पानापानांतून येतेंच आहे. प्रो. ना. सी. फडके यांनीं आपल्या मार्मिक व सुंदर प्रस्तावनेनें मराठी टीकावाङ्मयांत एका अधिकारी प्रबंधाचीच भर घातली आहे.

या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

बडोदें, ता. ६–१२–४१. } पु. आ. चित्रे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना—ना. सी. फडके | ....१–१० |
| १. | पत्रें–ना. सी. फडके | .... १ |
| २. | पळण्याची कला–अनंत काणेकर | .... ६ |
| ३. | अर्पण-पत्रिका–वि. स. खांडेकर | .... ९ |
| ४. | मी न वाचलेले कांहीं ग्रंथकार –ग. त्र्यं. माडखोलकर | .... १३ |
| ५. | उडाणटप्पू–वि. ल. बरवे | .... १८ |
| ६. | एकेकाची तऱ्हा–वि. पां. दांडेकर | .... २३ |
| ७. | माध्याह्न–कुसुमावती देशपांडे | .... २९ |
| ८. | खोटीं नाणीं–र. गो. सरदेसाई | .... ३४ |
| ९. | जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें!–श्री. स. भावे | .... ४१ |
| १०. | आवड-निवड–वि. द. साळगांवकर | .... ४७ |
| ११. | मनमोकळेपणा–गं. भा. निरंतर | .... ५६ |
| १२. | झोंप–रा. रा. नातू | .... ६० |
| १३. | बिनसलेले बेत–वा. भा. पाठक | .... ६७ |
| १४. | डायरी–कमल दीक्षित | .... ७० |
| १५. | उद्यां मेलों तर?–य. गो. जोशी | .... ७५ |
| १६. | बोलके चेहरे–व्यं. रा. वनमाली | .... ८२ |
| १७. | दुसऱ्याला दिलेलीं पुस्तकें– शंकर साटे | .... ८७ |
| १८. | फुकट आइस्क्रीम–ज. वा. भिडे | .... ९० |
| १९. | आजारीपणाचं सुख–ना. मा. सन्त | .... ९५ |
| २०. | श्रेष्ठ पोरकटपणा–वा. वि. जोशी | .... १०० |
| २१. | लॉरेटा यंग आणि विवेकानंद–प. मा. टोळे | .... १०४ |
| २२. | उद्यां–स. वि. देशपांडे | .... ११० |
| २३. | उपयुक्ततेचे अभिमानी–दीनानाथ तवकर | .... ११२ |
| २४. | एक भावाञ्जली–पु. आ. चित्रे | .... ११६ |

# प्रस्तावना

(सर्व हक्क स्वाधीन)

"ज्याच्या येण्यापेक्षां जाण्याचीच आपण अधिक वाट पाहतों तो पाहुणा" अशी व्याख्या रूढ व्हावी इतकी ह्या जातीची बदनामी साहित्यिकांनीं केलेली आढळते. विनोदनिर्मितीच्या सोयीपुरता हा संकेत खरा मानायला हरकत नाहीं. परंतु खरी गोष्ट सांगावयाची झाल्यास प्रत्येकजण अशी कबुली देईल कीं, कांहीं पाहुणे या संकेताला अपवाद असतात. ते घरीं यावेत अशी आपली तीव्र इच्छा असते, त्यांच्या वाटेकडे आपण डोळे लावून बसतों, त्यांचं येणं टळलं कीं काय अशा शंकेनं आपण अस्वस्थ होतों, अन् तेवढ्यांत त्यांचं येणं घडलं कीं आपण मनापासून आनंदून "किती वाट पाह्यली तुमची!" अशा उद्गारांनीं त्यांचं स्वागत करतों.

मला वाटतं, प्रस्तुत संग्रहाला अशा अपवादात्मक पाहुण्याची उपमा शोभेल. बऱ्यावाईट कशाहि लघुकथांच्या संग्रहांची व कादंबऱ्यांची मराठी वाचकांच्या घरीं नकोशी व्हावी इतकी वर्दळ चालू असतांना, अन् नव्या धर्तीचे वाचनीय, चटकदार निबंध नियतकालिकांतून विपुल प्रमाणावर लिहिले जात असतांना, ते लिहिणाऱ्या मंडळींच्या लिखाणांतून निवडलेल्या निबंधांचा प्रातिनिधिक संग्रह अजून कसा घरीं येत नाहीं असं रसिक वाचकांना खचित वाटायला लागलं असेल, व अशा संग्रहाची ते मनांतून वाटच पहात असतील. त्यांच्या प्रतीक्षेचा ताण या पुस्तकानं संपेल, व या संग्रहाचं मराठी वाचकां-कडून मनःपूर्वक स्वागत होईल याविषयीं मला शंका नाहीं.

मराठी साहित्यिकांच्या ठिकाणीं ज्ञानलालसा व पांडित्य यांची दिसते याहून अधिक वाढ झाली तर ती भाषेच्या उत्कर्षाला उपकारक ठरेल असं मीहि म्हणतों. तथापि, आजच्या साहित्याकडे बोट दाखवून 'पांडित्य लयाला गेलं, बुडालं, ठार झालं!' असा विलाप करण्याचं कांहीं प्रयोजन आहे असं मला वाटत नाहीं. कारण हा विलाप एका आभासांतून निर्माण झालेला दिसतो; व हा आभास उत्पन्न होतो याचं कारण इतकंच कीं विशेषतः गेल्या पंधरावीस वर्षांत लालित्यानें पांडित्याच्या क्षेत्रावर झपाट्यानं आक्रमण केलेलं आहे. विचार व भाषा यांच्या रूक्षतेचं व जडत्वाचं कौतुक कमी होत जाऊन आधुनिक मनाला आकर्षित करील अशा चापल्याचा, प्रवाहित्वाचा, अन्

नीटनेटकेपणाचा साज साहित्यावर चढूं लागलेला या पंधरावीस वर्षांत आपल्याला स्पष्टपणें दिसून येतो. या कालखंडांत मराठी कादंबरीचा थाट तर कल्पनेपलीकडे पालटला, व लालित्याचीं नवीं नवीं लेणीं लेखकांनीं या वाङ्मयप्रकारावर तर घातलींच, पण शिवाय पूर्वीं जो लेखनप्रकार लालित्याशीं कांहीं संबंध नसल्याप्रमाणें वावरत असे त्यालाहि चुचकारून आणून कलात्मक स्वरूप देण्याची कामगिरी नव्या शैलीच्या लेखकांनीं करून दाखविली. हा लेखनप्रकार म्हणजे ' निबंध. '

' निबंध ' या नांवानं साठ वर्षांपूर्वीं जो साहित्यप्रकार मराठींत ओळखला जात असे त्याचा इतका कायापालट झालेला आहे कीं, कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर आपल्यांत पुन्हां आले व त्यांच्या हातीं प्रस्तुत संग्रह दिला तर ते खचित चकित होतील आणि म्हणतील, " काय, हे निबंध म्हणतां ? अहो, या साऱ्यांची गोळाबेरीज केली तर माझ्या निबंधमालेचे दोन अंकदेखील पुरते भरायचे नाहींत ! " उलट. ज्यानं गेल्या पंधरा वर्षांतीलच मराठी गद्यसाहित्य वाचलं आहे अशा एखाद्या विद्यार्थ्यानं चिपळुणकरांच्या ' निबंध-माले 'चं वाचन प्रथमच सुरू केलं तर तोहि विस्मयानें म्हणेल, " मला जे निबंध माहित आहेत व आवडतात तसे हे नाहींत. यांना तुम्ही पांडित्यपूर्ण लेख म्हणा, पण निबंध ? ... छे ! "

चिपळुणकरांच्या काळांतले आम्हां मराठी लोकांच्या अंगावरचे लांब लांब अंगरखे हळुंहळूं लुप्त होऊन त्यांची जागा सुटसुटीत लांब्या कोटांनीं घेतली, त्याचप्रमाणें मराठी निबंधाचा पूर्वीचा विस्तार नाहींसा होऊन त्याला छोटेपणा आला हा मोठा फरक तर सहज कोणालाहि दिसण्यासारखा आहे. परंतु बाह्य स्वरूपांतील या फरकाहून निबंधाच्या अंतरंगांत व हेतूंतच जी क्रांति झाली ती अधिक महत्त्वाची आहे.

इंग्रजी निबंधाचा इतिहास चारशें वर्षांचा आहे. त्या मानानें मराठी निबंधाचा जेमतेम साठ वर्षांचा इतिहास किती अल्प ! त्यांत जुने मराठी निबंध व नवे असा भेद करणं चमत्कारिक दिसण्यासारखं आहे. परंतु तो भेद नाकबूल करतां येणार नाहीं. इंग्रजी साहित्याच्या अनुकरणानं आमच्या मराठी लेखकांनीं स्वतःची हानि करून घेतली असं जे विद्वान् प्रतिपादतात त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल मी शंका घेत नाहीं. परंतु त्यांची ती समजूत जरा तपासली पाहिजे असं मात्र मला म्हटलंच पाहिजे; व या बाबतींत ध्यानांत घेण्यासारखी जी एक गोष्ट मला वाटते ती ही कीं, इंग्रजी साहित्याच्या अभ्यासा-

मुळें त्या साहित्यांत जी आधुनिकता यावयास कित्येक पिढ्या लोटाव्या लागल्या ती आमच्या मराठी साहित्यांत अवघ्या वीस वर्षांत आम्ही आणूं शकलों. मराठी कादंबरीचा हरीभाऊ-आपटे-थाट किती झपाट्यानं मागं पडला, व लघुकथेचा उदय झाल्यापासून ती किती वेगानं वाढली, यांकडे तर माझ्या विधानाचीं उदाहरणं म्हणून बोट दाखवितां येईलच, पण मराठी निबंधाच्या स्वरूपांत जी क्रान्ति अवघ्या पंधरा वर्षांत झाली तिचा पुरावा सगळ्यांत महत्त्वाचा व मनोरंजक ठरेल. मराठी निबंधाचं वय साठ वर्षांचंच खरं, पण १९२५ च्या पूर्वींचे व त्यानंतरचे निबंध इतक्या भिन्न प्रकृतीचे आहेत कीं एकाला 'जुने' व दुसऱ्याला 'नवे' अशी विशेषणं देऊन त्यांची तुलना केल्यावांचून गत्यंतर नाहीं !

निबंधाची लांबी नाहींशी होऊन तो आकारानं लहान झाला त्यामुळें निबंधाची तऱ्हा बदलली असं नव्हे, तर निबंधाची प्रद्धतिच बदलली, त्यामागचा हेतूच बदलला म्हणून त्याचा विस्तार कमी झाला. म्हणजे निबंधाच्या आकारांत व भाषेंत–त्याच्या शरीरांत व वेषभूषेंत–जो फरक झाला आहे तो परिणामाच्या स्वरूपाचा आहे. त्याच्या बुडाशीं जी क्रांति आहे ती नीट लक्षांत घेतली पाहिजे; आणि ती क्रांति निबंधाच्या अंतरंगांतली आहे. चिपळुणकरांच्या अगर लोकमान्य टिळकांच्या एखाद्या निबंधाचे दहा तुकडे केल्यानं दहा 'लघु-निबंध' तयार होणार नाहींत. कारण ते निबंध केवळ विस्तारानं मोठे होते हा भिन्नतेचा खरा मुद्दाच नव्हे. जुन्या व नव्या मराठी निबंधांत खरा महत्त्वाचा फरक पडला आहे तो अंतरंगाचा !

जुन्या निबंधांचे प्रमुख गुण दोन होते: पांडित्य आणि लढाऊ वृत्ति. कोणत्या तरी एखाद्या मताचं मंडण अगर खंडण करण्यासाठीं निबंधकार लेखणी उचलीत असे, व त्यामुळें स्वतःच्या पांडित्याचं प्रदर्शन किती करूं अन् किती नको असं त्याला होऊन जाई. विवाद, स्वमतप्रतिपादन, परमतसंहार, अशा हेतूंनीं तो प्रेरित झालेला असे, व या हेतूला पोषक अशी जीं हत्यारं तो वापरी त्यांत पांडित्याला साहजिकच पहिलं स्थान त्याला द्यावं लागे. चिपळुणकर–आगरकरांपासून तों केळकर–खाडिलकरांच्या निबंधांपर्यंत समग्र निबंधलेखनाला हें विधान लागूं पडेल. केळकर–खाडिलकर यांचा उल्लेख मी मुद्दामच करतों आहे. कारण वर्तमानपत्रांतले 'अग्रलेख' व जुन्या जमान्यांतले 'निबंध' यांत कांहीं फरक नव्हता. शिवराम महादेव परांजपे यांच्या निबंधांत कल्पना-विलास मोठ्या प्रमाणांत आढळतो. परंतु भावनोत्कटता व वक्रोक्ति, व्याजोक्ति

इत्यादि अलंकारांच्या साहाय्यानं गद्यकाव्याच्या सरहद्दीपर्यंत येऊन थडकलेले त्यांचे " काळां " तील निबंध वगळले, तर १८८० पासून तों जवळजवळ १९२५ पर्यंत मराठी निबंधाला वृत्तपत्रीय अग्रलेखाचंच स्वरूप होतं. मतप्रचार हा त्याचा हेतु होता, पांडित्य हा त्याचा मुख्य गुण होता; आणि या कारणानंच तो विस्तारानं मोठा असे व त्याच्या हेतूला साजेल अशा भाषेनंच तो नटविला जात असे !

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी या स्थितींत बदल झाला. अगदींच भिन्न प्रकृतीच्या मराठी निबंधानं मराठी साहित्यांत पाऊल टाकलं. योग्य तो विनय न सोडतां मला असं म्हटलं पाहिजे कीं, "रत्नाकर" मासिकांत "गुजगोष्टी" या सदराखालीं जे निबंध मी लिहूं लागलों तोच मराठींतील आधुनिक स्वरूपाच्या निबंधांचा प्रारंभ म्हणावा लागेल. " गुजगोष्टी " या मथळयानं कांहीं लोक बिचकले. या गुजगोष्टींना ' निबंध ' म्हणतां येईल कीं काय याबद्दल कांहींनीं वादहि घातला. माझ्या ' गुजगोष्टीं ' च्याच धर्तीवर पण ' लघुनिबंध ' या नांवानं मोठेछोटे साहित्यिक लेखन करूं लागले. परंतु " गुजगोष्टी " या मीं योजिलेल्या नांवातल्या अभिप्रायाची छटा दृष्टीआड करतां येण्यासारखी नव्हती. अखेर सुमारें पांच वर्षांपूर्वी मीं एका व्याख्यानांत " ललितनिबंध " हें नांव सुचवून माझ्या पुस्तकांच्या यादींत तें वापरूंहि लागलों. तें नांव आतां सर्वमान्य झालेलं दिसतं. या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतां, मराठींतल्या नव्या तऱ्हेच्या निबंधांचा इतिहास अवघा पंधरा वर्षांचा आहे असंच म्हटलं पाहिजे. गेल्या पंधरावीस वर्षांच्या अवधींत लालित्यानं पांडित्यावर जें झपाट्यानं आक्रमण केलं त्याचं ' निबंध ' हें सर्वोत्कृष्ट उदाहरण समजतां येईल असं विधान वर एके ठिकाणीं मीं केलं तें आतां वाचकांना पूर्णपणें पटेल असं वाटतं.

आधुनिक थाटाचे मराठी निबंध विस्तारानं लहान असतात; परंतु त्यांची लघुता हें कांहीं त्यांचं खरं लक्षण नव्हे. तें लक्षण त्यांच्या अंतरंगांत आहे, व तें थोडक्यांत सांगायचं झाल्यास असं सांगतां येईल कीं पांडित्य-प्रदर्शनासाठीं ते लिहिले जात नाहींत !

पूर्वी निबंध वाचला जात असे तो त्यांतील पांडित्यासाठीं. निबंधाचा विषय वाचकाला महत्त्वाचा वाटे व म्हणून त्याकडे तो वळे. निबंधकार या व्यक्तीपेक्षां तो कोणत्या विषयाचं प्रतिपादन करतो याकडे वाचकाचं चित्त असे, व निबंध वाचतांनाहि वाचकाचं सारं अवधान विषयाकडेच असे. निबंधाची योग्यता त्याच्या विषयावरून ठरत असे. परंतु नव्या थाटाच्या

निबंधांत विषयाचं महत्त्व पार लयाला गेलं आहे. मतप्रचार व पांडित्यप्रदर्शन हे हेतूच सुटल्यामुळे निबंधांत विषयाची मातबरी आतां राहिलेली नाहीं. पूर्वी निबंधाच्या विषयांत वाचकांना गोडी वाटे, व म्हणून ते निबंध वाचीत. आतां निबंधकार या व्यक्तींत आपल्याला गोडी वाटते, व म्हणून आपण त्यानं लिहिलेले निबंध वाचतों. कसबी निबंधकाराला अमुक एका विषयाची गरज लागते असं नाहींच. आणि याचाच अर्थ असा कीं, आधुनिक ललित-निबंधाला विषयाची मर्यादा राहिलेली नाहीं. ज्या विषयाबद्दल लिहायचं त्याचं लेखकाला ज्ञान असलं पाहिजे असंदेखील बंधन नाहीं! कारण त्या विषया-बद्दल आपण किती घोर अज्ञानांत आहोंत याविषयींच तो अत्यंत आकर्षक व मार्मिक तऱ्हेनं बोलत राहिला तर? तोही एक ललितनिबंधच तयार होईल कीं! यावरून या आधुनिक थाटाच्या निबंधांत पांडित्याचा बडेजाव कसा बिलकुल उरलेला नाहीं तें पहा!

एखाद्या जलाशयाच्या कांठावर बसून आपण एक लहानसा दगड त्यांत टाकतों, व मग जलपृष्ठावर उठणारे तरंग पाहात रहातों, तद्वत् या आधुनिक निबंधप्रकारांत कोणत्याहि विषयाच्या निमित्तानं लेखकाच्या अंतरंगांत उठणाऱ्या विचारविकारतरंगांचं दर्शन घडावं, व त्या दर्शनापासून आल्हाद व्हावा एवढीच वाचकाची अपेक्षा असते. बोध अजिबात वर्ज्य असतो असं नव्हे; पण तो अभिप्रेत असलाच तरीसुद्धां फक्त ध्वनिरूपानंच तो प्रगट व्हायचा असतो. निबंधाचं मुख्य कार्य हें कीं, विषयापेक्षां विषयाच्या अनुषंगानं लेखकाच्या व्यक्तित्वाची, त्याच्या स्वभावाची, त्याच्या आवडीनिवडींची ओळख वाचकाला झाली पाहिजे. नाटक अगर कादंबरी लिहितांना लेखकानं स्वतः अप्रगट राहिलं पाहिजे असा जो संकेत आहे तो जुन्या थाटाच्या निबंधांत पाळला जात असे; याच्या उलट, निबंधाची आधुनिक कल्पना अशी कीं, तो लिहितांना लेखकानं पदोपदीं प्रगट व्हायला हवं. स्वतःविषयीं कलात्मक रीतीनं दुसऱ्याला जें जें म्हणून सांगतां येण्यासारखें असेल तें लेखकानं निबंधांत लिहावं अशी परवानगी आहे. इतकंच नव्हे तर, लेखकाचं हें आत्मकथन सौंदर्याचे नियम न मोडतां जितकं निःसंकोच असेल तितका त्याच्या निबंधाचा सरसपणा वाढेल! म्हणजे अंतरंगांतल्या मित्रमंडळीशीं गप्पा मारतांना जो मनमोकळेपणा आपण स्वीकारतों तो स्वीकारून निबंधकारानं लिहिलं पाहिजे. अर्थात् आधुनिक निबंध हा पुष्कळ अंशीं संभाषणाच्या स्वरूपाचा असून सुहृद्भाव हा त्याचा आत्मा होय. ही गोष्ट सूचित करण्यासाठींच

' रत्नाकर ' मासिकांत मीं जेव्हां या नव्या धर्तीचे निबंध लिहिण्यास प्रारंभ केला तेव्हां त्यांना ' गुजगोष्टी ' असं नांव दिलं.

सारा संकोच सोडून केलेलं आत्मनिवेदन हें निबंधाचं मुख्य लक्षण मानल्यावर निबंधाचे विषय, भाषाशैली, विस्तार आणि रचना इत्यादि गोष्टींचा निर्णय आपोआपच होतो. ज्या विषयाच्या निमित्तानं लेखकाला आपल्या अंतरंगाची एखादी मनोरंजक बाजू वाचकांना दाखवितां येईल असा कोणताही विषय आधुनिक निबंधाला चालतो. अर्थात् विषयाच्या वैचित्र्याच्या दृष्टीनं आधुनिक निबंधाला कसली मर्यादाच नाहीं. अथवा मर्यादा सांगायचीच झाली तर अशी कीं, जो सामान्य दृष्टीला क्षुद्र वाटेल असा विषय निबंधकारानं घ्यावा असं म्हणतां येईल. कारण निबंधाच्या मथळ्यांत सूचित होणारा विषय जितका अधिक क्षुद्र, आणि ' हा लेखक या विषयाबद्दल काय लिहिणार बुवा ! ' असा मथळा वाचतांच वाचकाच्या मनांत उद्‌भवणारी शंका जितकी जोराची, तितका चमत्कृतीचा भाग अधिक असणार, आणि त्या क्षुद्र विषयांतहि निबंध-लेखकानं कांहींतरी महत्त्वाचा आशय उभा केला, कीं वाचकाला होणारा आल्हादहि अधिक असणार हें उघड आहे !

निबंधाचं स्वरूप आत्मनिवेदनपर असलं पाहिजे यांत शंकाच नाहीं. तथापि, लेखकाच्या या आत्मनिवेदनाकडे सत्यार्थानं पहाणं म्हणजे रसिकतेचा घात करण्यासारखं आहे. त्या त्या लेखकांचे ललितनिबंध म्हणजे ' परमेश्वर-साक्ष खरं सांगतों ' असं म्हणून त्यांनीं दिलेल्या आपल्या पापपुण्यांच्या जबान्या होत अशी मराठी वाचकांनीं क्वचित् समजूत करून घेतलेली मला आढळते, म्हणून त्याविरुद्ध इशारा वेळींच दिला पाहिजे असें मला वाटतं. सत्याभास हा कलाकृतीचा आत्मा होय ही गोष्ट आधुनिक थाटाच्या आत्मकथनपर निबंधांच्या बाबतींत नीट लक्ष्यांत ठेवली पाहिजे. ' धूम्रवलयें ' या माझ्या पुस्तकांतील निबंधांच्या आधारानं मी कशा तऱ्हेचा मनुष्य असेन तें निश्चित करण्याचा एका लेखकानं केलेला प्रयत्न माझ्या नुक्ताच पाहण्यांत आला. ललित-निबंधांची अशी चिरफाड होऊं लागली तर ते लिहिण्याची सोयच उरणार नाहीं ! निबंधांतील आत्मकथन जितकं सत्याला धरून असतं तितकंच केवळ गमतीखातर कल्पिलेलं व सत्याभास निर्माण होईल अशा शैलीनं पुढें मांडलेलं असतं. ' मीं दुकानदाराला खोटी पावली देऊन फसविलं ', ' मला एक अतिशय कुरूप मुलगी भेटली ', ' माझं आणि माझ्या बायकोचं त्या दिवशीं खडाजंगी भांडण झालं ' असलीं निबंधांतलीं विधानं सत्यार्थानं घ्यावयाचीं नसतात.

ललितनिबंध म्हणजे आत्मनिवेदनाचा प्रकार खरा,परंतु स्वतःच्या चरित्राची नोंद करण्याच्या वृत्तीनं लेखक तो निबंध लिहीत नाहीं. त्यांतील आत्मकथनाला सत्यापेक्षां सत्याभासाचाच मुलामा तो अधिक चढवीत असतो.

पांडित्याचा अभाव आणि संकोचाचा अभाव हे जसे आधुनिक निबंधाचे विशेष समजले पाहिजेत त्याप्रमाणेंच रचनेचा अभाव हादेखील त्याचा विशिष्ट गुण मानण्यांत येतो. मनमोकळ्या संभाषणाच्या आविर्भावानं निबंध लिहावयाचा असं म्हटलं, कीं पूर्वपक्ष-उत्तरपक्ष, मुद्दे-प्रतिमुद्दे, प्रमाण-प्रतिप्रमाण इत्यादि जुन्या निबंधाच्या रचनेचीं अंगं अयुक्त ठरलींच. अमुक एक सिद्धांत सिद्ध करण्याचा हेतूच संपल्यावर पद्धतशीर मांडणीची अथवा बंदिस्तपणाची आवश्यकता राहणार कशी ? मित्रांशीं नर्मभाषण करतांना आपण काय त्याची अवधानपूर्वक रचना करतों ? बोलण्यावरून बोलणं सुचतं अन् तें सुचेल त्या क्रमानं आपण बोलत जातों, नव्हे काय ? मधेंच एखादी गोष्ट पाल्हाळानं सांगावी, मधेंच एखादा दाखला केवळ सूचित करावा, आपल्या म्हणण्याला आधार सांगतांना स्मरणानं दगा दिला तरी ' अमक्या त्या ह्यानं म्हटलं आहे ना ! ' असं म्हणण्यांत दूषण मानूं नये, क्वचित् विषयांतरहि करावं—अशा थाटानंच स्नेह्या-सोबत्यांत आपण बोलत असतों कीं नाहीं ? मग निबंध याच थाटानं लिहायचा म्हटल्यावर रचनेच्या कौशल्याचा प्रश्न आजिबात गौण ठरावा हें क्रमप्राप्तच होय. इतकंच काय, याहिपुढें जाऊन असं म्हणण्याचा मोह होतो कीं, आधुनिक थाटाच्या निबंधाला रचनेची खटपट घातुक ठरेल. या निबंधाला काव्यमय उद्गाराचीच उपमा साजण्यासारखी आहे; व ज्याप्रमाणें काव्योद्गार जितका सहज तितका सुंदर, त्याप्रमाणेंच निबंधहि जितका विस्कळित व सहज असेल तितकी त्याची मनोज्ञता वाढेल. ताजेपणा आणि मुग्धपणा हे निबंधाचे प्राण-भूत गुण आहेत; आणि रचनेच्या खटाटोपानं त्याला शोभा येण्याऐवजीं त्याचा मुग्धपणा व टवटवी मात्र नष्ट होईल. कृत्रिम प्रसाधनांनीं नटलेल्या व वस्त्रा-लंकारांची काळजीपूर्वक रचना करून पुढें येणाऱ्या नटीपेक्षां, घर्मबिंदूंनीं व भुरुभुरु उडणाऱ्या केसांनीं जिचं मुखमंडल शोभिवंत दिसत आहे व आपण कुणाच्या दृष्टीस पडत आहोंत याचं भानही जिला नाहीं, अशा शेतांतल्या माचीवर उन्हांत उभं राहून पांखरं हांकणाऱ्या किशोरीसारखं आधुनिक निबंधाचं सौंदर्य असलं पाहिजे. रचनेची ठाकठिकी त्यांत नसावी हेंच योग्य !

मात्र ' रचनेची खटपट असूं नये ' असं म्हणण्याऐवजीं ' रचनेची खटपट त्यांत दिसूं नये ' असं म्हणणं सत्याला अधिक धरून होईल असं मला

वाटतं; आणि म्हणून निबंधाच्या आत्मनिवेदनशीलत्वाबद्दल जसा मीं इशारा दिला तसाच या बाबतींतही मी देऊं इच्छितों. होतकरू लेखकांची दिशाभूल झालेली मला अनेक वेळां दिसते म्हणून.

जुन्या पांडित्यप्रचुर खंडण-मंडणात्मक निबंधांत सुसंगत बंदिस्त रचनेची आवश्यकता होती तशी ललितनिबंधाला नाहीं हें निर्विवाद. तथापि ललित-निबंधाच्या लेखकानं रचनेची बिलकूल फिकीर करायला नको अशी समजूत करून घेणं वेडेपणाचं ठरेल. कोणत्याहि कलाकृतीचं लक्षण असं सांगतां येईल कीं, ती दिसायला सोपी पण करायला तितकीच कठीण असते. ती प्रयत्नानंच साध्य केलेली असते, परंतु तिच्यामागचा प्रयत्न पाहाणाराच्या ध्यानांत येऊं नये अशा प्रकारें सफाईनं लपविलेला असतो. हा सामान्य नियम ललितनिबंधाच्या बाबतींतही लक्ष्यांत ठेवला पाहिजे. सहजस्फूर्त संभाषणाच्या थाटानं ललित-निबंध प्रगट झाला पाहिजे हें तर खरंच, आणि बंदिस्तपणाऐवजीं विस्कळीत-पणाच त्याची शोभा वाढवितो हेंहि खरंच; तथापि हा विस्कळीतपणादेखील हेतुपूर्वक प्रयत्नानं साधायचा असतो हें विसरतां कामा नये. आपली बसायची खोली सजविण्याचे दोन प्रकार आहेत. त्यांतला एक असा कीं, एखादी गौर मांडावी त्याप्रमाणें खोलींतल्या साऱ्या वस्तू अगदीं रेखीव तऱ्हेनं मांडायच्या; आणि दुसरा असा कीं, खोलींतल्या वस्तू मुद्दाम मांडल्या नसून सहजगत्या त्या त्या ठिकाणीं पडल्या आहेत असा पहाणाराला भास होईल अशा तऱ्हेनं त्या ठेवायच्या. ललितनिबंधाची सजावट या दुसऱ्या प्रकारची समजली पाहिजे. रचनेचा त्यांत सर्वस्वीं अभाव असतो असं नसून त्याची रचना—म्हणजे त्याचा प्रारंभ, विस्तार, शेवट इत्यादि गोष्टी—सहजासहजीं साधल्या आहेत असं वाचणाराला वाटेल अशा सफाईनं तो लिहावयाचा असतो. हॅम्लेटच्या वेडांतहि पद्धति होती, त्याप्रमाणें ललितनिबंधाच्या विस्कळीतपणांतहि लेखकाची योजकता आणि कल्पकता असावीच लागते. ज्यांनीं हा वाङ्मयप्रकार हाताळण्यांत विशेष यश संपादन केलें आहे अशा लेखकांच्या उत्कृष्ट निबंधांचा सूक्ष्म दृष्टीनं अभ्यास केल्यास वाचकांना माझं म्हणणं पटल्यावांचून राहणार नाहीं. ललित-निबंधांतील रचनेचा अभाव म्हणजे खराखुरा अभाव नव्हे तर अभावाचा कलात्मक आभास होय.

ललितनिबंधांत पांडित्याचा अभाव असतो याचा तरी खरा अर्थ काय असा प्रश्न विचारायला आतां हरकत नाहीं. आणि वरील विवेचनाच्या साहाय्यानं या प्रश्नाचा विचार केल्यास आपल्याला असंच उत्तर द्यावं लागेल कीं, हा

पांडित्याचा अभावदेखील कौशल्यानं निर्माण केलेला आभासच असतो. ललित-निबंध म्हणजे संभाषण खरंच, परंतु ती कांहीं मूर्खांची बडबड नव्हे. त्यांत सहजता तशीच मार्मिकताहि असावी लागते. तें ऐकतांना एखाद्या जाड्या विद्वानाचं प्रवचन आपण ऐकत आहोंत असं वाटून वाचक कुठेंहि बिचकतां कामा नये; परंतु त्याबरोबरच वाचकाला असंहि सतत वाटत राहिलं पाहिजे कीं ज्याच्या अनुभवाचा विस्तार फार मोठा आहे, ज्यानं मानवी व्यवहाराचे नाना रंगढंग पाहिले व ओळखले आहेत, ज्यानं सत्कृत्यं केलीं आहेत अन् चुकाहि केल्या आहेत, ज्यानं जगरहाटीकडे रसिकाच्या दृष्टीनं पाहिलं आहे अशा बहुश्रुत मर्मज्ञाचं मधुर आर्जवी भाषण आपण ऐकत आहोंत.

तेव्हां ललितनिबंधांत पांडित्य नसावं याचा अर्थ तो लिहिणाराच्या ठिकाणीं पांडित्य नसावं असा करतां कामा नये. निबंध लिहिणारा पंडित असलाच पाहिजे; एवढंच कीं निबंधाच्या मिषानें वाचकांशीं बोलतांना पांडित्याच्या उंच पायरीवरून बोलण्याऐवजीं अगदीं सामान्य माणसांत मिसळून हितगुज केल्याप्रमाणें त्यानं बोललं पाहिजे. निबंध लिहिणाराच्या अंगीं जितकं पांडित्य अधिक आणि हा कोणी आपल्याहून फार वरिष्ठ कोटींतला प्राणी नसून आपल्यांतलाच एक साधासुधा मनुष्य आहे असं वाचकाला वाटेल अशा प्रकारें आपलें पांडित्य लपविण्याचं त्याचं कौशल्य जितकं अधिक, तितकं त्याचं निबंधलेखन अधिक सरस वठेल, आणि तितक्या प्रमाणांत सामान्य वाचकांना त्याचे निबंध वाचतांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळेल. सर्वच ललितलेखनाची पुनःप्रत्यय ही एकच एक नसली तरी मोठी कसोटी आहे, आणि ललितनिबंधाला ती विशेषेंकरून लागू आहे.

या पुन:प्रत्ययांतच ललितनिबंधाच्या सौंदर्याचा खरा गाभा आहे असंच मला म्हणावंसं वाटतं. आपण सामान्य माणसं द्वेष करतों, लोभ करतों, प्रेम करतों, विविध आशा उराशीं बाळगतों, मनोरथ करतों, जें करायला नको होतं तें केलं आणि जें करायला हवं होतं तें आपल्याहातून घडलं नाहीं अशा दुहेरी जाणिवेनें व्याकुळ होतों, आणि कधीं हंसत, कधीं सुस्कारे सोडीत, जीविताची वाट चालत असतों. उत्कृष्ट निबंधकार आपल्याला भेटला, कीं ज्याचे अनुभव बहुतांशीं आपल्यासारखेच आहेत, परंतु जो त्यांचं वर्णन आपल्याला साधत नाहीं इतक्या मनोज्ञ रीतीनं करतो, अशा एका सोबत्याची संगति आपल्याला मिळाल्यासारखी वाटते; आणि मग जीवितमार्गावरची सहल करण्यास आपल्याला नवा हुरूप येतो. या दृष्टीनं प्रस्तुत निबंधसंग्रह

वाचकांना अतिशय स्वागतार्ह वाटला पाहिजे. हें पुस्तक ज्याच्याजवळ असेल त्याला आपल्या मार्मिक व सुंदर भाषणांनीं रिझविणाऱ्या मित्रांची कधीं वाण भासणार नाहीं. आपण आनंदांत असलों तर त्या आनंदांत भर टाकणारे, दुःखांत असलों तर सांत्वन करणारे, निराशेनं व्यथित झालों असलों तर धीर देणारे, आणि एकंदरींत पाहतां हें मानवी जीवित जगण्यांत मौज आहे असं सांगणारे मित्र सहसा लाभत नाहींत. परंतु हें पुस्तक ज्यांच्या संग्रहीं असेल त्यांनीं अशा मित्रांचा परिवार आपल्याभोंवतीं गोळा केल्यासारखं होईल. या पुस्तकाचं कुठलंहि पान उघडावं, आणि सन्मित्र-संभाषणाचा आस्वाद घ्यावा !

कोल्हापूर,<br>२५-११-४१

ना. सी. फडके

# नवें लेणें

# ना. सी. फडके

६९२५

## पत्रें

मानवी संस्कृतीला आलेल्या विविध फळांची तुलना केली तर पत्रांना चिमुकल्या, रसदार, मधुर काबुली द्राक्षांचीच उपमा द्यावी लागेल. काबुली द्राक्षांचें असें आहे, कीं तीं पाहिल्याबरोबर मनाला मोह होतो; आणि शिवाय तीं सबंधच्या सबंध चट्दिशीं खातां येतात. आपल्याला पत्रें आलीं, कीं तीं देखील विलक्षण मोह घालतात. तीं घाईनें तरी वाचल्याखेरीज आपल्याला दुसरें कांहीं सुचत नाहीं. आणि तीं चट्कन् साद्यंत संपवितां येण्यासारखीं असून त्यांतील कोणताही भाग त्याज्य नसतो. द्राक्षांच्या पुष्कळ तऱ्हा आहेत; पण काबुली द्राक्षांचें माधुर्य आपल्याला अपूर्व वाटतें. कारण त्यांत बीं नसतें. जणु तीं बीजा-वांचून, कारणावांचून, अगदीं विनाकारण बनलेलीं असतात, व म्हणूनच तीं अत्यंत गोड लागतात. पत्रांची गोष्ट अशीच नाहीं का? तीं जितकीं विनाकारण लिहिलेलीं असतील तितकी त्यांच्यावर आपली प्रीति अधिक जडते. "पत्र लिहिण्यास कारण कीं" असल्या प्रारंभाचीं पत्रें आपल्याला रिझवूं शकत नाहींत. पत्रांत एखाद्या कामाचा तेवढाच उल्लेख असला म्हणजे द्राक्षांतल्या बींसारखा तो त्रासदायक वाटतो. त्यानें आपली रुचि बिघडते. तीं कामाचीं पत्रें आपण कामापुरतींच वाचतों, आणि काम संपलें, कीं त्या पत्रांचें जीवितही संपतें. त्यांची चिरफाड करून आपण त्यांच्या अस्थि केराच्या टोपलींत टाकतों. उलट, ज्यांत कसल्याही महत्त्वाच्या कामाचा निर्देश नाहीं असलीं आपल्या प्रीतींतल्या माणसांकडून आलेलीं पत्रें पुनःपुन्हां वाचलीं तरी आपलें पुरें समाधान होत नाहीं; आणि जडजवाहीर जतन करून ठेवावें तशीं तीं आपण ठेवतों. असल्या पत्रांत एखादें तर असें असतें, कीं तें आपण कां जपून राखून ठेवावें याचें तिऱ्हाइताला कोडेंच पडेल. माझ्या संग्रहांतील एका पत्रांत फक्त पुढील मजकूर आहे:—

"आपण ता. १२ ला येणार हें समजलं. शेवटीं आमचं

नशीब उघडलं म्हणायचं! पण हे बारा दिवस लोटायचे कसे? मला तर ते इतके जड वाटतात, कीं ते दूर करायसाठीं माझ्या आयुष्यांतूनच तेवढा काळ काटला गेला तरी माझी तयारी आहे."

दुसऱ्या एका पत्रांत तर,

"आम्ही कालच पांचगणींत आलों. इथली निसर्गाची निःसीम स्तब्धता आल्हादकारक वाटण्याऐवजीं मला तिची भीतिच वाटते आहे. कां कोणास ठाऊक!"

एवढाच मजकूर आहे.

हीं पत्रें मीं कां जतन केलीं आहेत असें कोणीं विचारलें तर त्याचें समाधान करणें सोपें नाहीं. कारण, त्या पत्रांत शब्दांच्या अर्थापेक्षां पुढेंमागें जो भावनेचा अन्वय आहे त्याचेंच सारें महत्त्व आहे. व तो अन्वय दुसऱ्याला सांगून कितीसा कळणार? याच दृष्टीनें पत्रांतील मजकुरापेक्षांही आरंभींच्या मायन्याला आणि अखेरच्या सहीलाच अधिक महत्त्व असतें. लिहिणाराच्या अंतःकरणांतील भावना त्यांतच बहुतांशीं व्यक्त होत असतात आणि त्या तो मोठ्या हौशीनें व्यक्त करीत असतो. कारण मानवी व्यवहाराची एक विचित्र तऱ्हा अशी आहे कीं, एखाद्या व्यक्तीबद्दल जी प्रीति आपल्या मनांत असते ती प्रत्यक्ष भेटींत व बोलण्याचालण्यांत दाखविण्याचा आपण संकोच करतों; पण पत्रांत मात्र ती उघड केल्यावांचून आपणांस राहवत नाहीं. एकदां असें झालें, माझ्या एका निकटच्या स्नेह्यांना मीं पत्र लिहून ठेवलें, पण टपालाची वेळ गेल्यामुळें तें मीं टाकलें नाहीं. त्या पत्रांत मध्येंच मीं असें लिहिलें होतें:—

"आपण माझ्यावर एवढा लोभ करतां त्याचा मी उतराई कसा होऊं? वास्तविक आपली योग्यता किती मोठी, आपल्या व माझ्या वयांतील अंतरही किती मोठें! पण आपलें अंतःकरण इतकें रसिक व प्रेमळ आहे, कीं माझ्याशीं वागतांना आपण आपला मोठेपणा विसरतां. आपल्याशीं माझा स्नेह असावा यांत मला धन्यता वाटते......"

आणि अशाच स्वरूपाचा आणखी कितीतरी मजकूर होता. पण योगायोग असा, कीं तें पत्र टाकलें गेलेंच नाहीं. दुसऱ्या दिवशीं ते स्नेहीच अचानक गांवाहून आले व त्यांची-माझी प्रत्यक्षच भेट झाली. त्यांच्या भेटीनें मला अर्थातच अत्यानंद झाला. पण एका गोष्टीनें मनाचा विरस झाला. माझ्या अंतःकरणांतील ज्या माझ्या भावना त्यांना कळल्या असत्या त्या त्या पत्राबरोबर तशाच राहिल्या. त्यांच्या प्रत्यक्ष तोंडावर त्यांतील अवाक्षरही माझ्या ओंठाबाहेर पडलें नाहीं, आणि माणसाला तें बोलवत नाहीं हेंच खरें. तसें म्हटलें तर "मत्प्रिय श्रीयुत अमुक अमुक" असें आपण पत्रांत लिहितों. पण तशी का आपण त्या गृहस्थांना हांक मारूं? पत्रांचें खरें मर्म हेंच आहे. जें बोलायला संकोच वाटेल तें जिव्हाळ्याचें बोलणें बोलण्याची सोय तीं करून देतात. एरव्हीं जें आपल्याला वदवणार नाहीं तें आपण पत्रांच्या साहाय्यानें बोलतों. प्रियसखीच्या सांगण्याप्रमाणें दुष्यंताला उद्देशून कमलपत्रावर प्रणयपत्रिका लिहितांना तींत खुशाल स्वतःची प्रणयविद्ध अवस्था नमूद करणाऱ्या शकुंतलेनें, जरा वेळानें आकस्मिकपणें दुष्यंत भेटतांच व त्याच्याशीं एकांतांत राहतांच, "मी तप्त जरी मदनशरें विनय सोडुं कां?" असें म्हणावें यांतील स्वारस्य हेंच नाहीं काय? प्रेमाची भाषा वाच्य शब्दांपेक्षां लेख्य शब्दांच्या आसऱ्यानेंच चांगली वाहते. संकोचानें बंद राहणारी अंतःकरणें पत्रांत खुलीं होतात.

म्हणूनच असें म्हणावेंसें वाटतें, कीं परस्परांवर प्रेमासक्त असलेल्या माणसांनीं अष्टौप्रहर आणि बारा महिने तेरा काळ एकत्र राहण्याऐवजीं मधूनमधून एकमेकांपासून जरा दूर व्हावें, हें चांगलें. प्रियजनांच्या सतत सहवासाची सारखी आसक्ति असणें हें प्रेमाचें मुख्य लक्षण आहे हें खरें, आणि निरंतरच्या सहवाससुखाची गोडी निरुपम आहे यांतही शंका नाहीं. परंतु प्रेमाच्या अवीटपणालाही मर्यादा आहेच, आणि ती मान्य न करण्यांत प्रेमाविषयींच्या निष्ठेपेक्षां हटवादीपणाचाच भाग अधिक दिसून येईल. कारण या एकंदर विश्वाच्या सौंदर्याचा उगम स्थित्यंतरांत असतांना प्रेमच तेवढें त्या नियमाला अपवाद कसें ठरेल? प्रेमालाही पालट पाहिजेच. हा पालट नसतांनाही प्रेमी माणसें आनंदांत असतील, नाहीं असें नाहीं. पण एकमेकांपासून कांहीं काळ दूर झाल्यानंतर पत्ररूपी

जो एक मधुर प्रेमप्रकार अनुभवावयास मिळतो त्याला तीं विनाकारण मुकतील एवढें तरी खचित म्हटलें पाहिजे.

जिव्हाळयाच्या माणसाकडून आलेलें पत्र वाचणें, आणि जिव्हाळयाच्या माणसाला पत्र लिहावयास बसणें यांत जो अत्यंत नाजूक सुखाचा प्रकार आहे त्याला दुसऱ्या कशाची उपमाच नाहीं. अंतरंगांतल्या माणसाचें पत्र आलें, कीं तें आपण किती हळुवारपणानें फोडतों! त्या माणसाचें बोलणें जितक्या कौतुकानें आपण झेलतों तितक्याच हळु हातांनीं आणि भुकेल्या अंतःकरणानें तें पत्र आपण उघडतों. आणि अशा माणसाला पत्र लिहावयाच्या वेळीं तर आपल्या मनाची जी धांदल उडते ती त्रयस्थाला वेडेपणाचीच वाटेल. देवाची पूजा करायच्या वेळेस सारें साहित्य अत्यंत निर्मल पाहिजे असें जसें भाविकाला वाटतें तसेंच कागद, टांक, साऱ्या गोष्टी टापटिपीच्या असाव्यात अशी हृदयाला ओढ लागलेली असते. इतकेंच काय, स्वतःचा चेहरा अमंगल, अधूत असला आणि अंगावरचे कपडे मलीन असले तर त्या वेषांत आपल्या आवडीचें पत्र लिहावयास आपण तयार नसतों. आणि गंमत अशी, कीं आपल्याला आलेल्या प्रेमपत्रांत मात्र कुत्र्यामांजरांच्या पायांसारखें अक्षर असलें, ओळीगणिक ऱ्हस्वदीर्घांच्या दहा चुका असल्या आणि जागोजाग शाईचे ठिपके पडले असले तरी ते आपल्याला दूषणीय वाटण्याऐवजीं मनोहरच वाटतात!

अशा प्रकारें प्रीतींतल्या माणसापासून दूर होऊन परस्परपत्रें लिहिण्यावाचण्यांत एक अवर्णनीय गोडी आपल्याला वाटावी यांत आश्चर्य नाहीं. वास्तविक स्वरूपावर अवास्तव स्वरूपाचा मुलामा देऊन त्याकडे पाहणें हें साऱ्या कलेचें रहस्य आहे, आणि असल्या कलाविलासांतून निरुपमेय आनंदाचा उद्‌भव होत असतो. या आनंदाच्या मोहानेंच एकत्व हें ज्याचें वास्तविक रूप आहे त्या ब्रह्माला अनेकत्वाचें नाट्य करण्याची प्रेरणा झाली म्हणतात. अर्थात् निरतिशय प्रेमाच्या माणसांत पूर्ण अभिन्नत्व उत्पन्न झालें असतांनाही कांहीं काळ एकमेकांत स्थलकालाचा अंतरपाट उभा करून, भिन्नतेचें अवसान आणून, एकमेकाला प्रेमानें ओथंबलेलीं पत्रें लिहिण्यांत त्यांना विलक्षण सुख व्हावें हें साहजिकच होय. पत्रांच्या सुवर्णपात्रांतून मिळणारी ही सुरसुधा ज्यांनीं चाखली नाहीं

ते अभागी होत. तिच्या उन्मादानें प्रेमाला नवजिवन यावें यासाठीं तरी प्रियजनांनीं मुद्दाम कांहीं काल विरह पत्करावा. सारखीं गर्द छायेखालीं राहिलेलीं फुलझाडांचीं रोपें खुरटतात, आणि त्यांच्यावर सूर्यताप पडल्यावर तीं फुलतात. त्याप्रमाणें नित्य सहवासाच्या शीतलतेनें अंतःकरणांतील प्रेम खुरटण्याची भीति असते, व त्यावर विरहतापाचे किरण पडून पत्रांतील मधुर विभावांचें नवजीवन त्यास मिळालें कीं तें विकास पावतें. विभक्ती-वांचून भाषेचा विलास जसा बंद पडेल तसाच विरहाच्या विभक्तीवांचून आणि त्या समयीं लिहिल्या जाणाऱ्या पत्रांवांचून प्रीतीचा ताजेपणाही कायम राहणार नाहीं.

# अनंत काणेकर

## पळण्याची कला

अगदीं लहानपणीं मी शाळेंत असतांना झालेली एक गोष्ट मला आठवते. त्या वेळीं मुंबईंत होणारे क्रिकेटचे चौरंगी सामने फुकट पाहण्याची आम्हांला फार हौस. अर्थात् फुकट पहाण्यांत जितका आनंद असतो, तितकाच धोकाहि असतो! पोलिस शिपाई येऊन किती वेळां हांकलून काढील त्याचा नेम नाहीं! अशाच एका वेळीं त्या ठिकाणीं व्यवस्था ठेवण्याकरितां नेमलेला एक सोल्जर आपल्या कुणालाहि न समजणाऱ्या इंग्रजींत आमच्या अंगावर ओरडूं लागला. त्याला आमच्या एका वात्रट मित्रानें वेडावलें. त्यासरशीं एक शिवी हांसडून त्या मित्राला पकडण्यासाठीं त्या सोल्जरनें झेंप टाकली, आणि आतां तो त्याची गचांडी पकडणार, इतक्यांत अशा कांहीं शिताफीनें आमचा मित्र त्याच्या हातांतून निसटला, कीं आम्ही पाहतच राहिलों! तो सोल्जर अधिकच चिडला आणि त्याचा पाठलाग करूं लागला. आमचा मित्र पुढें आणि तो सोल्जर मागें अशी साधारण अर्धा मैल प्रेक्षणीय शर्यत त्या मैदानांत चालली होती! पण आमचा मित्र निसटला तो निसटलाच.

त्याचे जोडे, टोपी वगैरे जमा करून जेव्हां त्या वस्तू त्याला परत द्यावयाला आम्ही त्याच्या घरीं गेलों, तेव्हां तो मोठ्या विजयोत्सवानें हंसत हंसत आमच्यासमोर आला, आणि "कसा रे तूं जीव घेऊन पळालास!" असें म्हणून आम्ही त्याला हंसण्यापूर्वीं तोच आम्हांला सांगूं लागला, "काय! कसा पळालोंय्!" स्वतःच्या पळण्याची त्याला तारीफ करतांना पाहून आम्ही थक्कच झालों!

पण खरोखर थक्क होण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें असें मला वाटतें; कारण पुढें पुढें जेव्हां महायुद्धाच्या बातम्या आम्ही वर्तमानपत्रांत वाचूं लागलों, तेव्हां कितीतरी वेळां आमच्या वाचण्यांत येई, कीं 'अमक्या अमक्या सेनापतीनें आपल्या सैन्याला यशस्वी माघार (Glorious retreat) घ्यावयाला लावली.' एखादा बडा सेनापति

सं. १०२
५४

आपल्या सैन्यासहवर्तमान मागें पळाला, कीं त्यानें 'यशस्वी माघार' घेतली, असें म्हणावयाचें; आणि आपल्या जिवासाठीं आमच्या मित्रानें धूम ठोकली तर त्याला मात्र 'पळकुट्या' म्हणावयाचें! माणसांचा स्वभावच असा आहे, कीं जी गोष्ट लहान प्रमाणावर केली असतां त्यांना उपहासास्पद दिसते, तीच मोठ्या प्रमाणावर पाहिली कीं त्यांना आश्चर्यकारक आणि प्रशंसनीय वाटते!

माझ्या मतें आमचा मित्र पळाला तेंच बरोबर. त्या वेळेला त्याला 'पळकुट्या' म्हणून आम्ही हंसलों हें खरें आहे. पण त्या हंसण्याचें कारण आमच्या शौर्याच्या कल्पना चुकीच्या होत्या म्हणून. त्यानें त्या सोल्जरशीं जर थोडी झटपट केली असती, आणि दोनचार दांत किंवा आपला एखादा डोळा जर तो गमावून बसला असता, तर मोठा 'शूर वीर' म्हणून आम्ही त्याचा गौरव केला असता. साहजिकच आहे. कारण स्वतःच्या केंसालाहि धक्का न लागतां सुरक्षित जागेवरून रक्तपात पाहण्याची हौस जर एखाद्यानें फेडली, तर 'शौर्यशाली वीराग्रणी' म्हणून डोक्यावर घेऊन आम्ही त्याला कां नाचवूं नये?

मला वाटतें बहुतेक माणसांना रक्तपात पाहण्याची थोडीबहुत हौस (Sadist tendency) असते. कदाचित् फार पूर्वकाळीं मानवजात जेव्हां रानटी अवस्थेत होती, त्या काळच्या स्वभावाचा हा अवशेष असेल, आणि म्हणूनच आमच्या शौर्याच्या कल्पना अजूनहि थोड्याशा रानटी आहेत. नुसत्या शारीरिक बळाच्या जोरावर आपलें वर्चस्व स्थापण्याच्या अवस्थेतून पुढें जाऊन मनुष्यानें आपल्या मेंदूचा कितीतरी विकास केला आहे, आणि मेंदूच्या जोरावर आपलें श्रेष्ठत्व स्थापण्याच्या अवस्थेला मनुष्य येऊन पोहोंचला आहे, हें आपण पुष्कळच वेळां विसरतों. म्हणूनच लाइट ब्रिगेडमधल्या अवघ्या सहाशें लोकांनीं जेव्हां प्रचंड रशियन सेनेशीं बेफाम झुंज घेतली, आणि त्यांतला प्रत्येक शिपाई मारला गेला, तेव्हां टेनिसनसारखा महाकविसुद्धां फसला, आणि आपल्या काव्यांत त्या ब्रिगेडवर त्यानें स्तुतीचा वर्षाव केला. खरी गम्मत अशी आहे, कीं त्या शिपायांना थोडीबहुत अक्कल असती–थोडा मेंदु जर त्यांनीं वापरला असता, तर भलत्याच मोठ्या सैन्याशीं झुंज घेण्याऐवजीं जीव घेऊन ते मागें पळत सुटले असते. यालाच यशस्वी माघार (Glorious

retreat) म्हणतात. हेंच खरें शौर्य ! नाहींतर भिंतीवर डोकें आपटून प्राण देणाऱ्याला वीरश्रेष्ठ कां म्हणूं नये ?

ज्याप्रमाणें काय बोलावें यापेक्षां काय बोलूं नये हें ज्याला माहीत आहे, तो खरा वक्ता; काय लिहावें याहीपेक्षां काय लिहूं नये हें ज्याला समजतें, तोच खरा लेखक, त्याचप्रमाणें लढण्यापेक्षां पळण्याची कला ज्याला अवगत आहे तोच खरा शूर !

# वि. स. खांडेकर

## अर्पण-पत्रिका

माझें एखादें नवें पुस्तक छापखान्याकडे गेलें कीं तें कुणाला अर्पण करावें या गोड कल्पनातरंगांत मी गुंगत राहतों. लग्नपत्रिकेप्रमाणें अर्पण–पत्रिका हा सहज थट्टेचा विषय होऊं शकतो हें मलाहि कळतें. कुत्र्यांचा अथवा घोड्यांचा शोक असलेल्या संस्थानिकाला उद्देशून 'यांच्या ठायींची अपूर्व रसिकता पाहून हें पुस्तक अत्यंत आदरानें अर्पण केलें आहे' असें जेव्हां एखादा ग्रंथकार म्हणतो, तेव्हां वाचकांनीं हंसूं नये तर काय करावें? तसं पाहिलें तर पेढेबर्फी तयार करणाऱ्या कारखानदाराला एखाद्यानें आपलें पुस्तक—मग तें खव्यावरलें नसेना का–अर्पण करण्यांत गैर असें कांहीं नाहीं. पण तसली एक अर्पण-पत्रिका वाचून मला स्वतःलाच हंसूं कोसळलें होतें. अर्पण-पत्रिकेंत नांव नमूद करणें आवश्यक असलें तरी धंद्याचा उल्लेख कशाला हवा? आणि तो करायचा म्हटलें तर वय, वंशवृक्ष, बायकामुलांचीं नांवें, इत्यादि गोष्टींचा तरी उल्लेख कां करूं नये? पण भावनेच्या भरांत म्हणा वा मुत्सद्देगिरीमुळें म्हणा, अर्पण-पत्रिकांत असल्या गमती प्रवेश करतात हें मात्र खरें. कुणीहि कुणाला पुस्तक अर्पण करतो तें प्रेमानेंच असलें पाहिजे. पण वाचकांना कदाचित् हें कळणार नाहीं म्हणूनच कीं काय अनेक ग्रंथकार (त्यांत मीहि आहेच) आपल्या प्रेमाचा उल्लेख करतात! यांतहि सप्रेम, प्रीतिपूर्वक वगैरे सूक्ष्म भेद आहेतच! एका धोंड्यानें अनेक पक्षी मारण्याची युक्तीहि कित्येक अर्पण-पत्रिकांत आढळते. 'मानसमंदिरांतल्या देवतेच्या चरणीं' ही अर्पण-पत्रिका याच मासल्याची नाहीं का? इसापनीतींतल्या दोन बायकांच्या दादल्यानें एखादी अंकलिपि लिहून ती '—स' अर्पण केली असती तर मला वाटतें त्याच्या डोक्याचें इतक्या लवकर टक्कल झालें नसतें! प्रत्येक बायकोला एकांतांत हा ग्रंथराज मी तुलाच अर्पण केला आहे असें सांगून तो दोघींनाहि दीर्घकाळ झुलवूं शकला असता. दोघींनाच का तीनशें बायकांचा जनानखाना असता तरी या '—स' च्या

तोडण्यामुळें त्याच्या डोक्यावरील केंसालाहि धक्का लागला नसता!

'अर्पण-पत्रिका म्हणजे एक प्रकारचें प्रदर्शन आहे; पण प्रेम ही कांहीं प्रदर्शनांत ठेवण्याची वस्तु नाहीं!' हा अथवा असेच दुसरे आक्षेप घेणारांची भूमिका मात्र मला मान्य नाहीं. शहाजहाननें मुमताजवर प्रेमरसाचा जो वर्षाव केला असेल, तो चंद्रालासुद्धां कळला नसेल आणि राजवाड्याच्या भिंतीला कान असूनहि त्यांचे प्रेमालाप ऐकायला मिळाले नसतील! पण या मूक प्रेमाचें स्मारक करण्याच्या वेळीं तें अत्यंत रमणीय व दर्शनीय व्हावें अशी दक्षता त्या रसिक बादशाहानें घेतलीच कीं नाहीं? अर्पण-पत्रिका म्हणजे तरी काय, तें प्रेमाचें स्मारकच असतें.

स्मारक शब्दांत एक प्रकारचें कारुण्य आहे हें कांहीं खोटें नाहीं. मनुष्य आपल्याला सोडून गेला कीं त्याची आठवण काळाच्या प्रचंड पावलांनीं उडणाऱ्या धुळीनें बुजून जाऊं नये म्हणून आपण स्मारकें करतों. मग आपल्या आयुष्यांत लीलेनें संचार करणाऱ्या आणि त्याला उजाळा देणाऱ्या व्यक्तींना पुस्तकें अर्पण करणें म्हणजे त्यांचें व आपलें प्रेम संपुष्टांत आल्याचा उघडउघड कबुलीजबाबच नाहीं का? या प्रश्नाचें सविस्तर उत्तर न देतां मी एवढेंच म्हणेन—मानवी मन चंचल आहे—विसराळू आहे—कृतघ्न आहे! अर्पण-पत्रिकेला एवढें महत्त्व आलें आहे तें यामुळेंच!

लहानपणापासून आपल्या आयुष्यांत आलेल्या आणि आपणाला सुख देऊन मुकाट्यानें निघून गेलेल्या व्यक्तींची नोंद आपल्यापाशीं कुठें असते? मनाला सुवर्णाक्षरांनीं कधीं कांहीं लिहितांच येत नाहीं! त्याचा सारा धुळाक्षरांतला कारभार! एक पावसाळा उलटला कीं गेलीं मागचीं अक्षरें धुवून. कित्येक वेळां कांहीं कांहीं विशिष्ट माणसांवांचून जगणें अशक्य आहे असें आपणाला वाटूं लागतें. पण थोडासा काळ लोटला कीं आपण त्या माणसांना पूर्णपणें विसरून जातों. काळ मनाच्या जखमा बऱ्या करतो म्हणतात! पण मला वाटतें मनांत फुललेल्या कोमल भावनांचा फुलोराहि तो कोळपून टाकतो. मोठेपणीं लहानसहान कारणासाठीं आईच्या अंगावर धांवून जाणाऱ्या मुलाला लहान असतांना आकाशांतला गडगडाट ऐकून आपण कसें भ्यालों होतों, आईला घट्ट मिठी मारून तो बंद करण्याविषयीं आपण बोबड्या बोलांनीं तिला कसें सांगितलें होतें,

आणि तिनें पोटाशीं घट्ट धरल्यामुळें आपली भीति कशी नाहींशी झाली होती या गोष्टीचें जर ऐन वेळीं स्मरण होईल—पण तसें कुठलें व्हायला? मनाच्या चाळणींतून कृतज्ञतेचा सुवास केव्हांच निघून जातो! दुःखाचे वेडेवांकडे कांटे मात्र तिच्यांत वर अडकून राहतात.

मुलामुलींना 'खरें सत्य बोला यथातथ्य चाला' या थाटाचा उपदेश मी केव्हांच करीत नाहीं. मी त्यांना फक्त एक गोष्ट सांगतों. त्यांनीं डायरीप्रमाणें एक छोटें पुस्तक ठेवावें. या पुस्तकांत आपण अनुभवलेल्या प्रत्येक प्रेमळ प्रसंगाची नोंद करायला त्यांनीं विसरूं नये. मग त्या प्रेमाचें स्वरूप किती का लहान असेना! पुढें जगाच्या कटु अनुभवानें तोंड वेडेवांकडें करण्याची पाळी येते त्यावेळीं हा जुना मध फार उपयोगी पडतो. व्यवहाराच्या आंचीनें भावना सुकूं लागतात, तेव्हां त्यांना असल्या प्रेमळ स्मृतीच ओलावा देऊं लागतात. एके काळीं माझा जीवश्चकंठश्च असलेला एक मित्र अलीकडे संधि सांपडेल तेव्हां माझी निंदा करतो असें मी ऐकिलें. अर्थात् त्याच्याबद्दल वाईट बोलण्याचा मोह मलाहि अनावर झाला. पण आयुष्यांतल्या एका अत्यंत निराशेच्या प्रसंगांत वडील भावाप्रमाणें माझ्या पाठीवरून हात फिरवून 'वेडा आहेस तूं! हत्ती गेला आणि शेंपूट राहिलंय्! त्याचं कसलं आलंय् एवढं भय?' या शब्दांनीं त्यानें मला जो धीर दिला तो मी अजून विसरलों नाहीं. प्रतिक्रिया म्हणून त्याच्याविरुद्ध बोलण्याची इच्छा उत्पन्न झाली, तेव्हां माझ्या मनानें नेमका हा प्रसंग पुढें केला. लगेच माझ्या तोंडाला कुलूप पडलें.

सुवासाप्रमाणें वाऱ्यावर उडून जाणाऱ्या कृतज्ञतेला शब्दांच्या बंधनांत अत्तराप्रमाणें कोंडून ठेवण्याचा प्रयत्न म्हणजे अर्पण-पत्रिका! मनुष्य इतर सर्व गोष्टी विसरेल; पण अहंभावामुळें आपल्या पुस्तकांचा विसर त्याला कधींच पडणार नाहीं. शुक्राचार्यांच्या पोटांत शिरून कचानें जशी संजीवनी विद्या संपादन केली, तशा अर्पण-पत्रिकाहि लेखकाच्या पुस्तकांत प्रवेश करून त्याच्या विस्मृतीवर म्हणा वा कृतज्ञतेच्या अभावावर म्हणा, विजय मिळवितात.

पुस्तक बहुधा अर्पण केलें जातें एकाच व्यक्तीला. पण प्रत्येक वेळीं तें कुणाला अर्पण करावें हें गोड कोडें सोडवितांना मी माझ्या

गत आयुष्याचा बारकाईनें आढावा घेऊं लागतों. जमेच्या बाजूला असलेल्या लहानमोठ्या रकमा कुणाकडून आल्या आहेत हें पाहून माझें मन गहिंवरून येतें. अशिक्षित मोलकरणीचें मातृप्रेम, वयानें कितीतरी लहान असलेल्या युवकाचें बंधुप्रेम, केवळ योगायोगानें लाभलेलें भगिनी-प्रेम, फार काय—विषमानें बेशुद्ध असलेल्या स्थितींत 'आई आली का ?' या प्रश्नामागोमाग 'मास्तर आले का ?' या प्रश्नांत व्यक्त झालेलें शिष्य-प्रेम—प्रेमाचीं 'इतकी' विविध व विलक्षण स्वरूपें अशा वेळीं प्रतीत होतात, कीं आयुष्याच्या प्रवासांत पायांत रुतलेल्या कांट्यांचा विसर पडतो, सुगंधमय अशा नवीनच सृष्टींत आपण प्रवेश केला आहे असा भास होतो, मनुष्याच्या अंतःकरणाच्या श्रेष्ठपणावरील श्रद्धा द्विगुणित होते, आणि असें वाटूं लागतें, कीं कितीहि पुस्तकें लिहिलीं तरीं तीं कुणाला अर्पण करावीं या विवंचनेंत मला कधींच पडावें लागणार नाहीं. या लांबलचक यादींत माझी बर्फासारखी पांढरी शुभ्र मांजरी सुली तर आहेच, पण माझ्या घरासमोरच्या टेकडीवरील एक खडकसुद्धां आहे हं ! जेरोम के. जेरोमनें चिलमीलाच नाहीं का आपलें एक पुस्तक अर्पण केलें ?

# ग. त्र्यं. माडखोलकर

## मी न वाचलेले कांहीं ग्रंथकार

आपण आयुष्याविषयीं विचार करूं लागलों म्हणजे असें आढळून येतें कीं, आपल्या आवडीच्या म्हणून योजिलेल्या जितक्या गोष्टी आपल्या हातून घडून येतात, त्यापेक्षां न घडलेल्याच खरोखरी अधिक असतात. मला वाटतें, ऐकीव माहितीमुळें आपल्याला आवडलेले पण आपण वाचूं न शकलेले ग्रंथ आणि ग्रंथकार हे या कोटींतच घालावे लागतील.

अशा इंग्रजी ग्रंथकारांत मी 'गलिव्हरचें प्रवासवृत्त' या ग्रंथाचा लेखक जोनॅथन स्विफ्ट याला अग्रस्थान देईन. इंग्रजी सहावींत असतांना इंग्रजी वाङ्मयाचा एक चित्रमय इतिहास माझ्या पाहण्यांत आला. त्या पुस्तकांत स्विफ्ट हा स्टेला नांवाच्या एका अव्याजमनोहर बालिकेला शिकवीत असल्याचें मनोज्ञ दृश्य रेखाटलें होतें व ठळक अक्षरांत त्याच्या जीवनाचा शोष करणारी त्याच्या स्टेलावरील अनिर्वचनीय पण अतृप्त प्रेमाची कथा दिली होती. तें चित्र आणि ती कथा यांनीं माझें मन इतकें कांहीं आकृष्ट आणि उद्दीपित केलें कीं, मी त्याच दिवशीं त्याचें 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हें पुस्तक खरेदी करून अधाशीपणानें वाचावयाला सुरुवात केली. पण त्याचीं पंचवीस पानें मी जेमतेम वाचलीं असतील तेवढींच. स्टेला आणि स्विफ्ट यांच्या प्रणयकथेचा मागमूससुद्धां त्या पुस्तकांत मला लागला नाहीं. आणि म्हणून तें पुस्तक मी जें एकदां बाजूला ठेवलें तें कायमचेंच.

पण, स्विफ्टनें माझी निराशा एवढ्याच एका बाबतींत केली असें नाहीं. डाल्टननें लिहिलेला आयर्लंडचा इतिहास ज्या वेळीं मी वाचला, त्या वेळीं प्रतिपक्षाला धुळीला मिळविणाऱ्या स्विफ्टच्या लेखन-सामर्थ्याची मला थोडी कल्पना आली व त्यानंतर त्याचें चरित्र मी मुद्दाम वाचून काढलें. तें वाचल्यावर त्यानें स्टेलासाठीं लिहिलेली आपल्या दैनिक हालचालींची रोजनिशी आणि पहिल्या जॉर्जची रखेली डचेस ऑफ केंडॉल हिची तुंबडी भरण्यासाठीं आयर्लंडांत पाडलेल्या तांब्याच्या

नाण्यांवर त्यानें लिहिलेलीं पत्रें वाचण्याची मला विलक्षण उत्कंठा उत्पन्न झाली. मी स्विफ्टचे समग्र ग्रंथ विकत घेतले व मोठ्या उत्सुकतेनें त्यांतील 'जर्नल टु स्टेला' प्रथम वाचावयाला प्रारंभ केला. पण त्यांत चिल्लर गोष्टींचा मोठ्या लाडिकपणानें वर्णन केलेला पाल्हाळ वाचण्याचा मला लवकरच कंटाळा आला. म्हणून तें पुस्तक बाजूला ठेवून त्याच्या राजकीय लेखांचा संग्रह मी वाचावयाला घेतला. पण तोहि मला वाचवेना. माझा शेवटचा प्रयत्न त्याच्या कविता वाचण्याचा झाला. स्टेला आणि व्हॅनेसा या आपल्या दोघां प्रियकरिणींवर त्यानें लिहिलेल्या कवितांतील बरेचसे उतारे त्याच्या अनेक चरित्रकारांनीं उद्‌धृत केलेले आहेत. ते वाचून त्याचीं काव्यें वाचण्याविषयीं जी तीव्र उत्कंठा मला लागली होती, ती तृप्त करण्यासाठीं मी त्याच्या कवितांचा संग्रह वाचावयाला घेतला. पण तो वाचीत असतांना "Cousin Swift, you will never be a poet" या ड्रायडननें त्याच्याविषयीं वर्तविलेल्या फटकळ भविष्याची प्रतीति मात्र मला बव्हंशीं आली. तथापि त्याच्याविषयींचा माझा आदर यत्किंचितहि कमी झाला नाहीं. उलट, त्याचें जीवन हें त्याच्या वाङ्मयापेक्षांहि अधिक गहन आणि प्रभावशाली होतें असेंच मला नेहमीं वाटत आलें आहे.

अशीच माझी अवस्था मिल्टन आणि बर्क यांच्याहि बाबतींत झाली. मिल्टनवरील मेकॉले आणि हटन यांचे निबंध वाचून मी अगदीं वेडावून गेलों व त्यानंतर सर वॉल्टर रॅले याचा मी त्याच्यावरील प्रबंध जेव्हां वाचला, तेव्हां त्याच्या महाकाव्यांचें पारायण करण्याची अनावर इच्छा मला झाली. प्रथम मी त्याचीं सुनीतें वाचलीं. तीं मला अतिशयच सुंदर वाटलीं. म्हणून मी 'लिसिडस', 'कॉमस', 'ललेग्रो' वगैरे त्याचीं खंडकाव्यें एकामागून एक वाचलीं. तीं जरी मला फारशीं कंटाळवाणीं वाटलीं नाहींत, तरी त्याचीं महाकाव्यें हातीं घेण्याचा धीर मात्र आतां चट्‌कन होईना. तथापि, अखेर मनाचा धडा करून मी 'पॅरडाईझ लॉस्ट' हें महाकाव्य वाचावयाला घेतलें. पण त्याच्या उण्यापुऱ्या दोनशें ओळी मी वाचल्या असतील नसतील, तोंच "Paradise Lost is a false poem, a grotesque poem, a tiresome poem" हे मॅथ्यू अर्नोल्डनें उद्‌धृत केलेले एका फ्रेंच सेनेटरचे उद्गार

मला पटूं लागले. शेवटीं मी मिल्टनचीं महाकाव्यें वाचण्याचा नाद सोडून दिला. मात्र तेव्हांपासून त्या अंध महाकवीविषयींचा माझा आदर आणि आश्चर्य हीं दोन्हींहि शतगुणित झालीं. ऑगस्टाईन बिरेलनें त्याच्या अर्नोल्डप्रभृति टीकाकारांवर टीका करतांना असें म्हटलें आहे कीं, महाकाव्याची महती कळावयाला मनहि मोठें लागतें. अगदीं खरें. माझें मन मोठें नसल्यामुळेंच मला मिल्टनचीं महाकाव्यें वाचवलीं नाहींत, दुसरें काय?

मोर्लेसाहेबांचे बर्कवरील दोन्हीहि प्रबंध वाचून मला त्या राजकारणी तत्त्वज्ञान्याविषयीं अतिशय आदर वाटूं लागला. म्हणून मी प्रथम त्याचीं अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नावरील भाषणें वाचलीं. तीं मला फार आवडलीं. त्यानंतर मी त्याचीं हिंदुस्थानावरील भाषणें वाचून काढलीं. तीं मात्र मला मुळींच आवडलीं नाहींत. अलंकारांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेली त्याची भाषा, हिंदुस्थानाच्या परिस्थितीचें अजब ज्ञान, इंग्रजांच्या पालकत्वाचा त्यांत मिरवलेला टेंभा व हिंदी संस्कृतीविषयींच्या तुच्छतेचा त्यांतून उमटणारा ध्वनि यांमुळें तीं भाषणें मला हिणकस वाटलीं. तथापि तीं वाचतांना कंटाळा मात्र आला नाहीं. पण बर्कच्या राजकीय तत्त्वज्ञानाची यथार्थ कल्पना त्याच्या या भाषणांच्या वाचनानें येण्यासारखी नव्हती. फ्रेंच राज्यक्रांतीवरील त्याच्या प्रबंधांत त्याच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा गड्डा सांठविलेला आहे असें समजलें जातें. म्हणून मी तो ग्रंथ वाचावयाला घेतला. पण त्याच्या शंभर पानांच्या पलीकडे कांहीं मी जाऊं शकलों नाहीं. एका फ्रेंच टीकाकारानें त्या प्रबंधाची टवाळी करतांना असें म्हटलें आहे कीं, मोराच्या शरीरापेक्षां त्याचा पिसारा जसा अवजड असतो व त्या पिसाऱ्यावर चमकणारे शेंकडों डोळे जसे दिखाऊ असतात, तसे बर्कच्या या पुस्तकांत तत्त्वविचारांपेक्षां वक्तृत्वाचेच फवारे जास्त असून त्यांतील प्रमेयें बहुतेक सारीं आभासात्मक आहेत. ही टवाळी कितपत रास्त आहे कोण जाणे, पण मोराच्या पिसाऱ्याची त्या प्रबंधांतील वक्तृत्वपूर्ण शैलीला दिलेली उपमा मात्र समर्पक आहे. मला या वक्तृत्वाचाच कंटाळा आला व त्याच्या भीतीनें मी तें पुस्तक खालीं ठेवलें. पण तें वाचून न झाल्याबद्दल मला खेद मात्र कधींहि वाटला नाहीं. कारण तो प्रबंध बर्कचे

मन आणि तत्त्वज्ञान यांची विशालता दर्शविणारा नसून, उलट त्यांच्या मर्यादाच मनावर बिंबविणारा असल्यामुळें त्याच्याविषयींचा आदर कायम रहाण्याला त्या पुस्तकाचें अवाचनच जास्त इष्ट होईल अशी माझी समजूत आहे.

माझ्या वाचनांत फारसा न आलेला अगदीं अलीकडील इंग्रजी ग्रंथकार एच्. जी. वेल्स हा होय. 'मॅरेज', 'ॲन व्हेरोनिका' आणि 'न्यू मॅकिआव्हेली' या त्याच्या कादंबऱ्या मी एकामागून एक वाचल्या व त्या मला आवडल्याहि. त्यानंतर मी त्याची 'जगाच्या इतिहासाची रूपरेषा' वाचली. ती जरी मला कांहीं ठिकाणीं वेडीवांकडी आणि ओबडधोबड वाटली, तरी जगाचा इतिहास लिहिण्याचा तो त्याचा धाडसी प्रयत्न मला एकंदरींत आवडला. हें त्याचें पुस्तक मी वाचीत असतांनाच त्याची 'किप्स' ही कादंबरी म्हणजे इंग्रजींतली एक उत्कृष्ट ललितकृति असल्याचें एका विद्वान् मित्रानें मला सांगितलें. म्हणून मी लगेच ती वाचावयाला घेतली. पण तिचा पहिला भागसुद्धां माझ्यानें पुरता वाचवला नाहीं. या कादंबरीला लिहिलेल्या प्रस्तावनेंत एडवर्ड गॅर्नेटनें असें म्हटलें आहे कीं, "प्राणीशास्त्रज्ञाला हत्तीच्या वर्णनाइतकेंच शेतांतील उंदराच्याहि तपशीलवार वर्णनाचें महत्त्व वाटतें. 'किप्स' हा वेल्सच्या शेतांतला उंदीर आहे; व त्याचें वर्णन त्यानें मोठ्या उत्साहानें केलें आहे." खरी गोष्ट; पण समदर्शी शास्त्रज्ञाला जरी हत्ती आणि उंदीर यांचें महत्त्व सारखेंच वाटलें, तरी सामान्य वाचकाला इतकी समदृष्टि कोठून असणार ? वेल्स हा आधीं शास्त्राभ्यासी आणि नंतर कादंबरीकार आहे व त्यामुळेंच त्याच्या कादंबऱ्या आणि गोष्टी पुष्कळदां अगदीं कंटाळवाण्या वाटतात. ज्याला शास्त्र समजावून घ्यावयाचें आहे, तो ज्यूलियन हक्स्ले किंवा बरट्रँड रसेल यांचे लेख वाचील. वेल्सच्या किचकट आणि पाल्हाळिक कादंबऱ्या वाचण्याचे परिश्रम तो कशाला घेईल ? पण वेल्सचें समग्र ललितवाङ्मय जरी मी वाचूं शकलों नाहीं, तरी त्याच्या अवाचनापासून मी हा धडा मात्र निःसंशय शिकलों कीं, ललित-लेखकानें तरी आपल्या लिहिण्यांत शास्त्रज्ञानाला कलाबुद्धीवर कधींहि मात करूं देतां कामा नये.

कोणते ग्रंथकार आपण कां वाचले नाहींत, हें अशा रीतीनें सांगत

बसणें हा सुद्धां कदाचित् एक फुशारकीचा प्रकार ठरेल. म्हणून, मराठींतील असल्या अवाचनाचें फक्त एकच उदाहरण देऊन, हा अनिच्छेनें लिहावयाला घेतलेला लेख मी आतां हातावेगळा करणार आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांचा समर्थ रामदासांवरील निबंध वाचल्यावर मला दासबोधाचें परिशीलन करण्याची तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली. राजवाड्यांच्या लिखाणांतील अत्युक्ति आणि तर्कच्युति कळण्याचें तें वय नव्हतें. त्यामुळें समर्थांच्या कर्तृत्वाच्या आणि दासबोधाच्या महिम्याच्या त्यांनीं केलेल्या अचाट वर्णनावर माझा चटदिशीं विश्वास बसला. दासबोध घरीं होताच. तो लगेच सोंवळ्यांतून बाहेर मागून घेऊन मी वाचावयाला सुरुवात केली. पण पहिल्या तीन दशकांतील स्तवनें, लक्षणें आणि निरूपणें वाचूनच मी टेकीला आलों. पण वाटलें, आपलें कांहींतरी चुकत आहे. एवढा मोठा राष्ट्रीय स्फूर्तीचा ग्रंथराज आपल्याला वाचणें कंटाळवाणें व्हावें, हा आपल्याच बुद्धीचा कांहीं तरी दोष असावा. म्हणून स्नानोत्तर देवांसमोर बसून दासबोध वाचण्याचा प्रयत्नहि मी कांहीं दिवस भक्तिपूर्वक करून पाहिला. पण व्यर्थ. नवविधा भक्तीच्या निरूपणापलीकडे कांहीं माझी मजल गेली नाहीं. समर्थांच्या स्फुट कवितांचे खंड मी नंतर वाचले; व त्यांतील कांहीं कविता मला फार आवडल्याहि. पण दासबोध बासनांतून बाहेर काढण्याचा हिय्या कांहीं मला पुन्हां झाला नाहीं. ज्या ग्रंथानें शिवाजीमहाराजांपासून चौंडेमहाराजांपर्यंत अनेकांना राष्ट्रकार्याची स्फूर्ति दिली, तो ग्रंथ आपल्याकडून पुरता वाचून होऊं नये, हें आपलें दुर्दैव नव्हे काय?—या विचारानें माझें मन वारंवार उदास होतें.

पण या अवाचनांतहि एक समाधानाला जागा आहे. कै. श्री. कृ. कोल्हटकर हे केव्हां केव्हां असें म्हणत असत कीं, नामांकित म्हणून मानल्या गेलेल्या ग्रंथकारांविषयींची आपली आदरबुद्धि कायम रहावयाला त्यांच्या ग्रंथांच्या वाचनापेक्षां अवाचनच पुष्कळदां जास्त उपयोगी पडतें. एकादा प्रसिद्ध ग्रंथ किंवा प्रथितयश ग्रंथकार आपल्या वाचनांत न आल्याबद्दल मला जेव्हां हळहळ वाटते, तेव्हां ती कमी व्हावयाला माझ्या गुरूंच्या या मार्मिक उद्गारांची आठवण कितीतरी वेळां कारण झाली आहे!

# वि. ल. बरवे

## उडाणटप्पू

अभिनव भारताच्या एका महान् पुढाऱ्यानें आमच्या गांवीं परवां एक सहभोजन घडवून आणलें. सहभोजन इष्ट कीं अनिष्ट याचा आपण खुशाल अगदीं इथेंच वाचन थांबवून–विचार करा. मी मात्र आपल्या विचारांत या क्षणीं तरी भाग घेणार नाहीं. कारण–सांगूंच का ?—

—मी त्या सहभोजनांत अगदीं उत्साहानें भाग घेतला होता—! माझ्या खेळीमेळीच्या आणखी ५।२५ लोकांनींहि भाग घेतला होता–! त्यांत काय मोठेसें ?

—पण आमच्या गांवच्या बऱ्याच सहभोजकेतर लोकांना त्यांत कांहीं तरी फारच मोठेंसें वाटलें ! ती बातमी कित्येकांच्या तर पार डोक्यावरून गेली ! कित्येक तर अगदीं पिसाटाप्रमाणें बडबडूं लागले. कांहींजणांना तर आमच्या या सहभोजनांत एक प्रकारची धडाडी आहे असें वाटूं लागलें. कोणी कांहीं बोलूं लागले, कोणी कांहीं भकूं लागलें, तर कोणी दिवसभर कोल्हेकुई करण्याला आरंभ केला.

"नई–म्हणजे अस्पृश्यता दूर व्हायला पाहिजे ऽऽ पण हे जे सहभोजक आहेत ते सारे लेकाचे उडाणटप्पू आहेत !" हें वरील वाक्य त्या उद्योगी सद्‌गृस्थानें केवळ माझी मूर्ति डोळ्यांसमोर आणून उद्गारलें असावें.

"उद्योगानें परिपूर्ण व्यापलेले लोक सहभोजक व्हायला तयारच नसल्यामुळें अर्थातच उडाणटप्पू तेच सहभोजक व्हावयाचे, यांत काय मोठेसें सांगितलेंत ?" माझ्या एका मित्रानें वरील उत्तर दिलें.

उडाणटप्पू ! उडाणटप्पूपणा हा मला वाटतें माणसाचा अभिजात मनोधर्म आहे. प्रत्येक उद्योगानंतर कांहीं काळ तरी उडाणटप्पू झाल्या-शिवाय माणसाला चैनच पडत नाहीं. सणवार अगर नाताळादि सर्व प्रकारच्या सुट्टयांचा आगामी आनंद एकेक पंधरवडासुद्धां मनांत हेलावत

राहातो, याचें कारण त्या अभिजात प्रवृत्तीशिवाय काय असूं शकेल? लवकरच वसंत येणार या भावनेनें कोकिळांचा समूह जितका उल्हसून जातो तितक्याच तरुण मुली मंगळागौरीच्या आगामी हुदूदूकडे पाहून हर्षभरित होत असतात. सणावारांचा हा जो आगामी अम्मल चढत असतो तो देवदेवतांचें पूजन करण्याचा उद्योग प्राप्त होणार म्हणून नसून, केवळ त्या दिवशीं निष्काळजीपणानें उडाणटप्पू व्हायला अवसर मिळणार म्हणून! शाळेंतील मुलामुलींना मधली सुटी देण्यांत येते ती तरी मनाला आलेला निळंग घालवण्यासाठींच कीं नाहीं? समईच्या ज्योतीजवळ आलेलें कोळिष्टक काढून टाकण्यांत येतें तें तरी ती ज्योत फिरून तजेलदार व्हावी म्हणूनच कीं नाहीं? गुलाबाच्या ताटव्यांतील ज्या ज्या फांदीला फूल येऊन जातें ती ती फांदी केवळ फिरून फुलारून जाण्याकरितां छाटून काढावी लागते. या फांद्या छाटून टाकण्यांत उद्योग-हानि झाली असें मानणाऱ्या बागवानानें फुलांच्या दुसऱ्या बहराची फारशी इच्छा धरूं नये. जगांतल्या धकाधकींतल्या प्रत्येक मामल्यापासून शक्य तितकें दूर असणाऱ्यांचा साराच उद्योग उडाणटप्पूपणाचा असल्यामुळें त्यांना निराळ्या उडाणटप्पूपणाची गरज भासणार नाहीं. हातापायांना निळंग नाहीं, मेंदूला शीण नाहीं, पाठीला थकवा नाहीं, भावनेला पीळ नाहीं, महत्त्वाकांक्षेची हुरहूर नाहीं, विचारांचा व्याप नाहीं अगर जगाच्या जिवंतपणाचा अटाटोप पहात राहण्याइतकाहि डोळ्यांना ताण नाहीं—अशा लोकांना वरील उद्योगाव्यतिरिक्त सारेंच मानवी जग उडाणटप्पू वाटणार यांत नवल काय?

उडाणटप्पूपणा मात्र खास खास नवलाचा आहे. त्यांत यक्षभूमि आहे. त्यांत अवंतीनगराची पूर्वकालीन अपूर्वता आहे. त्यांत असणारा बेछूटपणा व त्यावर ओथंबून असणारीं अज्ञात संकटें यामुळेंच उडाण-टप्पूपणाला सुरसता व अद्भुतता प्राप्त झाली आहे. त्यांतील बेछूटपणाचा वा अज्ञात संकटाचा मोह प्रत्येक माणसाला अनावर होतो. क्रिकेट, हॉकी, पोलो आदिकरूनच्या मर्दानी खेळांत आकस्मिक संकटांची रेलचेल असते हें माहीत असूनही प्रत्येक तरुण तडफेनें भाग घेत असतो. सुटीच्या दहा दिवसांतील उडाणटप्पूपणांत शरीरांतील रक्त जिवंतपणानें उड्या घेत राहतें; भावनांचा ओघ नव्या नवलाईनें पिस्कारूं लागतो;

सृष्टीच्या जीवस्वराशीं आपला जीवस्वर मिसळून जाऊन नव्या गाण्यांचा प्रस्फुर होतो; ओथटल्या मनोवृत्ती पल्लवित होतात व जगांतील धका-धकीच्या हरएक मामल्यांकडे आपण नव्या लढवय्या वृत्तीनें पाहूं लागतों. एकच पीक सारखें एकाच शेतांत उगवूं लागलें तर शेतच नापीक होऊन जातें. त्यांत भिन्नभिन्न प्रकृतीचीं पिकें सारखीं बदलावीं लागतात. फार काय, कित्येकदां शेतें ओसाडही ठेवावीं लागतात. तद्वतच मनुष्य-मात्रालाही भिन्नभिन्न उद्योग आरंभावे लागतात. प्रसंगीं मन ओसाडहि ठेवावें लागतें. हें सारें कार्य उडाणटप्पूपणाशिवाय अन्य उपायांनीं साधत असल्याचें अद्याप ऐकिवांत नाहीं.

उडाणटप्पूपणा अर्थात् असाच असला पाहिजे कीं ज्यांत काळजीचा निरास होऊन नवें जीवन प्राप्त होईल. जो आठवड्यांतून एकदां तरी नाटक-सिनेमा पहावयास जाईल, जो आठवड्यांतून एक दिवस तरी उडाणटप्पूपणांत घालवील, त्यालाच हिंदुस्थानचा मुख्य प्रधान होण्या-साठीं मी माझें 'मत' देईन. चोवीस तास सज्जधनु असलेल्या मुख्य प्रधानावर, मतदानाइतका मी तरी केव्हांच विश्वास ठेवणार नाहीं. ( तशा मतदानाचा प्रसंग येईल का केव्हां ? )

उडाणटप्पूगिरी ही तरी प्रकारशः सुटीच नव्हे काय ? घराच्या व व्यवसायाच्या कृत्रिम बंधनांतून पलीकडे जाऊन पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग नव्हे काय ? स्वातंत्र्याची मनःप्रवृत्ति व प्रत्यक्ष कृतीचे हेलकावे यांची गाढ अनुरक्ति फक्त उडाणटप्पूगिरींतच संभवूं शकते. प्रत्यक्ष शाळेंतील शिक्षणाच्या कित्येकपट अधिक शिक्षण मला उडाणटप्पूगिरींतच मिळालें आहे. माझे वाचकहि माझ्याप्रमाणेंच आपला अनुभव सांगतील ( फक्त मागील पिढींतील कांहीं लोक सोडून ). पाठशाळेला बुट्टी मारून घरांतील चहाच्या किटलीशीं खेळणाऱ्या जेम्स् वॅटनें जे जे वाफेविषयींचे शोध लावले ते ते त्याच्या उडाणटप्पूगिरींतील गाढ अनुरक्तीचे द्योतक आहेत. जगांतील कित्येक आश्चर्यकारक शोध व्यवसायांच्या कृत्रिमतेंत पैदास झालेले नसून, स्वातंत्र्यमय उडाणटप्पूपणां-तच जन्मास आले आहेत. अमेरिकेचा विख्यात वैमानिक कॅ. लिंडबर्ग हा कित्येक दिवसपर्यंत अमेरिकेच्या जनतेला केवळ एक उडाणटप्पू म्हणूनच माहीत होता. पण अखेरीस त्याची उडाणटप्पूगिरीच वैमानिक

जगाच्या पूजेचा विषय होऊन राहिली आहे. दुसऱ्याला उडाणटप्पू म्हणणारे लोक घरादाराच्या, व्यवहार-व्यवसायाच्या कृत्रिम बंधनांना नसतें महत्त्व देतात व 'माझें कसें होईल?' याच एका खुळचट भावनेनें व्याप्त असतात. उडाणटप्पू म्हणून समजले जाणारे लोक कृत्रिम बंधनांना अगर 'माझें कसें होईल?' यास यत्किंचितहि महत्त्व न देतां केवळ नवजीवनाचा अविरत अनुभव मिळविण्याकरितां उड्यांवर उड्या घेत रहातात. बेडरपणा व आकस्मिकता या तबल्याडग्यांनीं त्याच्या स्वातंत्र्य-गीताची साथ केली जाते. निसर्गांतील हरएक क्रियाप्रतिक्रियांचें संगीत-संमेलन (Band) त्यांच्या सांगातीं असतें. प्रत्येक झरोक्यांतून नव्या नव्या मदिरेचा अनुभव घेत घेत हे लोक फिरत असतांना, स्वानंद-साम्राज्यांत इतके गढून जातात कीं, त्यांना नवीन नांवें देणें भाग पडतें. एका काळीं उडाणटप्पू ठरलेले पुढील सारे लोक आजच्या जगांतही उमाजी नाईक, त्रिंबकजी डेंगळे, तंट्या भिल्ल, बाबू चष्मेवाला अथवा रॉबिनहुड, रॉब रॉय, फ्रॅन्सिस ड्रेक, होरेशियो नेल्सन्, कॅ. लिंडबर्ग वगैरे नांवांनीं सुविख्यात झाले आहेत. त्यांच्याविषयीं जनतेंत असणाऱ्या आदराविषयीं तर बोलावयालाच नको.

शिवाजीमहाराज, बाबर, शीरशहा अगर अलेक्झँडर, केमालपाशा, मुसोलिनी वगैरे थोर थोर व्यक्तींबद्दल बोलावयाचें झालें तर असेंच म्हणतां येईल कीं, तेही एका काळीं, त्या त्या वेळच्या जनतेकडून, उडाणटप्पू म्हणून ओळखले गेले असणें शक्य आहे.

मला नम्रपणानें म्हणायचें आहे तें इतकेंच कीं, उडाणटप्पूपणालाहि उज्ज्वल असें दुसरें नांव सहज देतां येण्यासारखें असतें! सारी दोषार्हता नांव देणाऱ्याच्या वृत्तींवर अवलंबून राहील.

उडाणटप्पू हेंच नांव बहाल करणारे आक्षेपक अगर कांहीं वाचक मात्र सांगतील कीं, "वर निदर्शित केलेले सारे लोक आमच्या उडाणटप्पूंच्या यादींत मुळींच पडत नाहींत. इस्टेटी कमवावयाचा प्रयत्न कसून न करणारे, चोवीस तास सारखा उद्योग न करणारे, वाटेल तेव्हां भटक्या मारणारे, उगाच ट्रिप्स काढणारे, जबाबदारीची जाणीव एकसारखी न बाळगणारे, सर्वमान्य नसणारे असे नाटक, सिनेमा व लेखन यांचे अर्धवट उद्योग करीत राहाणारे, रूढी, कायदे वगैरेंचा

विधिनिषेध न बाळगणारे, आत्मस्वातंत्र्यालाच बिलगून राहाणारे वगैरे लोकच प्रामुख्यानें आमच्या यादींत पडतात. त्यांच्याबद्दल काय बोलायचें तें बोला.''

नाहीं कोण म्हणतो? वरील यादींतील लोकांबद्दलच जास्त उज्ज्वलतेनें बोलतां येण्यासारखें आहे. जगांतील कोणत्याहि वस्तूवर आपली 'मालकी' प्रस्थापूं न पाहतां, पूर्ण समाधानानें 'माझें कसें होईल?' याचा विचारहि न करतां, सुखेनैव जगणें या प्रकारच्या गिप्सी, ट्रॅबेडार, अवलिये वगैरे लोकांच्या मनोवृत्तींचें कौतुक करावें तेवढें थोडेंच होणार आहे. मालमत्तेचा यत्किंचितहि हव्यास नसणें ही गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं. त्यांत धाडसी जीवनाची परिसीमा नाहीं असें कोण म्हणूं शकेल? नेहमींच तरतरीत व उत्साहपूर्ण असणाऱ्यांना सुवासानें भारावलेल्या ताज्या गुलाबाइतकेंच मोहक कोण मानणार नाहीं? आपल्यावर कसलीच जबाबदारी नसावी ही प्रत्येकाचीच अगदीं हृदयापासूनची तळमळ असते. अशा स्थितींत जबाबदारीची पाळीच न आणणाऱ्या लोकांचें अगर केवळ एका विशिष्ट मनोधर्माच्या बळावर प्रसंगीं पूर्ण बेजबाबदार राहाणाऱ्यांचें केवळ त्यांच्या धाडसामुळेंच कां कौतुक होऊं नये? न मिळणारें स्वातंत्र्य एकवार राहो, पण स्वतः मिळवण्यासारखें असणारें जीवनस्वातंत्र्य बेछुटपणानें मिळवणारे हे तरी राजकीय स्वातंत्र्यवीरांइतकेच वंदनीय कां होऊं नयेत? जगाच्या वाङ्मयांतहि याच लोकांचा फार मोठा भरणा आहे. फॉलस्टाफ्, प्रिन्स हॅल, पिकविक्, सिडने कार्टन अगर भटके रामदास, धावडशीकर स्वामी, मराठी शाहीर आदिकरून लोकांची जी वाचकांवर पकड आहे ती त्यांच्या उडाणटप्पूगिरींत पैदास झालेल्या उज्ज्वल कृतीमुळेंच होय ही गोष्ट कोणालाहि दृष्टिआड करतां येण्यासारखी नाहीं.

आज आमच्या समाजांत असावी तशी व्यवसायसमृद्धि नाहीं. त्याला कारणें कांहींहि असोत; आज आमच्या समाजांत उडाणटप्पूपणाहि नाहीं! स्तिमितपणा व त्यामुळें फैलावणाऱ्या जांभया, शिंका, उचक्या, ढेंकरा व तन्निमित्त होणारा मुद्राभिनय यालाच जर उद्योग म्हणावयाचें तर तो मात्र भरपूर आहे. या तिन्हीं गोष्टींपैकीं जर कशाचा अतिरेक व्हावयाचा असेल तर तो जिवंतपणाच्या उडाणटप्पूगिरीचाच व्हावा असेंच कोणाहि जिवंत माणसाला वाटेल!

# वि. पां. दांडेकर

## एकेकाची तऱ्हा

सुप्रसिद्ध कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट याच्या लहानपणाची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्याला आपल्या कोटाच्या गुंड्यांना हात लावल्याखेरीज विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंच देतां येत नसत. ही त्याची तऱ्हा त्याच्या बुद्धिमत्तेचा हेवा वाटणाऱ्या एका वर्गबंधूनें लक्षांत ठेवून एके दिवशीं मारामारींत त्याच्या कोटाच्या गुंड्या उपटून टाकल्या. झालें; त्यानंतर त्या दिवशीं कुमार वॉल्टरला मास्तरांनीं विचारलेल्या प्रश्नांची केवढी गैरसोय वाटूं लागली! एका प्रश्नाचेंहि उत्तर त्याला सुचेना, त्याची जीभ त्याच्या तोंडांत घुटमळूं लागली, आणि त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम आला!

वॉल्टर स्कॉटचेंच कशाला? इतरहि मंडळींच्या कांहीं कमी का तऱ्हा असतात बोलण्याचालण्याच्या? माझ्या माहितीचे एक सुप्रसिद्ध वक्ते आहेत. त्यांना बोलत असतांना आपल्या कॉलरच्या बटनाला हात लावण्याची व त्याच वेळीं मान हलवून हवेंत काल्पनिक वर्तुळें काढण्याची संवय आहे. जसजसें त्यांचें व्याख्यान रंगत जातें, तसतसें हे विशिष्ट प्रकारचे हातवारे व हीं वर्तुळें अधिकाधिक होऊं लागतात. एकदां काय मौज झाली, त्यांचें व्याख्यान संपलें तरी मानेवर बोटें ठेवून वर्तुळें काढण्याची त्यांची क्रिया कांहीं संपेना! तेव्हां हा कांहीं वातविकार आहे कीं काय असें वाटून एक डॉक्टर त्यांच्याजवळ आले. तेव्हां ते त्यांना इंग्रजींत म्हणाले, "Don't you worry, doctor, I am in the best of moods." (तुम्ही काळजी नका करूं डॉक्टर. मी अगदीं मजेंत आहे.)

दुसरे एक गृहस्थ आहेत, त्यांना बोलतांना लिहिण्याची संवय आहे. 'अफ् कोर्स, अफ् कोर्स' (अलबत, कां नाहीं?) असें म्हणून तुमच्याशीं बोलत असतांना, दौतींत टाक बुचकळून ते बोललेला मजकूर लिहितील! त्यांची ही तऱ्हा त्यांच्या नोकराला स्वाभाविकपणेंच त्रासदायक

वाटत असल्यास नवल नाहीं: कारण कोणी दहापांच लोक येऊन गेले कीं, त्याला टीपकागद व साधे कागद बदलून नवे ठेवावे लागतात. या त्रासाला कंटाळून पुढें मात्र त्यानें एक युक्तीच शोधून काढली. या सर्व अनर्थांचें मूळ दौतींत असणारी शाई आहे असें समजून त्यानें दौत कोरडी ठेवण्याचें ठरविलें. त्यानंतर त्याच्या धन्याची, रिकाम्या दौतींतहि टांक बुचकळून लिहिण्याची संवय जरी गेली नाहीं, तरी त्याच्या मागचा त्रास मात्र वांचला.

हॉलीवुड येथील जॉन फोर्ड नांवाच्या दिग्दर्शकाची तऱ्हा कांहीं वेगळीच आहे. शूटिंगचें काम चालू असतांना तो इतका कांहीं व्यग्रचित्त होतो कीं, त्याच्या मनांतील भावनांची क्षुब्धता हातरुमाल दांतांनीं चावचावून तो व्यक्त करीत असतो. याकरितां त्याला आपल्या खिशांत बरेच हातरुमाल बाळगावे लागतात. त्याच्या खिशांतील हातरुमालांची होत असलेली ही दुर्दशा सौ. फोर्डसारख्या सुगृहिणीला कशी आवडणार? तिनें एके दिवशीं मि. फोर्ड यांच्या खिशांत हातरुमालांच्या ऐवजीं मलमलीचे लहान लहान चौरस तुकडे घड्या करून ठेवले. त्या दिवशीं शूटिंगच्या वेळीं खिशांत हात घालतांच जॉन फोर्डला रुमालाऐवजीं दुसरेंच कांहीं आढळलें. मग काय? त्या वेळीं त्याला दिग्दर्शनाचें काम करतां येईना, त्यानें सर्व काम थांबविलें, नोकराला आपल्या घरीं पिटाळलें, आणि जेव्हां खिसा हातरुमालांनीं भरला आहे असें त्याला आढळलें तेव्हां त्यानें शूटिंगकरितां आज्ञा दिली!

अशाच एका तऱ्हेच्या जोरावर एका वक्त्यानें एका सभेंत आपला ठराव पास करून घेतला! त्याला बोलतांना टेबलावर ठेवलेले वजनाचे गोळे हातांत फिरवण्याची संवय असे. एकदां एक ठराव मांडीत असतांना हातांतला गोळा प्रेक्षकांना दाखवीत तो म्हणाला, "आपण हा ठराव पास कराल अशी माझी खात्री आहे." आणि मौज अशी कीं, एरव्हीं नामंजूर होणारा ठराव त्या गोळ्याच्या भीतीनें त्या दिवशीं मंजूर झाला!

बोलणाऱ्यांप्रमाणें गाणाऱ्या लोकांच्याहि कितीतरी तऱ्हा असतात. ताना घेत असतांना हाताचीं बोटें व मान इतक्या कांहीं वेगवेगळ्या प्रकारांनीं कांहीं गाणारे फिरवितात कीं, क्वचित् त्यांच्या गाण्यानें

करमणूक नाहीं झाली तरी असल्या अंगविक्षेपांनीं खास होते. कित्येक उत्तम गवय्ये गातांना इतकीं वाईट तोंडें करितात कीं त्यांना पडद्याआड बसवून गायला लावावेसें वाटतें. अशा गाणाऱ्यांनीं निदान चांगले मुखवटे लावून गाण्याचा उपक्रम करून बघण्याजोगा आहे. कर्णमधुर संगीत ऐकत असतांना डोळ्यांना जाचक होणारे मुखविक्षेप पाहिले कीं उत्तम पुलावा खात असतांना लागलेल्या कटीण खड्याची आठवण होते.

लिहितां लिहितां बोलण्याची वर तऱ्हा सांगितली. तशी लोळत असतांना गाणें म्हणण्याची संवय एका गायिकेला होती. बसून गाणेंच म्हणतां येत नसे तिला! याचें कारण ती गाणें शिकली ती पलंगावर पडल्या पडल्या. तिचे वडील गाण्याची तालीम करीत, ती ती पडल्या पडल्या ऐके. एका बादशहानें जेव्हां तिच्या गाण्याची कीर्ति ऐकून तिला गाण्याकरितां आपल्या महालांत बोलाविलें आणि गाण्याची विनंति केली तेव्हां कांहीं केल्या तिच्या तोंडून एकहि सूर निघेना! आपली मुलगी उत्तम गाते असें म्हणून बादशाहाजवळ तिच्या बापानें फुशारक्या मारल्या होत्या. त्या आठवून त्याच्या नाड्या थंड होण्याची पाळी आली. तेव्हां होतें नव्हतें तेवढें सर्व अवसान एकवटून त्यानें रागाच्या भरांत मुलीच्या श्रीमुखांत भडकविली. त्यासरशीं मुलगी कोलमडून खालीं पडली. परंतु चमत्कार हा कीं, पडल्याबरोबर रडण्याचे सूर निघण्याऐवजीं तिच्या मुखावाटें सुरेल संगीत स्रवूं लागलें!

अंगविक्षेपांच्या बाबतींत तर कमालीच्या तऱ्हा पाहावयास सांपडतात. एकजण रस्त्यानें असे चालतात कीं जणूं काय त्यांचें सर्व शरीर एखाद्या खोड्यांत अडकवून ठेवलेलें आहे. त्यांच्याकडे पाहिलें कीं असें वाटतें, एखादा लांकडी पुतळाच तर रस्त्यानें जात नाहीं ना? याच्या उलट मोटारीचें हँडल मारल्यावर ती जशी थरथर हलते, तशी चालतांना सर्वांगाची हालचाल करणारे दुसरे एक गृहस्थ आहेत. त्यांच्याकडे पाहिलें कीं वाटतें, हा मनुष्य एखाद्या कायमच्या भूकंपांत तर सांपडलेला नाहीं ना? हाताचीं बोटें मोडण्याची किंवा मानेला हिसका देण्याची कितीतरी जणांना संवय असते. अशी मंडळी बसतील तिथें 'कट् कट् कट्' असा आवाज करीत सुटतील. मिशीला पीळ भरणारे मोठे मजेदार लोक असतात. तो त्यांचा चाळा सुरू झाला कीं

त्यापुढें त्यांना कसलीहि फिकीर वाटत नाहीं. कुठल्या तरी विचाराच्या तंद्रींत लागल्यावर, मिशांना पीळ भरल्यानें त्यांना विचार करायला मदत होत असावी असें अनुमान करायला हरकत नाहीं. एका गृहस्थाला ही संवय इतकी लागली होती कीं, कांहीं प्रसंगामुळें त्याला आपल्या मिशांना रजा द्यावी लागली असूनहि त्याचे हात नेमके नेहमींच्याच जागीं जात !

स्त्रियांच्या वेगवेगळ्या तऱ्हांना 'चाळे' हें रूक्ष व गद्य नांव न देतां 'विभ्रम' किंवा 'ललितविभ्रम' असलें काव्यमय नांव देणेंच शोभेल. केवढें काव्य किंवा केवढी जादू असते या ललितविभ्रमांत! अर्थात् सर्वच स्त्रियांच्या ठिकाणीं हे विभ्रम पाहावयास सांपडणार नाहींत. कांहीं साध्याभोळ्या, 'अगदीं हिंदु' अशा स्त्रिया असतात. त्यांच्या ठिकाणीं असले विभ्रम मुळींच संभवत नाहींत. अशाच एका सीध्या किंवा साध्या मुलीनें एकदां एक कादंबरी वाचायला घेतली होती. त्यांतील नायिकेनें केलेले भ्रूभंग किंवा नयनविक्षेप यांचीं वर्णनें अनेक वेळां वाचून तिला वाटलें, आपणालाहि भ्रूभंग नाहीं का करतां येणार ? तिरक्या नजरेनें नाहीं का पाहातां येणार ? अशा विचारानें तिनें एका मोठ्या आरशासमोर स्वतःला उभें केलें, आणि डोळ्यांची ही कसरत करून पाहाण्याचा खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ ! तिला तें कांहीं केल्या साधेना. तेव्हां तिनें आपल्या मैत्रिणीला सांगितलें, "मेले कादंबरीकार भलभलतीं वर्णनें करतात. काय म्हणे भ्रूभंग ! नाठाळ मेले !" त्यावर त्या रसिक मैत्रिणीनें उत्तर देण्याच्याऐवजीं असे कांहीं मजेशीर डोळे करून तिच्याकडे बघितलें कीं, तिला त्या वेळीं पळूनच जावेंसें वाटलें.

कुठल्याहि निरोगी आणि आनंदी युवतीच्या ठिकाणीं ललित-विभ्रम हे असावयाचेच. तिचा तो स्वभावधर्म आहे. तिला ते केल्यावांचून चैन पडणार नाहीं. वृक्षाची पालवी नाहीं का नाचत ? वेली नाहीं का हलत–डुलत ? लाटा नाहीं का उड्या मारीत ? कळ्या नाहीं का लाजत ? तीच तऱ्हा कामिनींची. त्यांच्या डोळ्यांच्या हाल-चालींत इकडचें विश्व तिकडे करण्याचें सामर्थ्य असतें. त्यांच्या भ्रूभंगांत काय असतें हें सांगण्यापेक्षां काय नसतें हेंच विचारणें जास्त शोभेल. एका स्त्रीनें आपल्या धनुष्याकार भुंवया चढविलेल्या पाहून एका सत्पुरुषाचा जागच्याजागीं तोल गेल्याचें मला माहीत आहे.

हें झालें चांगल्या विभ्रमांचें. याच्या उलट कांहीं विभ्रम मोठे गमतीचे असतात. केस किंवा डोकें कराकरा खाजविणें, पदर तोंडांत धरून त्याचा चोळामोळा करणें, किंवा आश्चर्यप्रदर्शक म्हणून जीभ बाहेर काढणें इत्यादि प्रकार यांत येतील. माझ्या दृष्टीनें रूपवती अशा एका स्त्रीनें एके दिवशीं आश्चर्यप्रदर्शक म्हणून वीतभर जीभ बाहेर काढली ! त्या वेळीं अगदीं हुडहुडी भरल्यासारखें मला वाटलें.

कांहीं कांहीं लेखकांच्या तऱ्हाहि मोठ्या मजेशीर असतात. कोलरिजला अफूची गोळी ठासल्याखेरीज चैन पडत नसे. जॉन्सनला चहाचें कमालीचें वेड होतें. मेकॉलेनें त्याचें असें वर्णन केलें आहे—'He drank oceans of tea!—चहाचे तो समुद्रच पिई !' चेस्टरटनची प्रतिभा मदिरापानावांचून प्रसन्न होत नसे. हरिभाऊ आपटे आपल्या शरीरावर चाकू, कात्र्या, सुईदोरा, पेन्सिली, फाऊंटन पेनें, कागद इत्यादि वस्तूंचा फिरता बाजारच वागवीत असत. शब्दांच्या योग्य निवडीविषयीं एका फ्रेंच लेखकाला विलक्षण नाद असे. हा त्याचा नाद इतक्या कळसाला पोंचला कीं, स्वतःच्या प्रियेच्या प्रणयपत्रांतहि भावना योग्य शब्दांत व्यक्त झाल्या आहेत किंवा नाहीं हें तो पाही ! आणि तिला उत्तर देतांना प्रणयभाव व्यक्त करण्याच्या ऐवजीं तिनें केलेल्या अक्षम्य चुका दाखविण्यांतच त्याचें सारें पत्र भरून जाई ! असल्या तऱ्हेवाईक विद्वानांकडे पाहिल्यावर त्याच्याशीं जन्माची गांठ घालून घेतलेल्या साध्वीची कोणालाहि झालें तरी कींवच करावीशी वाटेल !

आपल्या इकडे विद्यमान लेखकांच्या खाजगी आयुष्यक्रमाची माहिती फारशी कोणाला नसते. तशी ती मिळवितां आल्यास नामांकित लेखकांच्या कितीतरी मजेशीर गोष्टी आपणाला कळतील. आपल्या राहत्या घरांत वारंवार बदल करण्याची तात्यासाहेब केळकर यांची वृत्ति पुष्कळांच्या परिचयाची असेल. हॉल असेल तेथें भिंत घालून खोली तयार कर, खोल्या असतील त्यांतील मधल्या भिंती पाडून त्यांचें हॉलमध्यें रूपांतर कर, छप्पर असेल तें काढून तिथें गच्ची कर किंवा गच्ची गळते आहे असें पाहून पुनः छप्पर कर अशा मजेशीर आलटा-पालटी त्यांच्या घरांत नेहमीं होत असतात. तुम्ही त्यांना एकदां भेटून

पुनः सहा महिन्यांनीं भेटायला गेलांत, तर चुकून आपण दुसऱ्याच्या घरांत तर आलों नाहीं ना असें तुम्हांला वाटल्यावांचून मुळींच राहणार नाहीं.

मला मात्र या त्यांच्या वृत्तीचें मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. कारण प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व असल्या तऱ्हांतूनच पाहावयास सांपडतें. आत्म्याचा खरा आविष्कार असल्या अनियंत्रित चेष्टांतून जसा होतो, तसा नियंत्रित, जाणिवेनें युक्त अशा व्यापारांत होत नाहीं. आणि म्हणून एखादी व्यक्ति तऱ्हेवाईक आहे असें समजतांच मला तिच्याविषयीं भयंकर प्रेमभाव वाटूं लागतो. या देदिप्यमान आत्म्याच्या सूक्ष्म छटा केव्हां एकदां पाहीन असें मला होऊन जातें. कारण एकेकाची (किंवा एकेकीची) तऱ्हा कांहीं औरच असते.

# कुसुमावती देशपांडे

## माध्यान्ह

आमची मे महिन्याची दुपार म्हणजे वाळयाच्या ताट्यांनीं मढविलेल्या व पंख्यांनीं विभूषित केलेल्या खोलींतच बहुधा जायची. अशा खोलींतल्या त्या मंद उजेडांत, कांहींशा अस्वाभाविक परंतु अत्यंत आल्हादकारक थंडाव्यांत आणि वाळयाच्या सुगंधांतच, निदान आम्हां वऱ्हाड्यांना तरी उन्हाळयाचें सारसर्वस्व सांठविल्यासारखें वाटतें. अर्धवट झोंपेंत एखाद्या कादंबरीचीं पानें चाळावीं, मधेंच या कुशीचें त्या कुशीवर वळून एकदां 'हुश्श्' करावें व पूर्णपणें निद्रेच्या स्वाधीन व्हावें, हाच आमचा कार्यक्रम. माझेहि हे दिवस बहुतेक असेच जातात.

पण एके दिवशीं ऐन उन्हाळयाच्या वेळीं बाहेर कोणीतरी आलें म्हणून मला व्हरांड्यावर पडावें लागलें, आणि त्या वेळेस मला कळून चुकलें कीं, निसर्गाला खरोखरींच आपलें सौंदर्य, आपलीं दुःखें, आपले आनंदाचे क्षण,– जें जें म्हणून आपल्या जीवनांत खरोखर महत्त्वाचें असेल तें तें–मानवी दृष्टीपासून दडवूनच ठेवावेंसें वाटतें. एरव्हीं ज्या वेळीं सृष्टीच्या दैनंदिन नाटकाला आत्यंतिक रंग चढतो, तेव्हांच तिच्या सान्निध्यांत रहायला मानव असमर्थ कां ठरतां? तिच्या जीवनांतला रस आपल्या अंतःकरणांत सांठविण्याची संधि साधून घेणें त्याच्या आंवाक्याबाहेर कां जातें?

मी बाहेर पडलें तेव्हांचें दृश्य अगदीं असेंच होतें. दृष्टीच्या सीमेपर्यंत काळी शुष्क जमीन पसरली होती. शब्दांच्या पलीकडे जिचें दारिद्र्य गेलें आहे अशा एखाद्या स्त्रीच्या अंगावरील फाटक्या चिंध्यांप्रमाणें वाळून कोळ झालेल्या गवताचे अवशेष भाजणाऱ्या वाऱ्यानें उगीचच भुरभुरत होते. दूरवर नजर फेकली तर मधूनच मृगजलाचे तरंग दिसत, मधूनच ती काळीभोर जमीनच तरळल्यासारखी—खालवर हालल्यासारखी वाटे.

मी कितीतरी वेळ तिथें उभी राहिलें–अगदीं दूरवर पहात उभी

राहिलें. दृष्टीच्या टप्प्यांतला कानाकोपरा मी निरखून पाहिला. सगळीकडे स्तब्धता–अनिमिष स्तब्धता पसरली होती. झोंप लागली होती का सृष्टीला ? छेः ! तिच्या जिवाची लाही होत होती. तिचा ऊर दाटून आला होता. तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. क्षितिजाच्या कडेवर थोडीशीं शिंदीचीं, कांहीं आंब्याचीं झाडें अंधुकपणें दिसत होतीं; पण त्यांची छाया कितीशी पुरी पडणार ? त्यांची त्यांनाच याची जाणीव असल्यामुळें तीं जणूं विमूढपणें निश्चल उभीं होतीं. एक कोरडा ठणठणीत रुंद रस्ता मात्र उन्हांत तळपत होता– त्या काळ्यामाईवरचें आपलें स्वामित्व प्रस्थापीत, विजयोन्मादानें तिच्या हृदयावर नाचत होता.

वर अथांग निळें आकाश पसरलें होतें. अस्फुट बोलांप्रमाणें एखाद-दुसरी घार तिथें त्याच त्या घिरट्या घेत होती. त्या बोलांसाठीं धरित्रीची धडपड होती का ? त्या अथांग आसऱ्याकडे ती डोळे लावून पहात होती. त्या निळ्या ओलाव्यासाठीं तिचा जीव पिपासला होता......

मला माझ्या एका मैत्रिणीची आठवण झाली. तिच्या जीवनांतल्या एका अत्युत्कट प्रसंगीं मी तिच्याजवळ होतें. अशीच ती हतबुद्ध झाली होती. तिचें विशाल, धैर्यशाली अंतःकरण दुःखानें भारावून गेलें होतें. तिच्याजवळ गेलें कीं माझे समाधानाचे शब्द आंतल्या आंत विरून जावेत– माझें पाऊल मंद व्हावें. अशा आत्यंतिक दुःखापुढें– त्याच्याशीं झगडणाऱ्या धैर्यशाली जीवापुढें– मस्तक आपोआपच नम्र होतें. त्या क्षणीं सृष्टिसखीहि अशीच आपल्या आंतरिक दुःखाशीं झगडत होती.

पण मला आणखीहि आठवणी झाल्या. पावसाळ्यांतील दुपार ! आषाढांतली रात्र आपल्या काळोख्या तीव्रतेनें कविलोकांच्या ध्यानांत भरली; पण आषाढी दुपार ! विश्वाच्या विविधतेंत रममाण होणाऱ्या कवींचींहि नजर वळवून घ्यायला सृष्टीला चित्रविचित्र पोषाख केला पाहिजे, नाहींतर कुठलेंतरी आत्यंतिक रूप घेतलें पाहिजे ना ? निसर्गाच्या अनाघ्रात सौंदर्यांत न्हाऊन निघालेल्या वेदकालीन ऋषींनीं उषेच्या सुषुमेवर कितीतरी स्तोत्रें रचलीं. तिच्यामधील दैवी अंशाची प्रतीति होऊन, त्यांनीं तिच्याजवळ तेजोमय जीवनाचा आशीर्वाद मागितला. पण माध्यान्हीची एकतानता त्यांनाहि जाणवली नाहीं. ग्रीक लोकांना निसर्गाच्या एकूण एक अवस्थेंत दैवी चैतन्य दिसलें व त्यांनीं त्या प्रत्येक

अवस्थेला मूर्तिमय स्वरूप दिलें, पण त्यांच्याहि सौंदर्यप्रेमी दृष्टीला माध्यान्हीच्या साध्याभोळ्या वृत्तींत देवताकरणाइतकी आकर्षकता दिसली नाहीं. सारखेपणाच्या शांतींतच ज्यांचें सौंदर्य सांठविलें आहे अशा गोष्टींकडे त्याचेंहि क्वचितच लक्ष्य जावें ?

खरोखर पावसाळी दुपार म्हणजे प्रेमळपणाची मूर्ति आहे. कॉलेजांतील अनियंत्रित दिवसांत कित्येक वेळां मी दुपारचा सर्वच वेळ खुल्या आकाशाखालीं घालविला आहे. त्या वेळीं सर्वजण मोठमोठ्या इमारतींत आपआपल्या कामांत दंग झालेलीं असल्यामुळें सारे रस्ते खुले होतात. मानवी श्वासाचा संपर्कहि नसलेला पावसाळी वारा अनिर्बंधपणें वागडूं लागतो. नुकतेंच वर मान करणारें कोवळें गवत आपले पंख फडफडूं लागतें, —त्या सौम्य उन्हानें जणूं धीट होऊन इकडेतिकडे पाहूं लागतें, हंसूं लागतें, —येऊन गेलेल्या सरीच्या थेंबांनीं झाडें-पानें चमकूं लागतात.

अशा वेळीं माझ्या एका मैत्रिणीला व मला आंत बसून जीव जसा कोंडल्यासारखा वाटूं लागे. कशाचीहि फिकीर न करतां, छत्रीचा कधींच विचार न करतां, आम्ही आमच्या हक्काच्या शेताटेकड्यांकडे वळावें.

एरव्हीं फिरायला गेलों कीं आम्हांला कोण संभावित बनावें लागे ! रस्त्यानें गुणगुणायची सोय नाहीं, मोठमोठ्यानें हंसण्याखिदळण्याची सोय नाहीं, कुठें थांबावेंसें वाटलें तर नीटच बसणें भाग. पण दुपार ! दुपार म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची वेळ. तें स्वातंत्र्य लाभलें म्हणूनच कीं काय आम्ही कितीतरी वेळ अक्षरहि बोलूं नये. प्रत्येकीचें मन त्या अपरंपार शांतींतच विलीन होऊन जावें. त्या विश्वस्त, प्रीतिमय, हळुवारपणानें फुललेल्या वातावरणानें जीव भारला जावा. टेकडीवर पोंचतांच कुठेंतरी लहर लागेल तिथें आम्ही अंग पसरून द्यावें. पूर्ण सुखमय आयुष्यांतदेखील इतक्या समाधानाचे क्षण क्वचितच येत असतील.

तिथें अद्‌भुतरम्य असें कांहींच नव्हतें. भरास आलेलीं, कोकिळेच्या गाण्यानें निनादलेलीं आंब्यांचीं झाडें नव्हतीं; संध्येचे विलास, तिची उत्कटता, तिचें गूढ औदासीन्य नव्हतें; उषेची चैतन्यपूर्ण खळखळ,

क्षणोक्षणीं बदलते रंग नव्हते;—कांहींहि नव्हतें. फक्त सारख्याच सारख्या दिसणाऱ्या टेकड्या व वर अथांग पसरलेलें काळसर निळें आकाश होतें. जलांशामुळें भारावलेला व त्यामुळें जणूं एकाच दिशेनें मंदपणें वाहणारा वारा होता; पण म्हणूनच तिथें शांति होती, विश्रब्धपणाचें समाधान होतें. म्हणूनच तिथें एक प्रकारच्या चिरंतन आनंदांत मन एकत्रित होई. अशा वेळीं जीवनांतल्या खेचाखेचीचें–सुखदुःखांच्या धांवपळीचें—खरें महत्त्वमापन होतें. सर्व निरर्थक विचारविकार गळून पडतात व जीवनांतील केंद्रीभूत सत्याचें आकलन होऊं लागतें.

हिंवाळ्यांतली दुपार तरी काय कमी मनोरम असते? त्या वेळच्या ऊबदार हवेची गोडी अस्सल सुखवाद्यांनादेखील पटेल. तिचा आस्वाद घेत उन्हांत पडलें असतांना डोळ्यांना चारी बाजूंना जणूं समृद्धीची ऊब दिसूं लागते. हेमन्ताचें सोनें सगळीकडे पसरलेलें असतें. गव्हांवर सोनेरी तांबुसपणा चढायला सुरुवात होते. कडूनिंबाच्या पानांचें सोनें होऊन तीं गरगरां शिवाशिवी खेळत हिंडूं लागतात. जसजशी शिशिराची कळा ओसरूं लागते, तसतशा भिगाऱ्यांच्या झाडांवर निव्वळ सोनेरी शेंगाच शेंगा लटकूं लागतात, तर पिवळ्या कांचनाचें झाड एकेका फांदीवर एकाद-दुसरेंच सुवर्णमय फूल घेऊन डोलूं लागतें. पराकाष्ठेच्या एकतानतेनें जणूं दोघेहि एकूण एक पानांना झुगारून देऊन आपल्या जीवनाचें सुवर्णमय ध्येय गांठण्याच्या आनंदांत विहरत असतात. भिगाऱ्यांच्या विस्तीर्ण वृक्षावरची एकेक शेंग किंवा कांचनाच्या फांदीवरचें एकेक फूल म्हणजे जणूं एकेका ओजस्वी कल्पनाबीजाचें प्रकाशमय मूर्त स्वरूपच! आपल्या जीवनरसाला बाहेर पडायला तेवढेच मार्ग ठेवून ते त्याचें जणूं प्रकाशांतच रूपांतर करतात व या सर्वांच्या भरीला सूर्याचे सोनेरी किरण. मिडास राजानें हेमंत-शिशिरांतील दुपारच्या सौंदर्याकडे डोळे उघडून पाहिलें नसावें का?

परंतु माध्यान्हीचें सौंदर्य स्थलावर किंवा ऋतूवर अवलंबून नाहीं. अद्‌भुततेपासून अलिप्त व कुठल्याहि तऱ्हेच्या अतिरंजनानें अदूषित अशा वास्तविकतेचें सौंदर्य तिच्यांत आहे व म्हणून जीवनाच्या मुख्य वृत्तीशीं तिची वृत्ति समरस होऊं शकते. जीवनसंगीताच्या स्थायी स्वराची मधुरता व महत्त्व तिच्यांत आहे. ती वेळ भावनेनें ओथंबलेली आहे; पण ती

भावना इतकी सखोल, इतकी संथ व अखंड आहे कीं, बुद्धीच्या अत्यंत प्रभावशाली झोतानें तिचें निरीक्षण करून घ्यावें. माध्यान्हीच्या वेळेंत समतोलपणाचें स्वास्थ्य, गंभीरतेचा आनंद सांठविलेला आहे. तींत उच्छृंखलपणा नाहीं, भडकपणा नाहीं. अभिजातपणाला साजेसें तिचें सौंदर्य आहे. प्रगल्भ हृदयाप्रमाणें तिचीं दुःखें निःशब्द आहेत. त्याच्याप्रमाणेंच तिचा आनंद शांत आहे.

* ग्रं. नं.

# र. गो. सरदेसाई

## खोटीं नाणीं

नवे नवे शास्त्रीय शोध लागले कीं त्यांचे नवे नवे उपयोगही माणसाला सुचूं लागतात. वास्तविक क्ष-किरणांचा शोध लागला तो डॉक्टरीच्या उपयोगासाठीं ! परंतु त्याचा उपयोग डॉक्टर लोकांप्रमाणेंच पोलिसांना होत असल्याच्या बातम्या केव्हां केव्हां ऐकूं येतात. नुकतीच तसली एक बातमी मी वर्तमानपत्रांत वाचली—

कलकत्ता—.

अलीपूर येथील एका बंगाली पोलिस सी.आय्.डी. ऑफिसरनें ॲसोसिएटेड प्रेसला दिलेल्या मुलाखतीवरून खोट्या नाण्यांचा शोध लावण्याच्या कामीं क्ष-किरणांचा पोलिसांना कसा उपयोग झाला याची मनोरंजक हकीकत बाहेर आली आहे. मिळालेल्या माहितीवरून सी. आय्. डी. ऑफिसरांनीं दक्षिण कलकत्त्यांतील एका घराची झडती घेतली. झडती चालू असतां घरांतील एका इसमानें आपल्याजवळील कांहींतरी वस्तु गिळून टाकल्याचें नजरेस आलें.

त्या माणसानें काय पदार्थ गिळला तें शोधून काढण्यासाठीं पोलिसांनीं त्याला मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्यें नेलें व तेथें त्याची क्ष-किरणांनीं तपासणी केल्यानंतर त्याच्या पोटांत तेवीस खोट्या आणेल्या असल्याचें आढळून आलें !

माणसाच्या पोटांत दडलेल्या रोगाप्रमाणेंच त्याच्या कायदेशीर गुन्ह्यांचाही रहस्यस्फोट करण्यास क्ष-किरणांचा होत असलेला हा उपयोग तो शोध लावणाऱ्या रॉन्टजेन या शास्त्रज्ञाला अभिप्रेत असेलच असें म्हणवत नाहीं. परंतु अमेरिकेंत गॅंग्स्टर लोकांच्या पाशवी अत्याचारांना ऊत आल्यापासून गुन्हे शोधून काढण्याच्या कामीं आतांशा शास्त्रीय शोधांचाच अधिकाधिक उपयोग करून घेतला जात आहे. खोटीं नाणीं पाडणें जसें जातां दक्ष पोलिसांच्या नजरेंतून निसटणें कठीण, तद्वत् तसलीं नाणीं उदरांत लपवूनही निभाव लागणें अशक्य !

माझ्या टेबलावर सकाळच्या चहाबरोबर येऊन पडणाऱ्या दैनिक पत्रांत मधून मधून बनावट नाणीं पाडण्याच्या आरोपावरून कोठें ना कोठें, कोणाला ना कोणाला तरी पोलिसांनीं पकडल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत असतात. बनावट नाणीं कशीं करतात याची मला माहिती नसली तरी तीं कां करण्यांत येतात याची मात्र मला कल्पना आहे. 'लोभ हा पापाचा परमेश्वर आहे' हें पुण्यप्रभावांतील वाक्य 'पाप हें धृतराष्ट्राप्रमाणें आंधळें आहे' या भावबंधनमधील वाक्याशीं जोडलें कीं, खोटीं नाणीं पाडणाऱ्यांच्या हेतूचा उलगडा होण्यास अडचण पडत नाहीं. कोणाचें लग्न जमत असेल तर, किंवा कोणाचा प्राण वांचत असेल तर बेधडक खोटें बोलावें असें धर्मशास्त्र सांगतें. त्याच शास्त्राचा सोईस्कर विपर्यास करून, स्वतःचा प्राण वांचवून संसार सलामत ठेवण्याची बनावट खोटीं नाणीं पाडण्याला काय हरकत आहे अशीच बनावट नाणेवाल्यांची विचारसरणी असेल कदाचित्, कोणी सांगावें?

परंतु एखाद्या कृत्याच्या पाठचा हेतु उमजला म्हणून तें कृत्य समर्थनीय ठरेलच असें नाहीं. खोटीं नाणीं पाडणारांच्या अज्ञानाची कींव आली तरी त्यांच्या पापाबद्दल क्षमा करावीशी वाटत नाहीं. कारण दोनचार बदमाष लोक स्वतःच्या स्वार्थासाठीं कोठेंतरी अज्ञात ठिकाणीं अंधारांत खोटीं नाणीं पाडतात; पण त्यामुळें तुमच्या-माझ्यासारख्या सभ्य समजल्या जाणाऱ्या गृहस्थांवर मात्र भर मंडळींत दांत पडण्याचा फजितीचा प्रसंग ओढवतो. आपण एखादा जिन्नस विकत घ्यावा व त्याची किंमत म्हणून खिशांतून मारे ऐटींत एक नाणें काढून दुकान-दाराच्या अंगावर फेंकून चालायला लागावें तोंच तो दुकानदार हेटाळणीनें संबोधतो—"अहो, अहो मिस्टर, हें नाणं खोटं आहे, चालत नाहीं—बदलून द्या पाहूं!" दुकानदाराचे हे शब्द ऐकून आपण सर्दच होतों व शेजारची प्रतिष्ठित मंडळी मिस्किलपणें हंसून आपली फजिती 'एन्जॉय्' करतात, तेव्हां तर आपण कोंडलेल्या मांजराप्रमाणें चिडतों व चरफडतों!

तुमच्यापैकीं पुष्कळांना हा अनुभव आला असेल. तुमच्या-माझ्यासारख्या सामान्य माणसांना खरें नाणें व खोटें नाणें यांतील फरक दर्शनींच कळून येत नाहीं. समाजांत दुष्ट व सुष्ट व्यक्ति जशा

केवळ पाहून ओळखणें कठीण, तद्वत् खऱ्याखोट्या नाण्यांतील फरक सामान्य दृष्टीला चट्कन् आकलन होण्यासारखा नसतो. त्यामुळें आपल्याला न कळत कोठून तरी एखादें खोटें नाणें पट्कन् आपल्या खिशांत केव्हांतरी घर करून बसतें आणि वरच्यासारखा एखादा फजितीचा प्रसंग आपल्यावर ओढवून आणतें.

नुकताच मी एका प्रतिष्ठित थिएटरांत इंग्रजी सिनेमा पाहावयास गेलों होतों. एक रुपया काउंटरवर देऊन तिकीट व मोड खिशांत घालून सरळ आंत जाऊन मी लठ्ठ लठ्ठ गादीच्या खुर्चीत देह लोटून दिला. सिनेमा संपून परत येतांना बसमध्यें दिलेली चवली कंडक्टरनें खोटी असल्याचें सांगून परत केली, तेव्हां रुपयाची मोड नीट पाहून न घेतल्याचें प्रायश्चित्त मला मिळालें हें मीं ओळखलें. परंतु एवढ्या अप्-टु-डेट थिएटरांत खोटें नाणें मिळेल अशी कल्पना मला असण्याचें कारण नसल्यानें माझ्या हातून ही गलती झाली.

ती खोटी चवली मी नंतर अनेक ठिकाणीं चालवून पाहण्याचा 'प्रामाणिक' प्रयत्न करून पाहिला; परंतु 'जिंदगी' बोलपटांतील रतनलाल-प्रमाणेंच मलाहि अनुभव आला कीं, ती 'बडी वफादार, सती सावित्री' आहे. माझ्या खिशाची ऊब सोडून जाण्यास तिची अद्याप तयारी नसल्यानें तिला 'उजविण्या'चे माझे सारे प्रयत्न आजतागायत तरी फुकट गेले आहेत. कुरूप मुली उजवितांना त्यांच्या बापांना काय यातना होत असतील याची मात्र कल्पना मला ती खोटी चवली उजविण्याच्या प्रयत्नांत आली. या अनुभवानेंच माझ्या डोक्यांत एक नावीन्यपूर्ण कल्पना आली हें खरें. अलीकडे थोर पुरुषांच्या स्वाक्षरी गोळा करण्याचा किंवा वापरलेलीं पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद पुष्कळांना असतो. तें एक फॅशनेबल व्यसनच झालें आहे आजकाल! तसा खोटीं नाणीं जमविण्याचा छंद माणसांना असता तर किती बरें झालें असतें असें मला तेव्हांपासून वाटत आहे. म्हणजे अशा एखाद्या नादी वेडप्याकडे मी माझ्याकडील खोटीं नाणीं खपवून मोकळा झालों असतों! (माझ्या वाचकांपैकीं कोणाला तसा नाद असल्यास मजकडील खोटी दुणेली मी त्याला सहा पैशाला देऊन त्याच्या हौसेखातर दोन पैशांचें स्वतःचें नुकसान करून घेण्यासही तयार आहे!)

माझ्याप्रमाणेंच तुमचाही अनुभव असेल असें मी धरून चालतों. खोटीं नाणीं कोठून, कशीं आपल्या खिशांत येतात तें कळत नाहीं व लोकांनीं तीं परत करीपर्यंत त्यांचा खोटेपणा आपल्याला उमजत नाहीं, आणि नंतर हा काय भुताटकीचा चमत्कार असावा याचा आपल्याला संभ्रम पडतो. खरें व कल्चर मोतीं यांतील फरक जसा सामान्य दृष्टीला आकलन होत नाहीं, तसाच प्रकार खरीं नाणीं व खोटीं नाणीं यांचा होतो. खऱ्या मोत्यांपेक्षां कल्चर मोतीं जास्त तजेलदार दिसतात, तद्वत् खऱ्या नाण्यांपेक्षां खोटीं नाणीं पुष्कळदां जास्त लखलखीत दिसतात. गर्भश्रीमंतांपेक्षां पोकळ श्रीमंतांचाच दिमाख अधिक असतो त्यांतलाच हा प्रकार! पण जग देखाव्यावर भुलणारें असल्यामुळें कल्चर मोत्यांचा सुळसुळाट झाला आहे आणि पोकळ श्रीमंतांप्रमाणेंच खोटीं नाणींहि बाजारांत 'भाव' खात आहेत!

केवळ तात्त्विक दृष्ट्या पाहिलें तर खोटीं नाणीं पाडण्याचें तें कृत्य गुन्हेगारींत कां मोडावें हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारशीं प्रतिस्पर्धी सरकार (Parallel Government) स्थापून भांडूं पाहणाऱ्या कॉंग्रेसच्या आत्यंतिक पुढाऱ्यांच्या ज्या कृतीचें लोक कौतुक करतात, त्या कॉंग्रेस-कल्पनेचें विडंबन करण्याचा प्रयत्न खोटीं नाणीं पाडणाऱ्या लोकांच्या मनांत नसेलच असें म्हणवत नाहीं. कोणी सरकारला तुल्यबल असें 'पॅरलल् गव्हर्नमेंट्' स्थापन करूं पाहतात तद्वत् कांहीं 'छुपे' देशभक्त सरकारी टांकसाळीशीं "पॅरलल् मिंट्" म्हणून खोट्या नाण्यांचा कारखाना काढूं पाहतात. पॅरलल् गव्हर्नमेंट जसें बनावट तशीं हीं नाणींहि बनावटच! पण पॅरलल् गव्हर्नमेंटवाल्या 'देशभक्तां'चे लोक गोडवे गातात आणि 'पॅरलल् मिंट'वाल्या 'दे.भ.'चे मात्र वाभाडे निघतात!

तसें पाहिलें तर सारें जग हाच मुळीं एक खोट्या नाण्यांचा प्रचंड कारखाना आहे. जगाच्या बाजारांत अस्सल खरीं नाणीं व कमअस्सल खोटीं नाणीं यांचें प्रमाण खरोखरीच रोज चरख्यावर सुत काढणारे कॉंग्रेसवाले व केवळ शपथेवर भागविणारे देशभक्त यांच्यासारखेंच आहे. जगांत शिवाजी एखादाच निपजतो, पण दुसऱ्या बाजीरावाची अवलाद मात्र ढेकणाच्या विणीनें निपजत असते. खोटीं नाणीं हीं जगाच्या पांचवीला

पुजलेलीं आहेत. फरक असेल तर त्यांच्यांत रुपें व हीण यांच्या प्रमाणाबाबतच असतो.

लोकांच्या मनोवृत्तीचें मला केव्हां केव्हां हंसू येतें. त्यांना खोटीं नाणीं चालत नाहींत, परंतु खोटे पुढारी मात्र चालतात! वेश्या, वकील आणि वैद्य या तीन 'व'कारांना पोटासाठीं खोटें बोलावें लागतें असें जुनें सुभाषित मला कुठेंतरी वाचल्याचें अंधुक आठवतें. सध्यांच्या 'पुरोगामी' काळांत मात्र खोटें बोलण्याचा, बेछूट थापा मारण्याचा अधिकार व्यापारी, देशभक्त व साक्षीदार यांच्या वांट्याला आलेला दिसतो.

लटके पुढारी, खोटे मित्र, खोटें वैभव, सारें कांहीं खोटें जगाला चालतें, पण खोटें नाणें मात्र चालत नाहीं हें नवल नव्हे काय? आणि गंमत ही कीं, ज्याला जग खरें नाणें समजतें व मोठी किंमत देतें, त्यांत रुप्याबरोबरच हीणही मिसळलेलें असतेंच. पैशाच्या ज्या कर्णमधुर आवाजानें बहिरेही जागे होतात, तो मधुर नाद नाण्यांत असलेल्या हीणाचाच प्रभाव असतो. खरें आपण खणखणीत वाजवून घेतों, त्या वेळीं आपल्या त्या कृतीचा खरा अर्थ त्या नाण्यांत योग्य प्रमाणांत हीण आहे कीं नाहीं हें अजमावून पाहणें असाच होतो हें कितीजणांच्या ध्यानीं येतें? हीण पाहून नाण्याचा अस्सलपणा पारखण्याची आमची पद्धत कांहीं और म्हटली पाहिजे! एकाद्या व्यक्तीच्या बदमाषगिरीचें माप करून तिला साधुत्वाचें शिफारसपत्र देण्यापैकींच हा प्रकार नव्हे काय?

खरीं नाणीं पारखून घेण्याची जी दक्षता समाज बाळगतो ती पुढारी किंवा मान्यवन्त लोक पारखून घेतांना जर दाखविण्यांत आली, तर कित्येक लोकांच्या रूपावरील दिखाऊ बेगड दूर होऊन आंतील हिडिसपणाचें दर्शन आपणांस किळस आणण्यास कारण होईल याविषयीं मला शंका नाहीं. मला वाटतें, या आत्मवंचनेचें दुःख टाळण्यासाठींच नाणीं पारखून घेण्याची कसोटी मान्यवर शिष्टांची पारख करतांना लावण्याचें समाज जाणूनबुजून टाळीत आला असावा. त्यामुळें सोनें कोणतें नि पितळ कोणतें याचें वर्गीकरण न होतांच सद्गुणी आणि सोंगाडे, कलावंत व कोल्हाटी, असली मंडळी त्या त्या क्षेत्रांत गर्दीनें वावरतांना दिसतात!

नाणें खरें असो कीं खोटें असो, तें 'चलनी' असेपर्यंतच त्याला व्यवहारांत किंमत. 'दिखनेमें ढब्बू और चलनेमें शिवराई' या म्हणीचा अक्षरशः अर्थ घेतला, तर या विधानाला तो पोषकच होईल. माणसें कितीहि चांगलीं व पराक्रमी असलीं तरी कांहीं कालानें तीं कालवश होतात, तशीं नाणींहि खरीं व खणखणीत वाजणारीं असलीं तरी कालांतरानें तीं इतिहासांत जमा होतात. शिवाजीच्या वेळचीं खरीं नाणीं देखील आज कोणाकडे असलीं तरी पुराणवस्तुसंग्रहालयापलीकडे त्यांना आतां कोण किंमत देणार? फार कशाला, कंपनी सरकारच्या वेळचीं नाणीं आज इंग्रज सरकारच्या राजवटींत चालणार नाहींत. नाण्यांचें महत्त्व त्यांच्या खरेपणावर व त्यांचा मान चलनीपणावर अवलंबून असतो. एकदां नाणें चलनांतून गेलें कीं तें कितीहि चांगलें असो, व्यवहारांत त्याला नंतर कोणी विचारीत नाहीं.

मान्यवर लोकांची स्थितीही तशीच असते. त्यांचा चालता काळ आहे तोंवरच त्यांचा बडेजाव राखला जातो. पण एकदां का ते 'टाइमबार' झाले, कीं आठवणी व आख्यायिका यांच्यापलीकडे त्यांना फार थोडें आयुष्य उरतें. गणेशोत्सवांत दरवर्षी नव्या गणपतीचें पूजन चालतें, तसें समाजांत नेहमीं नवे लोक पूजिले जातात. राणीछापाचा रुपया कायदेशीर नाणें असतांही त्याचा स्वीकार करण्यास पुष्कळांची कां कूं दिसून येते याचें कारण लोकांची नवपूजक वृत्तीच! नाण्याप्रमाणेंच पुढाऱ्यांत किंवा मान्यवंत मंडळींत समाजाला नेहमीं नवें नवें हवेंसें वाटतें.

आणि खोट्या नाण्यांना फावतें तें समाजाच्या या वृत्तीमुळेंच. खोटीं नाणीं वरून दिसायला चकचकीत दिसतात, तसे नवे पुढारीहि आवेशानें थबथबल्यासारखे भासतात. पण दोघांचाहि तो दिखाऊपणा तकलुबी असतो. ज्यांचा चालता काळ संपला आहे असे कांहीं इसम आपलें महत्त्व जाणवून देण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन थापा मारूं लागतात; पण पेंढा भरलेल्या मृत श्वापदाप्रमाणें हा प्रकार दिसायला मोहक असला, तरी निर्जीव असतो. खोटीं नाणीं जवळ बाळगणारा जसा बाजारांत फजित पावतो, तद्वत् असल्या खोट्या पुढाऱ्यांच्या नादीं लागणारे व्यवहारांत बत्तिशी फोडून घेतात.

खोटीं नाणीं, खोटे पुढारी यांच्याप्रमाणेंच आपल्याला दगा देणाऱ्या आणखी दोन बाबी म्हणजे खोटी बुद्धि व खोटी आशा— माणसाला खोटी बुद्धि झाली कीं, त्याच्या पायाखालीं दुर्दैवाचा खड्डा खणला गेलाच म्हणून समजावें. संशयकल्लोळांतील फाल्गुनरावाप्रमाणें

"खोटी बुद्धि कैंवि झाली ?"

असा पश्चात्ताप करण्याची पाळी पुष्कळांवर येते. खोट्या बुद्धीप्रमाणेंच खोटी आशाही घातकीच. खोट्या आशेनेंच माणसें आंकडे लावतात, शर्यत खेळतात; पण त्याचा परिणाम खोटें नाणें पदरांत पडण्यांत होतो. 'जिंदगी' बोलपटांतील रतनलालप्रमाणें जो खोट्या नाण्याला

"ये है मेरी जीवन आशा
यही है मेरी सारी पूंजी, यही है सब धन माया
आँख की ठंडक मनकी ढाढस अन्नदाता ये है"

असें मानील त्याची निराशा होण्याला कठोर व्यवहारांत वेळ लागणार नाहीं. ज्याचा दाम खोटा, त्याच्या कपाळीं गोटा हें ठरलेलें !

# श्री. स. भावे

## जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें !

जातीच्या सुंदरांना खरोखरच का कांहींही शोभतें ?

जे सुंदर असतील किंवा ज्या सुंदरी असतील त्यांनाच विचारून पहा ! पण आपल्याला अगदीं म्हटल्या वेळीं सुंदर किंवा सुंदरी कोठें भेटणार ? आपण एकाद्या अमेरिकन किंवा युरोपिअन तरुणीच्या प्रसाधन-मंदिरांत प्रवेश (अर्थात् काल्पनिक) करूं या !

तिच्या टेबलावरील सौंदर्य शोभविण्याचीं, वाढविण्याचीं किंवा खुलविण्याचीं वेगवेगळीं आऊतें आणि उपकरणें जर पहाल तर तुम्ही स्तंभित होऊन जालच, पण त्याबरोबरच जातीच्या सुंदरांना, तसेंच मानलेल्या सुंदरांना, कांहींही शोभत नसून विशिष्टच गोष्टी शोभतात याबद्दल तुमची खात्री पटेल.

मी आतांच आऊतें हा शब्द वापरला तो कोणाला अतिशयोक्तीचा वाटेल. पण अगदीं पूर्ण विचारान्तींच मी तो शब्द योजिला आहे. सौंदर्यसाधनाचीं खरोखर आऊतेंच त्या ठिकाणीं तुम्हांला आढळतील. जमीन करणाऱ्या शेतकऱ्याजवळ ज्याप्रमाणें तुम्हांला नांगर, कुळव, पाभर, कोळपें, खुरपें, दंताळें, विळा, कोयता...इत्यादि अनंत हत्यारें दिसतील, तशींच बरोबर तुम्हांला या टेबलावर सौंदर्याच्या मशागतीचीं आऊतें दिसतील. नखांची निगा करण्याचीं हत्यारें, तसेंच केसांना कुरळ कुरळ वेटोळीं पाडण्याचीं यंत्रें ... भिवया रेखीव करण्याचीं साधनें......

त्या सगळ्यांचीं नांवेंसुद्धां मला माहीत नाहींत. पण माझ्या-बरोबर जरा कांहीं वेळ त्या टेबलावरल्या वस्तू धुंडून पहा. ही पहा एक चामड्याची पेटी. किती लहान लहान शस्त्रें यांत मखमलीच्या गाद्यांवर व्यवस्थित ठेवलीं आहेत ! या सर्वांचा उपयोग केवळ नखें सुंदर करणें हा आहे. ही पहा सेल्युलाईडची एक अणकुचीदार सळी. हिचा उपयोग प्रथम नखें साफ करणें. दुसरें पहा एक कानकोरण्याच्या पात्याएवढें,

पण टोंकाला जरा धारेचें आणि खोलगट पातें असलेलें लहानसें शस्त्र. यानें नखांच्या बुंध्याकडे येणारी कातडी हळूंहळूं कापून तरी काढावयाची किंवा अलगत मागल्यामागें बसवून तरी टाकावयाची, आणि जिव्हाळ्या अलगत साफ करावयाच्या. ही एक मोठी कानस आहे. हिनें नखांचीं टोंकें घांसावयाचीं व त्यांना त्रिकोणी, अर्धचन्द्राकृति वगैरे इच्छित आकार आणावयाचा. ह्या एका चमत्कारिक टोंकाच्या कात्रीनें कानशीच्या धारेंतून राहिलेलीं नखाचीं बारीकसारीक टोंकें कापून टाकावयाचीं. ह्या एका ब्रशानें तीं मग साफ करावयाचीं.

पण एवढ्यानें कोठें भागणार ? ही एक दुसरी पेटी पहा. तुम्हांला वाटेल कीं, ही तरुणी चित्रकार आहे व तिच्या रंगाची पेटी आहे ही. ती चित्रकार असेल कदाचित्—आपल्याला तें आतां कसें कळणार ?—पण ही चित्रणाच्या रंगांची पेटी नव्हे, यावर विश्वास ठेवा. ह्या पेटींत एका बाजूला लहान लहान वाटोळ्या पावडरदाण्या आहेत. ह्यांतील इष्ट रंगाची पावडर आतांपर्यंत तयार झालेल्या नखांवर घांसावयाची. आणि मग ह्या ज्या दुसऱ्या रंगाच्या नळ्या आहेत त्यांतील इष्ट तो रंग—बहुधा गडद तांबडा—नखांवर हळुवार रीतीनें चढवावयाचा. मग हीं एवढीं कमावलेलीं, बोटांच्या मूळच्या लांबीच्या पुढें धांवणारीं, एकाद्या माणका-प्रमाणें चमकणारीं, रेखीव नखें हातवारे करतांना कशीं हलत असतील, याची कांहीं तुम्हांला नुसती कल्पनाच नको करावयाला—अमेरिकन चित्रपटांत तुम्ही तीं पुष्कळदां पहातां.

या प्रसाधनमंदिरांत परवानगीशिवाय आणखी जास्त वेळ थांबणें अर्थातच धोक्याचें आहे. तरी पण दबत दबत दोनचार गोष्टी पाहूं व मग पोबारा करूं. ही एक मोठी पेन्सिल पहा ! फार मऊ आहे ती. भिवया कमी असतील तर हळूंच ह्या पेन्सिलीनें दोन सुंदर धनुष्याच्या आकृती भिवयांच्या जागीं उठवून द्यावयाच्या ! काळाकुट्ट रंग देते ती ! ही दुसरी एक पेन्सिलीसारखीच जाड तांबड्या रंगाची नळी आहे. हिनें ओंठांना सुंदर रंग आणावयाचा हें तर आपण ताडलेंच असेल. हा एक तारांचा चाप आहे. हा डोक्यावर व्यवस्थेशीर बांधून चांगले दोनचार तास ध्यान धरून बसावयाचें म्हणजे केसांवर, अमर नसल्या तरी कांहीं काळ टिकणाऱ्या, सुंदर कुरळ्या वळ्या फुलून जातात.

त्याशिवाय पावडर–पफ वगैरेसारख्या परिचित गोष्टी पहाण्यांत आपण आतां वेळ न घालवूं या.

पण या टेबल धुंडाळण्यामध्यें आपण एक तत्त्वच धुंडाळलें नाहीं का कीं सुंदरींच्या मतें तरी त्यांना कांहींही शोभतें असें नाहीं! काय शोभतें हें ठरवूनच मग त्या आपला साज करतात, आणखी त्याकरितां अतोनात खटपट करतात, मोठमोठालीं किंमती मासिकें खरेदी करतात, निदान एकाद्या दैनिकाचें प्रसाधन सदर (Beauty Page) घेऊन तरी वाचतात, त्यांतील उपदेश यथाशक्य पाळतात, आणि त्यासाठीं मघां आपण पाहिलें तसलीं शस्त्रें-साधनें खरेदी करतात.

कोणाचें यावर प्रत्युत्तर येईल, "हीं सर्व पाश्चात्यांचीं वेडें आहेत! त्यांचें नसेल मत कदाचित् कीं, जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें म्हणून! पण आमचें आपलें भारतीय मत तसें आहे." म्हणणारा म्हणो असें, पण परिस्थिति मात्र त्याला याच्या अगदीं विरुद्ध आढळेल. अगदीं प्राचीन काळीं भारतीय ललना सौंदर्यसाजाकरितां काय काय करीत याचा अल्पसा परिचय जरी त्यानें करून घेतला तरी तो आपलें मत तत्क्षणीं बदलील. "पूर्वी पावडर, ब्रश, रंगाच्या नळ्या वगैरे कृत्रिम पदार्थ होतेच कुठें? कांहींतरी गप्पा मारतां आहां झालें! आम्हांला संस्कृत ग्रंथ वाचतां येत नसले तरी आम्हांला कांहीं जुन्या गोष्टींची कल्पना आहे कीं नाहीं?" असें आपण म्हणाल.

मला मान्य आहे कीं, पूर्वी असलीं कृत्रिम साधनें फारशीं नव्हतीं; पण आपले भारतीय मात्र रसिक नव्हते असें नाहीं. निसर्गातील सुंदर सुंदर पदार्थांचा उपयोग ते प्रसाधनाकडे करीत. लोध्र नांवाचें एक फूल आहे. त्यांत सुरेख मऊ अशी कितीतरी सुवासिक पावडर असते. त्या फुलाचाच 'पफ्' सारखा उपयोग करून स्त्रिया ही पावडर तोंडाला लावीत. अळत्याचीं पानें वाटून त्यांचा सुंदर लाल रंग ओंठांना व नखांना लावीत. कोंवळ्या कोंवळ्या मंजऱ्या तोडून कानांवर ठेवीत. आपल्या कलाकुशल सख्यांकडून नाजूक हातानें बारीक वेली गालांवर किंवा बाहूंवर काढून घेत. काजळाची एक छटा डोळ्यांत पाडीत. तांबड्या रंगाचें एक मोहक पिंपळपान भालप्रदेशावर रेखीत. चंदनाची गार उटी अंगाला लावीत ... मला तर पुष्कळदां असें वाटतें कीं, किती

मोहक आणि आकर्षक दिसत असतील त्या स्त्रिया ? त्यांच्या प्रसाधनापुढें प्रथम वर्णिलेला आधुनिक शृंगारसाज बराचसा कलाहीन ठरेल. पण तुलनेंत शिरा कशाला आपण ? आपण एवढें पाहिलें कीं, पूर्व गोलार्धात काय किंवा पश्चिम गोलार्धात काय, सौंदर्याला कांहीं कोणीं मोकळें सोडलें नाहीं. त्याला कलेच्या कह्यांत आणून शोभविलें, खुलविलें, वाढविलें. जातीच्या सौंदर्याला कृतीची पुष्टी दिली.

मग मुळांत म्हटलें कोणीं कीं,...जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें म्हणून ?

ह्या प्रश्न प्रथमच जर आपण केला असता तर या सर्व पाल्हाळांतून आपण सुटला नसतां का ? तें राहूं द्या; पण याचा आपण शोध करूं या कीं, हें तत्त्व काढलें कोणीं—शाहण्यानें कीं वेड्यानें ? कारण वेड्यानें जर तें प्रसृत केलें असेल तर त्याला तिथेंच सोडून दिलेलें बरें नाहीं का ?

आणि खरोखरच तें एका प्रेमवेड्यानें शोधून काढलें ! आणि तो म्हणजे असातसा कोणी नव्हे तर राजा दुःष्यन्त ! वास्तविक तो गेला होता शिकारीला म्हणून, पण थकल्याभागल्यामुळें विश्रांतीच्या उद्देशानें जो कण्वमुनींच्या आश्रमांत गेला तेथें विश्रांति घेण्याच्या आधीं प्रेमांतच सांपडला. फुलांनीं बहरलेल्या एकाद्या नाजूक लतेप्रमाणें सौंदर्यानें जिकडून तिकडून नुसती फुलून गेलेली शकुंतला आणि तिच्या दोन कमनीय मैत्रिणी झाडांना पाणी घालीत होत्या, आपापसांत थट्टामस्करी करीत होत्या, खेळत होत्या, खिदळत होत्या. त्या दृश्यानें त्या तरुण राजाला मोहविलें. झाडाआड लपून वृक्षसेचनाचा तो रमणीय देखावा डोळेभर पाहण्यांत तो अगदीं गढून गेला. त्याचें भान हरपलें. त्याचें मन शकुंतलेनें केव्हां पकडलें तें त्याच्या लक्ष्यांतसुद्धां आलें नाहीं. वास्तविक शकुंतलेचें प्रसाधनही कांहीं मोठें आकर्षक नव्हतें. ओबडधोबड वल्कलें नेसली होती ती. पण त्या प्रेमवेड्याला ती अधिकच मोहक वाटली ! त्याच्या तोंडून उद्गार आले—

किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ।

वेड्याच्या तोंडचे हे उद्गार ! पण शहाण्यांनीं त्यांची री ओढली. मराठी भाषेला तर ते इतके आवडले कीं ती म्हणायला लागली, 'जातीच्या सुंदरांना **कांहींही** (मोठीं अक्षरें आमचीं) शोभतें !' झालें ! लोकांच्या लक्ष्यांत राहिलें नाहीं कीं, एका प्रेमवेड्याचे आपल्या प्रियेबद्दलचे हे नुसते

उद्गार आहेत. झालें! सर्वांच्या तोंडीं हे शब्द एकाद्या सर्वमान्य तत्त्वाप्रमाणें वावरायला लागले!

आणि मला वाटतें व्यवस्थितपणाचा कंटाळा असलेल्या लोकांनीं पुढें मग त्या तत्त्वाचा जारीनें प्रसार केला असावा, दुसरें काय? प्रसाधनाला लागणारे श्रम घ्यावयाला नको असले म्हणजे मग कोणींही म्हणावें: 'जातीच्या सुंदरांना...!' शिवाय 'जातीचें सुंदर' म्हणजे कोण हें एक वादबीज यांतून निघतेंच, त्याकडे आपण आतां कानाडोळा करूं. पण आपल्या मनाशींच विचारूं या कीं, कोणीहि सुंदरी हें तत्त्व मान्य करील का? तिला जर सांगितलें, 'अहो, पुरे तुमचा तो प्रसाधनाचा खटाटोप. आमची एक साधी युक्ति ऐका. एक चांगली अठराहाती घसघशीत चंद्रकळा नेसा, केंसांची मोठी तीन पेंडांची वेणी घाला, कुंकवाचा मोठा थोरला मळवट भरा व हातांत चांगल्या काळ्या-हिरव्या जाड जाड बांगड्या—अगदीं 'वज्रचुडे' या शब्दाला शोभतील अशा—घाला, आणि फार तर डाव्या करांगळींत रामनामांकित ठसठशीत मोहरेची आंगठी घाला...या ठसठशीत नि टिकाऊ, पण स्वस्ताईच्या साजांत तुम्ही मुळींच वाईट दिसावयाच्या नाहींत. कारण 'जातीच्या सुंदरांना कांहींही...'' एवढें तुमचें बोलणें होईपर्यंत ती सुंदरी तुमच्यासमोर उभी राहील कीं नाहीं याबद्दल मला बळकट शंका आहे. पण जरी आत्मसंयमन करून तिनें तुमच्या पल्लेदार वाक्याच्या टोंकापर्यंत तुम्हांला घालवून नाहीं लावलें, तरी एकदां खो खो करून ती हंसेल तरी, किंवा तुम्ही वेडे म्हणून तुमची कींव तरी करील. एवढें खरें कीं, प्रसाधनकलेला 'मूले कुठारः' करणारें हें तत्त्व एकाद्या सुंदर स्त्रीला सांगण्याचा विक्रम करणारा कोणी या विसाव्या शतकांतील चवथ्या दशकांत भेटेल कीं काय याचीच मला जबर शंका आहे!

मात्र एवढें मला पटतें कीं, केव्हां केव्हां 'जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें' ह्या उद्गारांचा आपल्याला फार चांगला उपयोग करून घेतां येईल. प्रसाधनकला हें नांव आहे मोठें गोड, पण ती कला साध्य करणें फारच कठीण आहे. आपण अनेकदां पाहतों कीं, एकादी व्यक्ति स्वतःला एरवीं उत्तम रीतीनें सजविते, पण तिच्या लेण्यांत अनेक दोष राहून जातात. कधीं वस्त्राचा रंगच त्या व्यक्तीला शोभत नाहीं, तर कधीं

पावडर प्रमाणाबाहेर मारलेली अगर प्रमाणाहून कमी वापरलेली असते. एकादा मनुष्य त्याला शोभत नसतांना 'बटरफ्लाय् कॉलर' वापरतो, तर एकादा एरवीं गोरागोमटा, पण किडकिडीत मनुष्य, गांधी-सद्रा व जवाहरलाल-कुडतें घालून जणूं काय तो कित्येक आठवड्यांचा उपाशी आहे असा भास निर्माण करतो....असलीं कित्येक दृश्यें कोणाच्याहीं स्मृतिफलकावर हें वाचतांना जागृत होतील निश्चित ! अशा तऱ्हेच्या व्यक्तीचा व तुमचा जर संबंध असेल, आणि जर तिनें किंवा त्यानें तुम्हांला विचारलें, 'कसा काय झाला आहे पोशाख ?' तर 'आरशानें काय सांगितलें ?' असें उलट विचारण्याऐवजीं 'जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें' हें उत्तर फारच उपयुक्त ठरेल. समजणारा असेल तर दुरुस्ती करील; साधा असेल तर त्याला दुरुस्तीची जरुरीच भासणार नाहीं; भोळा असेल तर खुलून जाईल ! परिणाम कांहींही होवो, पण माझी ही सूचना म्हणजे 'जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें' या समजुतीच्या फोलपणाची जाहिरातच नव्हे का ?

# वि. द. साळगांवकर

## आवड-निवड

क्रिकेटचा चौरंगी सामना अगर एम्. सी. सी. टीम किंवा ऑस्ट्रेलियन खेळाडू यांसारख्या क्रिकेटपटूंची भेट अशा प्रसंगीं, मुंबई-सारख्या क्रीडाप्रिय शहरांत आनंद, उत्साह व तारुण्य यांची किती लयलूट होत असेल हें मीं सांगावयास हवें असें नाहीं. अशाच एका प्रसंगीं—तो चौरंगी सामन्यांतील हिंदु-मुसलमानांचा अगदीं चुरशीचा शेवटचा डाव होता—मी मोठ्या उत्कंठेनें क्रीडांगणाकडे चाललों होतों. ट्रॅम स्टॅंडवर येण्यापूर्वीच एका क्षेत्ररक्षक खेळाडूसहि शोभणाऱ्या चपळाईनें व हुषारीनें मी ट्रॅममधील एक जागा पकडून तीवर मोठ्या ऐटीनें सुखासीन झालों होतों. आमच्या ट्रॅममध्यें त्या वेळीं त्या दिवसाच्या मॅचशिवाय दुसरा कसला विषय असणार? सारे उतारू त्या दिवसाच्या खेळाचें अचूक भविष्य मोठ्या अधिकारपूर्ण वाणीनें वर्तवीत होते. नायडू किती धांवा काढणार, निसारांची गोलंदाजी किती जोरदार होणार, मर्चेंट फॉर्ममध्यें आहे कीं नाहीं इत्यादि सर्व अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा खल मोठ्या आस्थेनें, जोरजोरानें पण पूर्ण खिलाडूवृत्तीनें चालला होता. इतक्यांतच माझ्या समोरच्या बांकावर बसलेल्या एका गृहस्थाच्या तोंडून "काय हो, ही वीसपंचवीस हजार मंडळी या दहापंधरा खेळाडूंकडे तासचे तास रिकामटेकड्याप्रमाणें बघत बसतात याचें मला मोठें नवल वाटतें. तुम्हांला नाहीं हा वेडेपणा वाटत? मी फुकटदेखील क्रिकेटची मॅच पाहाणार नाहीं," असे उद्गार बाहेर पडले. हा गृहस्थ मध्यम वयाचा, विलायती थाटाचा पोषाख केलेला पण गबाळच दिसत होता, व त्याच्या हातांत एक बॅग होती. तो आपल्या शेजारच्या वकिलाशीं बहुतेक क्रिकेटच्याच गोष्टी करीत असावा व त्या बोलण्यांतच त्याच्या तोंडून वरील उद्गार सर्वांना ऐकूं जातील इतक्या जोरानें आले होते.

वरील शब्द कानांत पडल्याबरोबर आम्हां क्रिकेटप्रेमी मंडळींत

एकादा कुलपी गोळा पडून फुटावा त्याप्रमाणें आमची स्थिति होऊन, आम्ही सारेजण त्या गृहस्थांच्या जोडीकडे पांहूं लागलों. त्या पहिल्या गृहस्थाचा आम्हां सर्वांना राग आला हें सांगावयास नकोच. माझ्यामागें बसलेला एक अगदीं विसाव्या शतकांतला तरुण तर 'कोणीतरी पढतमूर्ख आहे झालें!' असें आपल्या सोबत्यास हलकेंच म्हणाला. परंतु सभ्यपणाच्या मर्यादा सोडून त्या क्रिकेटद्वेष्ट्या गृहस्थास त्याच्याविषयीं आपणांस काय वाटतें हें सांगण्यास इतर उतारूंना संधीच मिळाली नाहीं. कारण इतक्यांतच क्रीडांगणासमोरचें ट्रॅमचें नाकें आल्यामुळें ट्रॅममधूनच उड्या मारून कित्येक अत्यंत उत्साही तरुण रणांगणाकडे आवेशानें धांवणाऱ्या सैनिकांप्रमाणें मैदानाकडे धांवूं लागले. मीहि त्या ठिकाणीं उतरलों. पण ट्रॅम पुढें चालूं लागतांच मी त्या गृहस्थाकडे पाहिलें, तों तो महात्मा आम्हां सर्व मंडळींकडे बोट दाखवून कुचेष्टेनें हंसत होता.

आतां मात्र मला त्याची अत्यंत चीड आली. आणि प्रिय वाचकहो, त्याबद्दल तुम्ही मला दोष देणार नाहीं अशी आशा आहे. 'भिन्नरुचिर्हि लोकः' या वचनाप्रमाणें मला जें आवडतें, तें दुसऱ्यास मुळींच आवडत नसेल, परंतु आपणाला आवडत नाहीं अशी कोणतीहि गोष्ट दुसऱ्यास अत्यंत आवडते म्हणून त्याची कुचेष्टा करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? एकादा निग्रो आपल्या कृष्णवर्णी रूपवती प्रियतमेवर निस्सीम प्रेम करतो, अगर एखादी आई आपल्या वेड्याविद्र्या शेंबड्या पोराचें कौतुक करते, किंवा एखादा तरुण क्रीडांगणांतच इहलोकचा स्वर्ग मानतो. परंतु त्याकरितां जर कोणी त्यांना हंसूं लागला तर तें त्याच्या स्वतःच्या विकृत मनोवृत्तीचेंच प्रदर्शन होईल. कारण माणसांच्या आवडीचें मोजमाप, प्रमाण किंवा त्याचा निकष अजून कोणीं शोधून काढलेला नाहीं. आपल्या कुरूप पत्नीला नेहमीं चौपाटीवर फिरावयास घेऊन येणाऱ्या आमच्या परिचयाच्या एका गृहस्थाकडे पाहून माझा एक मित्र एकदां म्हणाला, "काय रे, हिला बरोबर घेऊन फिरतांना याला चमत्कारिक कसें वाटत नाहीं?" मीं त्यावर उत्तर केलें, "हा तुझ्या आवडीचा प्रश्न नाहीं; तिच्या नवऱ्याच्या आवडीचा आहे." यावर त्या माझ्या मित्राचें तोंड मिटलें हें सांगावयास नकोच!

परंतु कोणास काय आवडावें आणि आपल्या आवडीमध्यें कोणत्या दर्जाची अभिरुचि व्यक्त होते, हा मतभिन्नतेचा प्रश्न बाजूस ठेवला तरी प्रत्येकास असें कबूल करावें लागेल कीं, आपल्या जीवनांत आवडीला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. आवडीच्या पायऱ्या कोणीहि आवड, हौस, नाद, छंद, प्रेम, वेड, याप्रमाणें हव्या तशा लावाव्या; परंतु ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं सुखदुःख, आनंद, ध्येय, प्रीति इत्यादि गोष्टींचें जीवनांत जें महत्त्व तेंच आवडीचें आहे. आपल्या जीविताच्या सुखपूर्णतेचे अगर आनंदाचे कवींनीं कितीहि गोडवे गाइले तरी त्याचा दुःखदायक व निराशाजनक असा एक अत्यंत आवश्यक भाग आहे ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाचीच आहे. परंतु ज्या भिन्नभिन्न गोष्टींनीं पुष्कळदां अगदीं कटु वाटणाऱ्या जीवनास आपण अत्यंत मधुर अशी गोडी आणतों त्यांत आवडी प्रमुख होत. प्रत्येकानें आपल्या भोंवतालच्या स्नेह्यांच्या जीविताकडे किंचित् चिकित्सापूर्वक पाहिलें तर त्याला सहज असें दिसून येईल कीं, ते स्नेही आपल्या स्वतःच्या आयुष्यांतील अपुरेपणा, वैगुण्य अगर निराशा यांच्या कठोर धारा कोणत्या तरी आवडींनीं पूर्णपणें बोथट करून टाकीत असतात. किंवा या विषयाकडे आशापूर्ण दृष्टीनें पहावयाचें असल्यास मी असें म्हणेन कीं, आपल्या जीवनांत सांपडणारीं आनंदस्थानें अगदीं अपुरीं वाटल्यामुळें कीं काय, ही मंडळी वेगवेगळ्या नादांनीं अगर आवडींनीं आपल्या जीवितांत अधिक आनंद व उत्साह उत्पन्न करीत असतात.

कित्येकांना नुसत्या वाचनांत वारुणीची मादकता सांपडते, तर कित्येक पोस्टाचीं तिकिटें, नाणीं, चित्रें, पोथ्या, काठ्या, ग्रंथ इत्यादिकांचा संग्रह करून तद्वारां आपण केवळ आनंदाचाच नव्हे, तर पुण्याचाहि संचय करून ठेवीत आहों अशासारखी वृत्ति ठेवीत असतात. असला नाद असलेल्या कोणत्याहि गृहस्थाकडे तुम्ही जा, तो तुमच्याशीं आपल्या विशिष्ट आवडीविषयीं बोलल्याशिवाय व आपल्या आनंदाचे कांहीं घुटके तुम्हांस आपल्या चहाबरोबर पाजल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. तो आपल्या तिकिटांचा अगर नाण्यांचा संग्रह तुम्हांस दाखवील, तुम्ही त्याचें कौतुक करावें अशी अपेक्षा करील व तुम्हांलाहि त्यांत आनंद वाटतो कीं नाहीं हें मोठ्या उत्कंठेनें पहात राहील.

माझ्या माहितीच्या एका गृहस्थाला आपल्या गांवच्या जुन्या इतिहासाबद्दल माहिती गोळा करण्याचा अत्यंत नाद होता. कोणीहि नवा गृहस्थ कोणत्याहि कारणानें या गृहस्थाकडे गेला कीं शेवटीं त्याच्या आवडत्या विषयावर बोलणें यावयाचें, आणि मग त्या गृहस्थास अगदीं आस्थापूर्वक आपल्या गांवच्या इतिहासाची सारी माहिती सांगावयाची, अशी त्यास संवय जडलेली होती. अर्थातच जीवन हें यंत्रवत् आहे अशा वृत्तीनें चालणारे अगर अल्पसंतोषी लोक या गृहस्थास शुद्ध वेडा म्हटल्याशिवाय राहणार नाहींत यांत मला मुळींच संशय वाटत नाहीं. परंतु या अगदीं क्षुल्लक दिसणाऱ्या आवडीपासून त्या गृहस्थास किती आनंद मिळत असेल याची त्यांना काय कल्पना? त्यांच्या व्यावहारिक दृष्टीला असल्या आवडींत वेळ व पैसा यांचा व्यय करणें यांत मूर्खपणाच दिसत असतो. आणि ते म्हणतात कीं, यापेक्षां हा वेळ अधिक पैसा मिळविण्यांत घालविला आणि आपल्या गृहिणीची बऱ्याच दिवसांची दागिन्यांची एकादी मागणी पुरविली अगर तो बँकेंत जमा केला तर अधिक चांगलें नाहीं काय?

या व्यवहारचतुर गृहस्थांना फारसा दोष द्यावयास मी तयार नाहीं. कारण त्यांची दृष्टि त्यांच्या छोट्या संसाराच्या चार भिंतींच्या पलीकडे जाऊंच शकत नाहीं. मग त्यांना हौसेला अगर आवडीला किती अपरिमित मोल असतें याची काय कल्पना असणार? त्यांना ही गोष्ट माहीत नसते कीं, मानवी अंतःकरणांत कोठेंतरी अतृप्त अशी प्रेमज्योति असते, आणि ती पूर्णतेकरितां अगर ऐक्याकरितां धडपडत असते. परंतु त्याखेरीज त्या अंतःकरणास विरंगुळाच वाटत नाहीं. जॉर्ज इलियटच्या 'सायलस मार्नर' या कादंबरींत लेखिकेनें हेंच सत्य फार सुंदर रीतीनें दाखविलें आहे. सायल्स हा सर्व जगानें टाकलेला व मानवजातीस वैरी समजणारा एक मनुष्य असून एके दिवशीं त्यास अकस्मात् एक मोठी रक्कम सांपडते. त्या दिवसापासून तो कवडीचुंबक बनतो आणि द्रव्यप्रीति हेंच त्याच्या जीविताचें इतिकर्तव्य होतें. परंतु सोन्याच्या आवडीच्या पलीकडील अगदीं विशुद्ध व निःस्वार्थी असें जें प्रेम त्याबद्दलची त्याची भूक शांत होण्याची संधि यानंतर लवकरच त्याच्या जीवितांत येते. कारण एक दिवस कोणीतरी त्याच्या झोंपडींत

५५५

एक अनाथ अर्भक ठेऊन जातें. आणि त्या मातृहीन मुलीच्या रडण्यानें त्याच्या अंतःकरणांत एका नव्या प्रीतीचा उदय होतो आणि तो त्या मुलीचा आजन्म पालक व गुलाम होतो. हा प्रसंग म्हणजे सायलसचा नवा जन्मच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण तेव्हांपासून त्याचें जीवन आनंद व प्रेम यांनीं अगदीं परिपूर्ण होऊन जातें.

आपण कसलीतरी गोड हौस अथवा नाद असलेल्या गृहस्थांकडे पहा. कोणास संगीताची आवड, कोणास चित्रकलेची, तर कोणास शारदोपासनेची. किती आनंदी वृत्ति असते त्यांची! जीवन किती हलकें वाटतें त्यांना! आणि त्यांच्या उत्साहाचा झरा किती जोरानें वर उसळत असतो! आणि जर स्वतःच्या किंचित् वर जाऊन याच लोकांनीं आपल्या आवडी-निवडीला थोडें सार्वजनिक स्वरूप दिलें तर समाजाचें किती हित होतें? तुकारामासारख्या संतांना विठ्ठलभक्तीची आवड वाटली; अकबराला विश्वधर्मसंस्थापनेचीं सुखस्वप्नें पडूं लागलीं; महात्माजींना हरिजनसेवेचें वेड लागलें; आणि अगदीं अलीकडे बॅ. सावरकर व माधव ज्यूलियन् यांना मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचा नाद लागला आहे. या थोर लोकांच्या या नादीपणाला अजूनहि पुष्कळ लोक वेड हें नांव देतात. हें वेड तर खरेंच, पण किती सुंदर वेड हें! राजवाड्यांनाही जुने कागद व पत्रें गोळा करण्याचें अशाच प्रकारचें वेड लागलें होतें. पण त्या रद्दींत किती बहुमोल ऐतिहासिक रत्नें त्यांच्या हाताला लागलीं! लॉर्ड बेडन पॉवेल यांनीं सेवानिवृत्त झाल्यानंतर बालवीर चळवळ सुरू केली. वरच्यासारखें वेडच हें; आणि प्रथम प्रथम त्याची कुचेष्टा झालीच. परंतु या सर्व नादी लोकांच्या वेडांतून समाजाची किती प्रगति झाली! कारण कांहीं झालें तरी हें वेड सामान्य लोकांचें नव्हतें. त्याच्या बुडाशीं कर्तृत्वशक्ति, मनाचा थोरपणा व तेजस्वी चिकाटी यांचा भक्कम पाया होता; आणि त्या वेडांत हॅम्लेटच्या वेडाप्रमाणें एक प्रकारचा व्यवस्थितपणाहि होता. मग त्या वेडास वेड कोण म्हणेल?

परंतु आवडीचें अधिक गोड पण किंचित् वेगळ्या प्रकारचें स्वरूप पाहावयाचें असेल तर तें कलाविलासांत आपणांस दिसून येईल. आवड ही कधीं स्थिर नसते व मानवी स्वभावाच्या लहरीप्रमाणें ती पालटते आणि म्हणूनच आपणांस पुष्कळदां रुचिवैचित्र्य दिसून येतें. कला

तर अगदीं फुलपांखरासारखी आहे. तिचें सर्वात्मक असें स्वरूप तुम्हांस कधींच सांपडणार नाहीं. म्हणूनच ती एके ठिकाणीं काव्यसंपदा निर्माण करते, दुसरीकडे चितान्याच्या कुंचल्यांतून नवी सृष्टि रंगविते, क्वचित् संगीतब्रह्मानें हें विश्व भरून टाकते, तर कुठें कुशल शिल्पकाराकडून जीवनाचा आनंद प्रकट करविते. परंतु असा आदर्श कलावंत कुठें आहे कीं जो या सान्या कलांचा स्वतःच्या ठिकाणीं स्वरसंगम करवून कलासृष्टि निर्माण करील ? कारण कला ही जशी गुलामाप्रमाणें कलावंताची सेवा करते तशी ती त्याच्याकडून सेवाही करवून घेते. नुसत्या कलेच्या आवडीनें कलेची सेवा होत नाहीं. तिच्याकरितां जीवनसर्वस्व वेंचावें लागतें, अथवा तिचें वेड लागावें लागतें. एखादा प्रेमी जीव एखाद्या कठोर सुंदरीच्या प्रेमानें वेडा होऊन निराशेंत आत्महत्या करतो तेव्हां आपण त्याच्या हळव्या मनाची अगर प्रेमाच्या वैचित्र्याची कींव करतों. परंतु कलेचें वेड लागलेल्या कलावान् लोकांबद्दल आपण इतकी सहानुभूति कधींच दाखवीत नाहीं. प्रत्यक्ष उपासमार होत असतांहि उदरनिर्वाहाचे राजमार्ग सोडून काव्यसंपदा वाढविणारे महाकवि, क्षुद्र जनरुचीला न जुमानतां उत्कृष्ट संगीताची अगर चित्रकलेची निर्मिति करणारे मिलेटसारखे कलावंत, आणि 'नवी दृष्टि, नवी सृष्टि व नवी तुष्टि' यांच्याकरितां आपल्या प्रतिभेनें नवें वाङ्मय निर्माण करणारे वाग्भट, यांना प्रथम लोक वेडे म्हटल्यावांचून रहात नाहींत. परंतु त्यामुळें त्यांच्या कलोपासनेंत कधींहि व्यत्यय येत नाहीं. कारण 'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' हीच आपल्या कार्याच्या बाबतींत त्यांची दृष्टि असते. मग याला कोणी ध्येयवाद म्हणोत, कोणी कलोत्कटता अगर प्रतिभा म्हणोत. परंतु ही गोष्ट सत्य आहे कीं कलांची पराकोटीस गेलेली आवड, नाद, छंद अगर वेड यांतूनच कलांची उत्पत्ति, जोपासना आणि वाढ होत असते. ही आवड नसती तर कीट्ससारख्या वैद्याच्या हातून उत्कृष्ट काव्य अगर कॉनराडसारख्या नाविकाकडून उत्कृष्ट कादंबरीवाङ्मय निर्माण झालें नसतें. तसें नसतें तर कै. कोल्हटकरांसारखे वकील आपला साहित्यसंसार थाटूं शकले नसते अगर खांडेकरांसारखे पंतोजी आपली कलासृष्टि निर्माण करण्याऐवजीं विद्यादान करीत राहिले असते.

परंतु कोणतीहि कला तिच्या वेडाशिवाय विकसित होत नाहीं, हा नियम कलावंतांना लागूं असला तरी सर्वसामान्य लोकांना मात्र तो लागूं होत नाहीं. कारण सर्वसामान्य लोक आपल्या आवडीला कोणत्याहि एका विषयावर संकुचित करण्यापेक्षां तिला जितकें जास्त विस्तृत क्षेत्र देतील तितकें चांगलें. अर्थात् प्रत्येक माणसास सर्वच कांहीं आवडतें असें नाहीं. परंतु आपणांस पुष्कळदां अप्रिय गोष्टींत देखील अभिरुचि उत्पन्न करून घेतल्यावांचून चालतच नाहीं.

या ठिकाणीं माझ्या माहितीच्या दोघां गृहस्थांची मला आठवण होते. यांतील एक अत्यंत विद्वान् प्रोफेसर होते. परंतु टेनिस वगैरे खेळांबद्दल त्यांस कुतूहल तर नव्हतेंच, पण त्यांचें त्यांविषयींचें अज्ञान अगदीं वाखाणण्याजोगें होतें. पण त्यांना अगदीं आजतागायत (up-to-date) होण्याची मोठी महत्त्वाकांक्षा. आणि ते गृहस्थ जिकडे जात तिकडे बहुतेक खेळाच्याच गोष्टी ! शेवटीं स्वारीनें आपल्या विषया-प्रमाणें क्रीडाविषयांतहि तज्ञ होण्याचें ठरविलें. पुष्कळशा मॅचिस् पाहिल्या आणि सार्‍या खेळांची सारी शास्त्रोक्त माहिती मिळविली. आणि आतां तर खेळांच्या बाबतींत ते मोठे खांसाहेब झाले आहेत !

दुसर्‍या गृहस्थांना नेहमीं फिरतीवर जावयाचें असे, आणि त्या ठिकाणीं त्यांनीं पाहिलें कीं, ब्रिज् आल्याशिवाय आपल्या कुठेंही ओळखी होणार नाहींत. पण त्यांना पत्त्यांचा मनस्वी वीट वाटत असे आणि ब्रिज् म्हणजे त्यांस मोठें गूढच वाटे. पण शेवटीं बसले एकदां ब्रिज् शिकायला. हळूंहळूं त्यांस गोडी वाटूं लागली आणि मग ते त्याचे जवळजवळ चँपियन बनले. याप्रमाणें जरी पुष्कळदां आपणांस कित्येक गोष्टींचा वीट वाटला, तरी कुतूहलानें, अभ्यासानें आणि बळजबरीच्या का होईना पण आवडीनें, आपणांस त्यांविषयीं अभिरुचि उत्पन्न करून घेऊन त्यांचा आनंद अनुभवतां येतो. आणि जितक्या आपल्या आवडी जास्त व विविध, तितकें आपणांस जीवनांत अधिक नाविन्य आणि वैचित्र्य सांपडत असतें. चित्रकला, वाङ्मय, खेळ, राजकारण, धर्म, शिक्षण, संगीत वगैरे अनेक विषयांची आवड असणारी मंडळी जर एकत्र जमा झाली, आणि त्यांचें बोलणें सुरू झालें, तर त्यांत किती मजा येत असेल ! आणि किती लीलेनें ते सार्‍या विश्वास गवसणी

घालीत असतील! हा आनंद एकाच विषयांत मुरब्बी झालेल्या तज्ज्ञ लोकांना, त्यांनीं कितीहि प्रयत्न केला तरी, कधींतरी अनुभवतां येईल काय?

यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, मानवी मन म्हणजे तुम्ही असा एखादा अजबखाना समजतां कीं काय, कीं ज्यांत वाटेल ती चीज सांठवतां येईल? सध्यां वैशिष्ट्याचे दिवस आहेत. कोणत्याहि एका विषयाच्या एका शाखेंत देखील पुरी प्रवीणता मिळविण्यास आज आपला जन्म पुरा पडणार नाहीं. अशा वेळीं तज्ज्ञ होण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं जर फुलपांखराप्रमाणें आपण या विषयावरून त्या विषयावर उड्या मारूं लागलों तर विद्वत्तेला अगर ज्ञानोपासनेला अवसर कसा मिळेल? आम्ही वेदवेदांगांत प्रवीण आहों; मराठा-मोंगल इत्यादि इतिहासांचें कानेकोंपरे आम्हांस माहीत आहेत; परराष्ट्रीय व हिंदी राजकारणाच्या गुंतागुंतींतून आम्ही सुखेनैव तुम्हांस नेऊं; सोन्याचांदीच्या लढाया व अर्थशास्त्राच्या भानगडी आम्हांस करतलमलवत् आहेत; अगदीं शंभर टक्के समाजसत्तावाद अगर फ्रॉइडचे ऊनऊन सिद्धांत यांचा आम्ही शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे; परंतु हा आमचा तज्ज्ञपणा त्या त्या विषयापुरताच आहे. कारण केवळ एका विषयालाच आम्ही आमचें जीवन वाहिलें आहे.

या वैशिष्ट्यवाद्यांना मी म्हणेन कीं, "महाभागहो, तुमच्या थोरपणाची जाणीव मला आहे. तुमचें ज्ञानार्जन ही अत्यंत पवित्र गोष्ट आहे व निष्कामवृत्तीनें वागून ज्ञानसाम्राज्याच्या सीमा दूरदूर नेण्याचें तुमचें कार्यदेखील अत्यंत थोर व आदरणीय आहे. हें ध्येय पुढें ठेवून ज्ञानोपासना करणाऱ्या तुम्हां आचार्यांना कोण वंदनीय मानणार नाहीं? परंतु सर्वसाधारण माणसाचें काय? त्याचें जीवन किती अत्यल्प आणि त्याच्या मर्यादादेखील किती संकुचित! एकाद्या विषयाच्या मागें लागून त्यांत पारंगतता मिळविण्याइतकी बुद्धिमत्ता, चिकाटी आणि परिस्थिति देखील त्याची नाहीं. ज्ञानदीपावर एकसारखी झडप टाकून त्यांत आपल्या जीविताचा महायज्ञ करणारा तो जीव नाहीं, तर जगाच्या बागेंत फिरणारें तें एक फुलपांखरूं आहे. आणि म्हणून या उद्यानांतून जितका अधिक मकरंद व आनंद तो मिळवील तितकें त्याचें जीवन

अधिक परिपूर्ण व उत्साही होईल." याकरितां संसार सोडावयास नको अगर आपल्या कुटुंबियांची उपेक्षाही करावयास नको. थोडी चिकित्सात्मक व उत्साही वृत्ति आणि मोकळें मन यांच्या जोरावर त्यास आपल्या जीवनांत कितीतरी अधिक आनंदाचा लाभ करून घेतां येईल !

ग्रं. नं.

# गं. भा. निरंतर

## मनमोकळेपणा

माणसाचें मन हा एक अजबखाना आहे. प्रत्येकानें आपल्या मनांत डोकावून पाहिलें तरच हा स्वसंपादित अजबखाना पाहावयास मिळतो. एकाला दुसऱ्याचें मन पाहतां येत नाहीं, कारण प्रत्येकजण आपलें मन दुसऱ्यापासून लपवीत असतो. मनाची झांकली मूट किती लाखांची भरेल कोणाला ठाऊक! ती सव्वा लाखाची असो वा तेहतीस कोटींची असो, ती झांकलेली असते हें मात्र नक्की. एखाद्या सुरक्षित एकान्तांत जाऊन आपण आपल्या मनावरचें व्यवहाराचें झांकण काढलें आणि आंत डोकावून पाहिलें तर काय काय दिसेल? बालकृष्णानें एकदां तोंड उघडलें व यशोदेनें तें पाहिलें. त्यांतील चौदा ब्रह्मांडें पाहून ती मायमाउली घाबरून गेली व शेवटीं कृष्णाला पायां पडून म्हणाली कीं, "माझे आई, हें तोंड मीट!" तसेंच आपापलें मन पाहाणाऱ्यास वाटेल.

ज्यानें त्यानें आपापलींसुद्धां मनें डोकावून पाहणें असेंच भयंकर आहे, मग एकमेकांचीं दूरच! एवढ्याशा किंवा एवढ्या मोठ्या मनांत एकीकडे 'प्रिय' नामक व्यक्तींचा द्वेष, मत्सर यांचे ढीग असतील, तर दुसरीकडे कांहीं कारणांसाठीं 'शत्रू' झालेल्या व्यक्तींबद्दलचा छुपा आदर असेल. 'वाईट-वाईट', 'शिव-शिव' म्हणून तोंडानें धिक्कार-लेल्या वासनांचा वास एखाद्या कोंपऱ्यांत येईल, तर विनयाखालीं किंवा हीनगंडाखालीं दडपलेल्या अत्यंत उदात्त अशा विचारांचे, मनोरथांचे बागबगीचे एखाद्या ठिकाणीं फोंफावत असतील. तोंडावर आशेचा उजळा असला तरी आंतील मनांत निराशेचा कोंदटलेला अंधार असेल, आणि जरा जास्त मनमोकळेपणानें मनोभूमींत फिरूं लागलों तर विवेकबुद्धीचे भयंकर हल्ले आपल्यावर होऊं लागतील. मनोभंग झाल्यामुळें, दडपशाही झाल्यामुळें, उपासमार व उपमर्द झाल्यामुळें चवताळलेली विवेकबुद्धीरूपी वाघीण तर मनाच्या गुहेच्या तोंडाशींच बसली आहे!

म्हणूनच सामान्यतः मनुष्यप्राणी त्या वाघिणीच्या नादीं लागत नाहीं. ती फारच चवताळली तर कांहींतरी अमली पदार्थांचें विष टोंचून तिला माणूस बेशुद्ध करतो. विवेकबुद्धीचे लाड माणसाला व्यवहारांत पुरवतां येत नाहींत, तिच्या आज्ञा पाळतां येणें मुष्कील होतें, आणि ती तर क्षणोक्षणीं चवताळते. शेवटीं, तिची बोंचणी कमी करण्यासाठीं माणूस गरजेप्रमाणें कमजास्त सामर्थ्यवान् व्यसन मदतीस घेतो!

म्हणजे काय, आपल्या आपल्यापुरतासुद्धां मनमोकळेपणाचा प्रयोग फार भयंकर आहे. आणि तो आपण करीत नाहीं यांतच सामान्य माणसाचें संरक्षण आहे. त्या भंगलेल्या आशा, ते कोलमडलेले मनोरथ, तो जीविताचा झुलता मनोरा, ते प्रेमभंग आणि तें...असेंच कांहींतरी, कीं जें ज्याचें त्याला माहीत—कोण ती अडगळ बघत बसतो? अपेक्षा मेली कीं, मनाच्या स्मशानांत ती खोल पुरून टाकायची, विस्मृतीची माती लोटायची आणि मृत अपेक्षांच्या खतांत नवीन रोंपटीं लावायचीं हा धोपट मार्ग. मोकळें करून पाहत बसण्याइतकें मनोवेधक किंवा लोकांना दाखविण्याइतकें रम्य मन किती लोकांचें असतें? म्हणून आपण आपल्या मनाशींसुद्धां फारशी बातचीत कधीं करीत नाहीं.

तरी व्यवहारांत पहिला नियम सांगतात कीं, माणसानें कसें मनमोकळें असावें. पण व्यवहारांतील इतिहास पाहिला तर मनमोकळेपणाचें वेड असल्यानें जितक्या माणसांचें मातेरें झालें आहे, जितक्या लोकांचा जीवितव्यापार डबघाईस आला आहे, तितक्या प्रमाणांत 'आंतल्या गांठीच्या' माणसांचें नुकसान झालेलें नाहीं. साधी आपली तुमची आमची मैत्री घ्या ना. माणसाला मित्र व मतें यांचा आधुनिक समाजप्रिय सुधारणेच्या काळांत काय तोटा आहे? कंपूशाहीच्या मोठमोठाल्या छावण्या सर्व देशभर पडल्या आहेत. पण मित्र कोठवर? एकमेकांनीं मन मोकळें केलें नाहीं तोंपर्यंत! अगदीं 'दोन शरीरांत वावरणारें एक मन' अशी मैत्री असू द्या, पण कधीं मन मोकळें करण्याच्या फंदांत पडायचे नाहींत. मित्राला सांगून पाहा, 'तुझें अमक्या बाबतींतलें वर्तन चांगलें नाहीं'; तो लगेच मैत्रीचा व्यवहार पुरा करून, श्रीशिल्लक शून्य काढून, मनमोकळेपणानें तुमची निंदा करूं लागेल.

माझ्या एका तरुण मित्रानें विवाह केला. विवाहाच्या पूर्वीच

त्याची 'थिअरी' अगदीं तयार होती. वैवाहिक सुखाच्या शोधासाठीं लागणारे नकाशे, आराखडे, टिपणें तयार करून ठेवलीं होतीं. अधिकार गाजवायचा नाहीं, मतें लादावयाचीं नाहींत—व्यक्तिस्वातंत्र्याला अगदीं फ्री पास! आणि मनांत कांहीं ठेवावयाचें नाहीं असाही एक नियम त्यानें वैवाहिक शासनपद्धतींत घालून टाकला. 'विवाहोत्तर सहवास' या प्रकारचा विवाह झाला त्याचा. मन मोकळें करण्याचा प्रयोग केव्हां करावा याची तो वाट पहात होता. कारण Better to rule by love हें त्याचें आपलें तत्त्व असे. Love ला परिचय पाहिजे म्हणून विवाहापूर्वीं नाहीं तर नाहीं, निदान विवाहोत्तर व्हावयास तरी उशीर नको!

एक दिवस आपल्या पूर्वायुष्याचीं त्यानें टांचणें काढलीं. अगदीं बी.टी.साठीं लेसन म्हणा ना! आपलीं ध्येयें तांबड्या शाईत टिपलीं. आपलीं मतें दुरेघी मारून लिहिलीं. आणि शेवटीं शक्य तितका आवाज उतरवून आपल्या पत्नीशीं बोलावयास सुरुवात केली. पतीच पडला तो—त्यांत आणखी हिंदु पति! ती गौरीहराच्या दिवशीं बसली तशी डोळे मिटून बसली होती. त्यानें "वृत्तान्त कथिला सगळा प्रियेला", आणि शेवटीं तो म्हणाला, "हं, आतां मग काय वाटतें तुला?" वाईट वाटलें तिला! तिला नव्हतें माहीत आपला पतिदेव एक साधा आदमी किंवा 'इसम' असेल म्हणून! म्हणे, "प्रेमांत बहकलों होतों अन् व्यवहारांत चुकलों होतों!" ती रडूं लागली. केवढाल्या निराशा आणि केवढाले विचार तिला 'तिकडच्या' मनांत दिसले! 'त्यांत आतां आपल्या आत्मकथेचा पसारा कशाला?' असें म्हणून तिनें कांहीं कांहीं सांगितलें नाहीं. नुसतें 'नाथ–!' सुद्धां म्हटलें नाहीं!

त्या दिवसापासून त्याच्या वैवाहिक सुखाचा बोजवारा झाला. मीं त्याला म्हटलें, "बाबा रे! realism वाङ्मयांत, व्यवहारांत नाहीं. माणूस पाहून मन उघडावें लागतें. मनांतलें हुकुमाचें पान सांगून बसलास. आतां बैस जन्मभर पत्ते पिसत!" तो बिचारा मजजवळ शेवटीं दररोजचे खटके मनमोकळेपणानें सांगे. तासचे तास त्याच्यापुढें उसासे टाकणें आणि आंबट चेहरा टिकवणें मला तरी किती दिवस जमणार? एक दिवस मी माझ्या एका दुसऱ्याच मित्राजवळ म्हणत होतों—"काय लेकाची रडारड! तुमचीं दुःखें ऐकायचीं जन्मभर आणि

आम्हांला जशी कांहीं दुःखी असायला परवानगीच नाहीं. नाहीं बायकोशीं जमत तर नाहीं. तिला त्रास आणि आम्हांलाहि त्रास !"

माझा मित्र म्हणाला, "पण तूं त्याला सांगत कां नाहींस कीं, आम्हांला नको हें सांगूं बुवा !"

"हो, अगदीं आतां सांगणारच आहे. आत्तां येऊं दे, तुझ्यासमक्ष सांगतों." इतक्यांत त्या विवाहित मित्राचीच हांक ऐकूं आली !

आणि तुम्हांला अगदीं मनमोकळेपणानें सांगतों कीं, तब्बल तीन तास मी व माझा आधीं बसलेला मित्र यांनीं त्या विवाहिताचें 'व्यंकटेशस्तोत्र' निमूटपणें ऐकलें ! त्यानंतरहि अजून ऐकतों. अजून चेहरा उतरवतों. पण त्याला अद्याप 'तें' सांगितलें नाहीं !

"अगदीं तुम्हांला म्हणून" अशा हजारों गुप्त गोष्टी आपण 'तूं' 'तूं' करीत करीत सगळ्यांना सांगतों. मनमोकळेपणाच्या गरजेची गरज भागवण्याचाच तो एक प्रकार आहे. तोंडासमोर मन मोकळें करतां येत नाहीं म्हणून अपरोक्ष बोलत राहावयाचें. मनांत तरी किती राहणार ? पण लोक त्याला 'निंदा' म्हणतात ! तोंडावर खोटी स्तुति करून जे श्रम होतात, ते श्रम 'निंदेनें होतात हालके !" एक वेळ देवाची स्तुति कमी पडली किंवा चिडून निंदा केली तर चालेल; कारण त्या सर्वसाक्षी, सर्वव्यापी प्राण्यापासून काय लपवणार ? पण माणसाची एकजिनसी स्तुतीच करावयास पाहिजे.

मनमोकळेपणाचें वेड वेडापेक्षांहि भयंकर आहे. मनमोकळे अभिप्राय, मनमोकळीं मतें, मनमोकळेपणानें सांगितलेल्या आवडीनिवडी, मनमोकळेपणानें जुळलेली व टिकविलेली मैत्री व प्रेम—या गोष्टी शहाण्या-सुरत्या व्यवहारदक्ष माणसाच्या जगांत दिसत नाहींत. सत्य व असत्य यांत जेवढें अंतर आहे तेवढें मन व मुखावरचे भाव यांत आहे. शेक्स्पीयरनें Face is the index of the heart असें म्हटलें आहे म्हणे ! त्याच्या काळचे व्यवहार त्याला माहीत. हल्लींच्या जाहिरातयुगांत मात्र Face is the advertisement of the heart असें असावयास पाहिजे असतें आणि असतेंहि पण तसेंच ! नाहीं का ?

अंदरकी बात 'राम' जाने !

# र. धों. कर्वे

## झोंप

**लवकर निजे आणि लवकर उठे**
**तयांसी ज्ञान, आरोग्य, संपत्ति भेटे**

ही छापील म्हण मी माझ्या झोंपायच्या खोलींत लावलेली आहे. पुष्कळ जणांना वाटतें कीं त्या म्हणीप्रमाणें मी लवकर झोंपत असेन व लवकर उठत असेन. एकदां एकानें मला विचारलें, "का हो, सकाळीं साखरझोंप घ्यावीशी वाटली तर मनाला टोंचायला ही म्हण लावलीत वाटतं इथें!" मी म्हणालों, "छे! याच्या अगदीं उलट! मला जेव्हां विशेष काम नसतं व साखरझोंप घ्यावीशी वाटते तेव्हां मी ही म्हण वाचतों अन् पुन्हां झोंपीं जातों. अशानं झोंपेचा आनंद वाढतो."

ह्या म्हणण्याचें कोणाला आश्चर्य वाटेल; पण मी म्हणतों, हा माझा अनुभव आहे. सकाळ झाली कीं साधारण डोळा उघडतो अशा वेळीं पुन्हां लोळण्यांत व साखरझोंप घेण्यांत मौज असते, अन् त्यांतून म्हण वाचून मग निजलें कीं मग जास्तच मौज. ती म्हण जणूं मोठ्या डौलानें सांगते "लवकर ऊठ" अन् आपण मुद्दाम तसें न करण्यांतील उन्मादाचा आनंद अनुभवावांचून सर्वांना कळणार नाहीं!

या म्हणीचा असा उपयोग अगर दुरुपयोग मी करतों याचें कारण इतकेंच कीं, या म्हणींत मला विशेष सत्य दिसत नाहीं. पुष्कळ पशुपक्षी ह्या म्हणीप्रमाणें वागतात, पण ते कुठें माणसांपेक्षां जास्त धनवान्, ज्ञानी व बलवान् आहेत? आणि माणसांतदेखील लवकर निजणारीं व लवकर उठणारीं कितीतरी दरिद्री, अज्ञानी अन् रोगी आढळतात. याच्या उलट झोंपेचा अनिर्बंध उपभोग घेणारे कितीतरी श्रीमंत, विद्वान् व निरोगी आढळतात. यावरून मला तर असें वाटतें कीं, मर्यादित झोंपेचा व ज्ञान, आरोग्य आणि संपत्तीचा आपण मानतों तसा कार्यकारण संबंध नाहीं.

ज्ञान, आरोग्य आणि संपत्तीप्रमाणेंच त्यांच्या तोलाची झोंप ही

एक मनुष्याला आनंद प्राप्त करून देणारी शक्ति आहे. अन् त्यांतून झोंपेचा श्रेष्ठपणा असा कीं, इतर तीन शक्तींप्रमाणें ती पक्षपाती नाहीं. वरील तीन शक्तींची सर्व जीवसृष्टीवर सारखी कृपा नाहीं. उलट झोंप ही सर्वांना आनंद द्यायला सदा तत्पर असते. याहीपेक्षां झोंपेची एक मौज अशी कीं, ती ज्ञानी, निरोगी व श्रीमान् माणसांपेक्षां अज्ञानी, रोगी किंवा गरीब माणसांनाच जास्त सुख देते. या दृष्टीनें मी तर असें म्हणेन कीं झोंप या शक्तींत ईश्वरी अंश जास्त आहे!

* * *

अशा आनंददायी दिव्यशक्तीला बंधनें घालणारे लोक अभागीच नाहींत का? आपली जीवनविषयक कर्तव्यें संपविल्यावर आपणांस जो शीण येतो तो घालवून झोंप आपणांस आनंद देते. या दृष्टीनें फुरसतीच्या वेळेंतील झोंप हा एक रम्य विलास आहे. अशा फुरसतीच्या विलासाला बंधन कशाला? दमल्याभागल्या जीवानें ज्याप्रमाणें समाधान वाटेपर्यंत लहान बालकाचे मुके घ्यावेत अगर जिवाच्या माणसाशीं कानगोष्टी कराव्यात त्याचप्रमाणें समाधान वाटेपर्यंत झोंप घ्यावी. कानगोष्टी लवकर सुरू कराव्या व लवकर संपवाव्या हें बंधन कोणाला आवडेल?

याच कारणामुळें झोंपेबद्दल कोणतींच बंधनें मला आवडत नाहींत. रिकामपणीं वाटेल तितकी व वाटेल तेव्हां माणसानें झोंप घ्यावी. शिवाय झोंपेची एक विशेष गोष्ट पण तशीच आहे. फुरसतीच्या वेळीं कोणत्या आनंददायक गोष्टी कराव्या हें माणसांनीं स्वतः ठरवावें लागतें, व तशी सुरुवात करावी लागते; पण झोंप ही गोष्ट स्वतःच माणसांसाठीं ठरविते. खेळांत गुंतलेलें मूल केव्हां शिणतें हें त्याची आई जाणते व त्या वेळीं त्याला पदराखालीं घेऊन ताजेंतवानें करते. त्याप्रमाणें आपण शिणलों हें जाणून झोंप हळुवार पावलानें येऊन आपल्या श्रमाचा परिहार करते. झोंपेचें हें वात्सल्य कौतुक करण्यासारखें नाहीं का?

अशा झोंपेच्या विलासाचे सर्वच प्रकार मला फार फार आवडतात; पण त्यांच्यावर टाकलेलीं कोणतींच बंधनें मात्र मला आवडत नाहींत. ज्यांना ज्यांना अमुक अमुक तयारीवांचून झोंप येत नसेल त्यांनीं खास समजावें कीं, झोंपेचें त्यांच्यावर खरें प्रेम नाहीं. झोंप ही एक विलासी स्त्री आहे असें मानलें तर तिला कष्टाळू माणूस फार आवडतो असें

दिसतें. भरपूर श्रम करून थकलेल्या माणसाच्या गळ्यांत हात टाकून त्याला सुखवायला ती कितीतरी उत्सुक असते! गाद्या, उशा, ऊबदार पांघरूण कशाचीच तिला पर्वा नसते. आणि झोंपेच्या विलासाचा खरा अनुभव भोगण्यास उत्सुक असलेल्या माणसासदेखील कसल्याच इतर साधनाचें महत्त्व नसतें. दोन प्रेमी जीव संगतीच्या उत्कंठेनें जेव्हां जवळजवळ येतात तेव्हां त्यांना इतर अलंकार अगर साधनांची काय मातब्बरी? यामुळेंच मला झोंपायला कांहींच तयारी करणें आवडत नाहीं. झोंपेचें माझ्यावर जास्त जास्त प्रेम वाढावें यासाठीं दिवसां मी भरपूर काम करतों अन् केव्हांही झोंप आली कीं तिच्याशीं रममाण होतों. रात्रीं वाचतां वाचतां तर पुष्कळ वेळां खुर्चीतच मी झोंपी जातों.

झोंपेच्या बाबतींत एक गोष्ट मात्र मला फार हवीशी वाटते व ती म्हणजे एकान्त. जितका एकान्त जास्त तितकी झोंपेच्या विलासाची मौज कांहीं औरच!

मी आधीं म्हटलेंच कीं झोंप वाटेल तेव्हां घ्यावी, वेळचें बंधन तिला नसावें. पुष्कळ माणसें रात्रीं नऊ वाजले कीं, दिवे मालवून बिछान्यावर झोंपेची आराधना करीत असतात. त्यांच्यासारखे दुर्भागी तेच! अशी आराधना करून नियमित वेळीं तिला ओढून आणायची व सकाळीं नियमित वेळींच तिला हुसकून लावायची हा विलास नसून विलासाची थट्टा आहे. यापेक्षां आपण आपल्या कामांत दंग असावें, अगर फुरसत असली तर इतर आनंदाच्या गोष्टी करीत असावें अन् अशा वेळीं जेव्हां झोंप स्वतः होऊन आपणावर मोहिनी टाकते तेव्हां तिच्याशीं रममाण होण्यांतच खरा आनंद! यामुळें झोंपण्याची निश्चित वेळ मला टाऊकच नाहीं.

सकाळीं उठण्याचेंदेखील असेंच. कामधंदा विशेष निकडीचा नसला तरी पुष्कळ लोक सकाळीं नियमित लवकर उठतात, चहा घेऊन झोंपेला उडवून लावतात. अशांना जांभया येत असतात याचें कारण त्यांची विलासाची भूक शमलेली नसते. वेळ झाली, उजाडलें, कीं उठायचें—ही कल्पना मला कशीशीच वाटते. मला वाटतें या कल्पनेला भाळलेले लोक झोंप हा विलास समजत नसून ऑफिसच्या कामाप्रमाणें एक भार समजतात. काम संपो न संपो, वेळ झाली कीं ज्याप्रमाणें

ऑफिसाबाहेर पाय ठेवायचा त्याप्रमाणें झोंपेच्या बाबतींत त्यांची वागणूक असते. पण इथेंच मुळीं त्यांचा-माझा मतभेद! झोंप हा एक विलास असल्यामुळें त्याला असला नियमितपणा हानिकारक आहे; व म्हणूनच काम नसून देखील सकाळ झाली कीं उठणाऱ्या लोकांची मला कींव येते. "सकाळ झालीऽ म्हटलें, उठाऽ आतां..." असें कोणीं म्हणून मी मुळींच उठत नाहीं. "अमुकतमुक काम करायचंय् न?" असें कोणीं म्हटलें तरच मी बिछान्यांतून बाहेर येतों.

इतकें सारें झोंपेचें प्रस्थ मी माजविलें तर कोणी म्हणतील, "काय हो, इतके झोंपेपासून फायदे आहेत काय?...कीं आपलें..." याचें उत्तर एकच कीं, आयुष्यांतील सारी टवटवी व आनंद झोंपेवर अवलंबून आहे.

कुठेंतरी एक चित्र पाहिल्याचें मला आठवतें. त्यांत एक विधवा स्त्री झोंपीं गेल्याचें दाखविलें होतें...तिच्या गालावर अश्रूंचे ओघळ होते, तरी पण गालावर गुलाबी छटा दाखविली होती...किंचित् वरच्या बाजूला एका तेजोवलयांत तिचा प्रियकर तिच्या अंबाड्यावरील फुलाचें चुंबन घेत आहे असें दाखविलें होतें. या चित्राला नांव दिलेलें नव्हतें. पण मी 'निद्राविलास' असें नांव देईन. दमल्याभागल्या जीवाला विश्रांति व आनंद देऊन हवें असलेलें सुख मिळवून देण्याची शक्ति, मला वाटतें, झोंपेशिवाय इतर कोणत्याहि विलासांत नाहीं. वाटेल त्या महत्त्वाकांक्षा बांधाव्यात आणि झोंपीं जावें. त्या जेव्हां स्वप्नांत पुऱ्या होतात त्यावेळचा आनंद ज्याचा त्यानें अनुभवानेंच जाणावा अशा प्रकारची अजब जादुगिरी आहे झोंपेंत. याचा तुम्हांला नाहीं अनुभव?

या झोंपेच्या विलासाचे साधारणतः तीन प्रकार आहेत. रात्रींची गाढ झोंप हा प्रकार सर्वांना परिचितच आहे. रोजच्या जेवणाप्रमाणें हा नेहमींचा प्रकार असल्यानें त्यांत पुष्कळांना खऱ्या मौजेची कल्पना येत नाहीं. अशा अतिपरिचयामुळें विलाससुखाला जरी थोडा सैलपणा येत असला तरी पुष्कळांना विलासाची कला अवगत नसतें हेंच खरें. रोजचें अन्न तेंच पण जरा हंसतखेळत, मजा मारीत खाल्लें तर त्यांतच नवा आनंद रोज येतो. तीच गोष्ट झोंपेची. झोंपेशीं हंसणेंखेळणें तिची मिठी घट्ट बसण्यापूर्वीच शक्य असतें. रात्रीं मी वेळेवर बिछाना घालून झोंपेची

आराधना कधींच करीत नाहीं. उलट साधारण वेळ झाली अशा अंदाजानें एखादें जाडें वेदान्ताचें पुस्तक वाचायला घेतों; पण झोंप येऊं लागली तरी पुस्तकांतच मला गोडी वाटते अशा आविर्भावानें मी झोंपेचे करपाश दूर लोटूं पहातों. झोंप माझे डोळे मिटते; मी ते पुन्हां उघडतों. हें झोंपेशीं खेळणें फारच आनंददायक असतें. पुस्तकांत गढल्याचें सोंग करून झोंपेबद्दल बेपर्वाईची वृत्ति दाखविणें यांतील मजा कांहीं औरच आहे. झोंपेची अशी चाळवण करण्यांत शेवटीं झोंपच जेव्हां प्रभावी ठरते, तेव्हां बसलेली झोंपेची मिठी फारच मिठ्ठी असते. इतकी कीं, साऱ्या रात्रींत माणूस या कुशीचा त्या कुशीला देखील होत नाहीं.

झोंपेची आराधना करून झोंपीं गेलेल्या माणसापेक्षां किंवा झोंप येतांच एकदम झोंपीं जाणाऱ्यापेक्षां या प्रकारच्या झोंपेंत गाढपणा जास्त असतो. माझे पुष्कळ अविवाहित व विवाहित विरही स्नेही, झोंपेचें उत्कट सुख कसें मिळवावें हें मला विचारतात. त्यांना मी हीच युक्ति सांगतों कीं, प्रथम जाडें निरस पुस्तक वाचायचं सोंग करा, झोंपेशीं थोडें खेळून तिला दमवा, म्हणजे तुम्हांला गाढ झोंप मिळेल.

झोंपेशीं असें खेळण्यांत मात्र एक सावधगिरी ठेवावी लागते. झोंपेला किती दमवावें व तिची चाळवण किती करावी हें समजण्याची एक कला आहे. ती ज्यांना अवगत नसते असे पुष्कळ लोक खऱ्या सुखाला अंतरतात. तंतुवाद्याची तार प्रमाणाबाहेर ओढली तर ज्याप्रमाणें ती तुटते, त्याप्रमाणें प्रमाणाबाहेर झोंपेची चळवळ केली तर ती निघून जाते व माणसाला मग सारी रात्र नुसतेंच तळमळत पडावं लागतं. यासाठीं ज्यांना ही प्रेमलीलेची कला अवगत नसेल त्यांनीं मात्र एकदमच निद्रावश होणें बरें; परंतु झोंपेचा खरा आनंद त्यांत नसतो.

झोंपेचा दुसरा प्रकार म्हणजे डुलकी. हा विलास क्षणिक परंतु पुष्कळ आनंददायक असतो. शरीराला अगर मेंदूला अतिशय श्रम पडले म्हणजे एखाद वेळीं भर दिवसा अशी डुलकी येते. डुलकी घेण्यांत तर आनंद असतोच, पण मौज अशी कीं डुलकी घेणारा माणूस पहाण्यांतही आनंद असतो. वल्लभेच्या एखाद्या प्रेमकटाक्षानें ज्याप्रमाणें प्रियकराचा सर्वश्रमपरिहार होतो किंवा शिणलेल्या मातेला गोंडस बालकाच्या एकाच चुंबनानें हायसें वाटतें, तसेंच सुख दोनचार मिनिटांच्या डुलकींत

असतें. कामधंद्याच्या जागीं बालकाचें चुंबन व रमणीचा कटाक्ष दोन्हीं दुर्मिळ असतात. अशा वेळीं डुलकींत मिळालेलं सुख फारच मोलाचें असतें; यासाठीं डुलकी आलीच तर मी इतरांप्रमाणें चुटक्या वाजवून तिला कधींच दूर लोटीत नाहीं. आपल्या सुखासाठीं झटणाऱ्याचा आपण कां हिरमोड करावा ?

झोंपेच्या विलासाचा तिसरा प्रकार म्हणजे साखरझोंप. सकाळ होते, पक्षी किलबिल करूं लागतात. खरीं कामाचीं अन् कांहीं उगाच धांदल करणारीं माणसें उठून कामाला लागतात. सूर्याचीं किरणें घरांत येऊं लागतात. अशा वेळीं जणूं काय स्त्रीसहज् लाजऱ्या वृत्तीमुळें झोंप दूर दूर जाऊं पहाते. अशा वेळीं उघड्या खिडक्या बंद करून, कृत्रिम अंधारांत झोंपेला खोळंबून ठेवून, तिला न जाऊं देण्यांत मोठी मौज असते. या विलासाचा अनुभव कामाच्या निकडीनें रोज न घेतां आला तरी महिन्यांतून एकदोनदां मी अवश्य घेतोंच घेतों. सकाळीं जागा झालों कीं, खिडकींतून मी बाहेर कामांत गुंतलेल्या माणसांकडे पाहात खिडकी बंद करतों व "लवकर निजे लवकर उठे" या म्हणीकडे पाहात पुन्हां बिछान्यावर लोळून झोंपेला दूर जाऊं देत नाहीं. अशा वेळीं झोंपेची धांदल एखाद्या बावरलेल्या नववधूप्रमाणें होते. अन् मधुर मधुर स्वप्नचित्रांत ती आपल्याला गुंतवून चटकन् निसटायला बघते, पण तरी स्वतःच अडखळते. या स्थितींतला विलास फारच आल्हादकारक असतो.

मात्र एक खरें कीं, हा विलास फारच उत्तान स्वरूपाचा असल्यामुळें साखरझोंपेनंतर उठल्यावर पुष्कळांना दमल्यासारखं वाटतं. इंग्रजी पद्धतीच्या नाचांत कांहीं प्रकार असे असतात कीं, त्यांत स्त्रीपुरुष नाच संपल्यावर खूप दमतात. अशा प्रकारचे नाच नेहमींच करणें सोईचें नसतें. तीच गोष्ट साखरझोंपेच्या बाबतींत खरी आहे. उजाडल्यावर साखरझोंप रोज घेण्याला पुष्कळांना फुरसतहि नसते, अन् असेल त्यांनीं देखील मानवेल अशा बेतानेंच हा विलास करावा.

खरं म्हटलें तर या साखरझोंपेंतील विलासाचं सुख इतकं मुबलक असतें कीं, महिन्यांतून दोनतीन वेळांच ही झोंप मिळाली तरी पुरेशी होते.

झोंपेकडे मी असा नेहमींच एक विलास-शक्ति या दृष्टीनें पाहात

आलों आहें. या विलासांत जे सुखाचे अनुभव मला मिळाले आहेत ते मला शब्दानें कधींच वर्णन करतां येणार नाहींत. पण पुष्कळ वेळां वाईट वाटतं तें हेंच कीं, इतक्या महत्त्वाच्या गोष्टीकडे मोठीं मोठीं माणसें दुर्लक्ष करतात अन् दुःखी होतात. झोंपेच्या अनेक विलासांचा अनुभव घेतला तर खरंच जग कितीतरी सुखी होईल !

झोंपेच्या अनेक विलासांनीं मनुष्यांचीं अंतःकरणें एकदां सुखावलीं तर खचित एक दिवशीं असा विचार स्फुरेल त्यांत कीं, सारं मानवी आयुष्य असेंच साखरझोंपेप्रमाणें आहे. असा विचार मनांत स्फुरावा अन् ठसावा म्हणूनच मी झोंपेच्या बाबतींत कोणतींच बंधनें पाळीत नाहीं; आणि यामुळेंच मी सुरुवातीला म्हटलें कीं, साखरझोंपेचा आनंद जास्त वाढावा म्हणून मी माझ्या झोंपायच्या खोलींत "लवकर निजे लवकर उठे" ही म्हण लावून ठेवली आहे, अन् म्हणून तर मी सर्वांना सांगत असतों, "घेऊन पहा कीं हा अनुभव !"

# का. भा. पाठक

## विनसलेले बेत

बेत कोण करीत नाहीं? घरांतल्या छोट्या सुशीपासून तों थेट वृद्ध आजीबाईपर्यंत प्रत्येकाच्या मागें कांहीं ना कांहींतरी बेत लागलेले असतात. त्याबरोबर हेंही खरेंच कीं, बेत फार करून कोणाचे तडीस जात नाहींत. उलट असेंच कीं, ते तडीस जात नाहींत म्हणूनच ते सारखे करावेसे वाटतात. माझ्या मित्रमंडळींत यासंबंधानें मी एक दिवस सहज बोलत बसलों होतों. बालपणांतील आपलीं मनोराज्यें व आजच्या तरुणवयांत त्यांना मिळालेली दिशा हीं लक्ष्यांत घेऊन जनुभाऊ एकदम उद्गारले,

"छे! आपण तर बुवा पूर्ण सुखी आहोंत! आणि सुखी आहोंत याचें कारण आजवर आपले कोणतेच बेत सिद्धीस गेले नाहींत हेंच खरें!"

"म्हणजे तुझं आजवरचं आयुष्य म्हणजे प्रवाहाच्या ओघांत वाहत आलेलं जीवन होय ना?" कांहींतरी बोलावयाचें म्हणून मी बोलून गेलों. पण तेवढ्यानें जनुभाऊचें मत मागच्या-पुढच्या आठवणींनीं गजबजून गेलें. बसल्या जागेवरून किंचित् बाजूला सरून आणि खिडकी-वाटें आकाशाकडे शून्य दृष्टीनें बघत तो म्हणाला,

"नाहीं. आरंभीं माझा तसा हेतु नव्हता. माझे पुष्कळच बेत होते. आतां मला त्याचें कांहींच वाटत नाहीं म्हणा, पण त्यावेळीं वाटे पुष्कळ शिकावें—अगदीं विलायतेलाही जावें आणि—"

"आणि आपण मनांत योजून ठेवलेल्या गोड पोरीशीं विवाह करावा; असेंच ना?" मध्येंच त्याचें भाषण स्वतःच पुरें करीत गणपुले बोलले.

"पण या दोहींचीही जोड मी मिळवली आहे. तथापि मी नाहीं कधीं तुम्ही म्हणतां ते बेत किंवा महत्त्वाकांक्षा केल्या. मोठेपणा अगर सुख मिळवावयास या गोष्टी लागतातच असें नाहीं.—"

"अहो सुखटणकर, तुम्ही अपवाद असाल त्याला! आमचें म्हणणें तुमच्याबद्दल नाहीं." शेवटीं मीं म्हटलें. "खरी मौज आहे बेत करण्यापेक्षां ते मोडलेले पाहण्यांतच!" आणि खरोखरच जनुभाऊची चर्या त्यावेळीं पाहण्यासारखी झाली होती.

बेत मोडणें आणि त्यांतून आनंद मिळविणें ही एक मोठीच गोष्ट आहे. एकदां कुणींतरी मला म्हटलें, "अलिकडे तूं असा विचित्र तऱ्हेनें कां वागूं लागलास? एखादी गोष्ट ठरवलीस आणि त्याप्रमाणें तूं वागलास असें कधींच होत नाहीं." यावर मीं म्हटलें, "तर मग फारच चांगलें कीं! आजपर्यंत मी कृत्रिमपणानें वागत आलों, पण आतां मी सहज रीतीनें वागावयास लागलों आहे!" या माझ्या बोलण्यांत थोडा-फार तरी तथ्यांश होता असें मला अजूनहि वाटतें. कारण बेत ठरविणें व त्याप्रमाणें वागणें यांत औपचारिकपणा व कृत्रिमताही आलीच! आणि अशा वेळीं आपण आपली सहजताही गमावतों हें निराळेंच! आपण आपल्या चारचौघां मित्रांना ठराविक वेळीं पाहुणचारास बोलवलें तर जेवढ्या मनमोकळेपणानें गोष्टी घडून यावयास पाहिजेत तेवढ्या घडून येतातच असें नाहीं. शिवाय रोजच्या व्यवहारांत कांटेतोल-पणानें वागणारा गृहस्थ विशेष लोकप्रिय झालेला दिसत नाहीं आणि त्याचें आकर्षणही कोणास वाटत नाहीं.

कांहीं कांहीं गोष्टी अनपेक्षित रीतीनें घडून येण्यांतच खरी मौज असते. फार दिवस न भेटलेला मित्र बेत न ठरवितां अचानकपणें आपल्या घरीं आला तर किती आनंद वाटतो! माहेरास गेलेल्या आपल्या पत्नीनें अगोदर कांहीं न कळवितां अचानक आपल्या खोलींत पाऊल टाकावें म्हणजे केवढा ब्रह्मानंद होतो! आणि हें असें कां होतें याचा जर आपण थोडा विचार केला तर आपल्या लक्ष्यांत येईल कीं, एक प्रकारची जी गोड हुरहूर असते ती अशा बेत मोडल्यानें प्राप्त होते, आणि मागाहून होणाऱ्या तिच्या पूर्ततेनें एक प्रकारचा अपूर्व आनंद मिळतो.

बाकी ज्यांना आपण थोर व्यक्ती म्हणतों अशांचीं आयुष्यें म्हणजे तरी भग्न हेतूंच्या पाण्यावर तरंगणारीं तारवेंच नाहींत का? निरनिराळ्या क्षेत्रांत ज्यांनीं आजवर मोठमोठ्या करामती केल्या आणि मानवी

इतिहास बनविला, त्या सर्वांचे हेतू आपल्या दृष्टीनें सफल परंतु त्यांच्या दृष्टीनें विफलच नव्हते का ? वाङ्मयाच्या प्रकारांत तरी निदान अशा भग्नाश मालाकारांची परंपरा लागलेली दिसते. आपल्या मनांतील कल्पनांना एकाद्या विशिष्ट भाषेंत सर्वांगसुंदर असें मूर्तस्वरूप प्राप्त करून देण्याकरितां कितीतरी वाङ्मयसेवक प्रयत्न करीत आले आणि प्रयत्न करीतच दिवंगत झाले. या त्यांच्या धडपडींत त्यांच्या हातून सुंदर वाङ्मयकृती निर्माण झाल्या असतील हें खरें, पण झाल्या त्यापेक्षां कितीतरी मनोज्ञ कृती निर्माण करण्याचे त्यांचे बेत – संकल्प–असतील ! हे बेत साध्य होण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केले, ग्रंथ लिहिले; पण आपल्या दृष्टीला परिपूर्ण वाटणारे त्यांचे ग्रंथ त्यांच्या असाध्य हेतूंच्या समाधीच नाहींत का ?

# कमल दीक्षित

## डायरी

कोणाचं उदाहरण पाहून माझ्या मनांत आलं मला आठवत नाहीं, पण एक दिवस मला वाटलं आपल्याजवळ डायरी असली पाहिजे. त्या वेळीं मी लहान होतें. पुरती तेरा वर्षांची सुद्धां नसेन. डिसेंबर महिना संपायच्या आधींच जेव्हां मी एक सुंदर आठ आण्यांची डायरी विकत घेऊन आलें, त्या वेळीं घरांतल्या साऱ्या माणसांनीं माझी चेष्टा केली. त्यांना वाटलं, ही एवढीशी मुलगी कसली डायरी लिहिणार? माझ्या थोरल्या भावानं तर मला चिडवण्यासाठीं एक इंग्रजी सुभाषित म्हणून दाखविलं कीं, 'स्वतःशीं मोठ्यानं बडबडणं अन् डायरी लिहिणं दोन्हीही वेडसरपणाचीं स्पष्ट लक्षणं समजावींत.' माझी धाकटी बहीण म्हणाली, 'आठ आणे डायरींत खर्चलेस त्यापेक्षां आपण दोघींनीं सिनेमा पाहिला असता!' आमचे काका असं कांहीं स्पष्ट बोलले नाहींत; पण अशा कांहीं चमत्कारिक रीतीनं ते हंसले कीं, त्यापेक्षां त्यांनीं मला स्पष्ट 'मूर्ख आहेस झालं!' असं म्हटलं असतं तरी वाईट वाटलं नसतं! पण या साऱ्या टीकेकडे मीं लक्ष दिलं नाहीं. कारण डायरी लिहायची असा माझ्या मनाचा निश्चय झाला होता.

जानेवारीची पहिली तारीख उजाडली. डायरींत लिहून ठेवण्याजोगं कांहीं घडतं कीं काय तें पाहण्यासाठीं सकाळीं उठल्यापासून मी अगदीं टपून राहिलें. पण रात्रीं डायरी पुढं घेतली आणि मोठ्या आवेशानं शाईंत टांक बुडविला तेव्हां काय लिहावं तें सुचेना! काका डायरींत नेहमीं जमाखर्च लिहीत तसा मी कुठून लिहिणार? वाचलेल्या पुस्तकांतले चांगले उतारे डायरींत लिहून ठेवतात असं मी ऐकलं होतं. पण त्या दिवशीं सुटी असल्यामुळं सारा दिवस मैत्रिणींशीं खेळण्यांत गेला. मी पुस्तकाला शिवलें असेन तर शपथ! उठण्याची वेळ लिहावी असं आलं मनांत; पण त्या दिवशीं मी उठलें तों साडेआठ वाजून गेले होते! डायरीच्या पहिल्या पानावरच माझ्या झोंपाळूपणाची नोंद

करायला माझा हात धजेना. बरं, 'ध' चा 'मा' करणाऱ्या आनंदीबाईचं अवसान अंगीं आणून 'सकाळीं सहा वाजतां उठलें' असं लिहून टाकावं तर तसाही धीर होईना. आज लिहिण्यासारखं विशेष कांहीं घडलंच नाहीं असं लिहून टाकावंसं वाटलं, पण तसं लिहिलं काय किंवा कोरंच पान सोडलं काय, दोहोंचाहि अर्थ एकच! माझ्या पहिल्या डायरीचं पहिलं पान अखेर कोरंच राहिलं.

नंतरच्या दिवसांत लिहिण्यासारखं कांहीं घडलं नसेल असं नाहीं. पण काय घडलं अन् मी कसली नोंद डायरींत केली तें मला आतां आठवत नाहीं. थोड्याच दिवसांत डायरी लिहायची माझी हौसच नाहींशी झाली एवढं मात्र आतां आठवलं. मोठ्या उत्सुकतेनं मी डायरी विकत आणली होती. पण स्वतःचं अवमानित जिणं ओळखून ती अडगळीच्या खोलींत वर्तमानपत्रांच्या अन् जुन्या पुस्तकांच्या रद्दींत केव्हां सामील झाली हें माझ्या लक्ष्यांतही आलं नाहीं!

लहानपणीं साऱ्याच बाबतींत असं होत नाहीं का? एखादी वस्तु हवीशी वाटली कीं ती मिळेपर्यंत क्षणाचासुद्धां धीर निघत नाहीं, पण ती मिळाली कीं थोड्याच वेळांत ती टाकाऊ वाटूं लागते. किंवा कांहीं करावंसं वाटलं कीं एका पळाचाहि विलंब सहन होत नाहीं, पण तेंच करूं लागलं कीं त्यांतली गोडी मग उरत नाहीं! एक दिवस मी आमच्या बाबूसारखी शीळ घालून पाहूं लागलें; आणि 'बायकांनीं शीळ घालूं नये' असं म्हणून जेव्हां जो तो मला प्रतिबंध करूं लागला, तेव्हां मला शीळ घातल्यावांचून मिनिटभरसुद्धां गप्प राहावेना! पण तेंच कोणी बोलेनासं झाल्यावर शीळ घालण्यांत मला काडीमात्र गंमत वाटेना हें मात्र मला पक्कं आठवतं. डायरी लिहिण्याच्या बाबतींत असंच झालं कीं काय कुणाला ठाऊक! पण आमची पहिली डायरी बहुतेक कोरी राहिली अन् अखेर हरवली एवढं खरं!

त्यानंतर मी कधीं डायरी लिहीन असं मला वाटलं नव्हतं. गतवर्षी माझ्या एका मित्राकडून नव्या वर्षाची 'भेट' म्हणून मला एक पार्सल आलं. तें उघडून पाहातें तो आंत एक सुंदर डायरी! एका इंग्रजी सुभाषिताप्रमाणं कोणतीहि वस्तु आपल्या हातीं येण्याचे तीनच मार्ग संभवतात—खरेदी, चोरी किंवा उसनवारी. पण भेटी देण्याघेण्याचा

चवथा मार्ग हल्लीं उत्पन्न झाला आहे. त्यामुळं पुष्कळदां नको त्या गोष्टी आपल्या हातांत येऊन पडतात. घेणाराला जिचा कांहीं उपयोग नसतो, पण देणाराचे मात्र जिच्यावर पैसे खर्च होतात अशा वस्तूला 'भेट' म्हणावं अशी एका विनोदी लेखकानं व्याख्या केली आहे. ही व्याख्या नेहमीं खरी ठरेल असं नाहीं मला वाटत; पण माझ्या मित्राकडून डायरी आलेली पाहतांच मला या व्याख्येची आठवण झाली.

आतां या डायरीचं काय करावं या चिंतेंत मी ती हातांत धरली होती अन् तिचं एकेक पान उघडून मी केव्हां वाचूं लागलें तें माझं माझ्याच किती वेळ लक्ष्यांत आलं नाहीं. किती विविध प्रकारची माहिती माझ्या दृष्टीसमोरून जात होती. इन्कमटॅक्सची माहिती, कायद्याविषयीं 'साधारण' माहिती, कोर्ट फी स्टँप व ॲक्टची माहिती! १८७१ चा कोंडवाडा ॲक्टसुद्धां दिला होता त्या डायरींत, अन् कोंडवाड्यांत घातलेल्या हत्तीला रोजीं दोन रुपये, घोड्याला एक रुपया, शेळीला चार आणे पडतात ही माहितीदेखील दिली होती. गाढवाला बारा आणे खर्च येतो म्हणे! म्हणजे या इंग्रजी राज्यांत गाढवंदेखील घराबाहेर सोडायची चोरी म्हणायची! प्रयाण करायला शुभशकुन कोणते, बीं पेरायला कोणते, धान्य कापायला कोणते, मळायला कोणते इत्यादि ज्योतिषविषयक माहितीही मला त्या डायरींत वाचायला मिळाली. मुंबईपासून गोव्यापर्यंतचीं दर आणि जी. आय्. पी. सारख्या बड्या रेल्वेपासून बार्शी लाइटसारख्या छोट्या रेल्वेपर्यंत सगळ्या रेल्वे लाइनी-वरचीं स्टेशनं माझ्या डोळ्यांपुढून सरकलीं. इतकंच काय, उपनयन आणि विवाह या दोन्हीं गोष्टींत मला सारखीच गोडी – म्हणजे गोडीची वानवा – असूनही त्यांचे मुहूर्तहि मीं वाचून काढलें. डायरी इतकी वाचनीय असते अशी मला कल्पना नव्हती. सहज घटकाभर चाळायला योग्य पुस्तक कोणतं असं मला कोणीं विचारलं तर 'डायरी' असं मी ताबडतोब उत्तर देईन.

पण दुर्दैव असं कीं, डायरी वाचायसाठीं नव्हे तर लिहायसाठीं आहे अशी लोकांनीं कल्पना करून ठेवली आहे. मला ज्या मित्रानं डायरी भेट म्हणून पाठविली त्याचीदेखील तशीच कल्पना असावी. त्याच्या समाधानाकरितां तरी मला त्या डायरीचा लिहिण्यासाठीं उपयोग

करायला हवा होता. म्हणून त्या डायरींत कांहींतरी लिहिल्यावांचून मला सुटका नव्हती.

आतां मी बी. ए. पास होऊन एका मोठ्या शाळेंत शिक्षकिणीची नोकरी करीत होतें. तेव्हां डायरींत जमाखर्च लिहायचा म्हटलं तर तें शक्य होतं मला; पण कां कुणाला ठाऊक, तें करणं अगदीं जिवावर आलं माझ्या. कारण मला वाटलं, दीड रुपाया शिंप्याची शिलाई, सव्वा रुपाया चहाचा डबा, आठ आण्यांचीं कार्डपाकिटं अन् चार आण्यांची भाजी अशा गोष्टी लिहून डायरीचीं पानं मात्र खराब करायचीं! या गोष्टी स्मरणांत राहिल्याच पाहिजेत इतक्या महत्त्वाच्या आहेत काय? चार-आठ आण्यांचा हिशेब चुकला तर चुकला! पण अमुक महिन्याच्या अमुक तारखेला मी माझ्या मोलकरणीला दोन रुपये दिले अगर वाहणेचा तुटलेला बंद पुन्हां लावून घेण्यासाठीं दोन पैसे खर्चले असल्या क्षुल्लक गोष्टी डायरींत कशाला लिहायच्या? किंवा मी अमुक वाजतां उठलें किंवा निजलें किंवा फिरायला गेलें हें तरी कशाला लिहून ठेवायचं? या गोष्टी-देखील कांहीं माणसं डायरींत टिपून ठेवतात! मला वाटतं, डायरींत काय लिहायचं अन् कां लिहायचं याचं मर्मच त्यांना कळलेलं नसतं.

माझं म्हणणं तुम्हांला पटेल कीं नाहीं कुणाला ठाऊक, पण मला जें वाटतं तें मी सांगते. मला वाटतं, कीं सृष्टिशोभेच्या दर्शनानं, माणसांच्या सहवासांत अगर पुस्तकांच्या वाचनांत ज्या सुखदुःखांचे अनुभव येतात, तीं डायरींत लिहून ठेवतां आलीं तरच डायरीचा खरा उपयोग! जीवितमार्गावरून माणूस जसजसा पुढं जातो, तसतशीं मागचीं सुखदुःखं तो विसरतो. पण या सुखदुःखांच्या आठवणी कोणीं ताज्या करून दिल्या तर त्याला हव्या असतात. आजपासून दहा वर्षांनीं मी आजची डायरी काढून वाचूं लागलें अन् त्या डायरींत मी कोणत्या तारखेला किती वाजतां उठलें, अगर भाजीसाठीं किती पैसे खर्च केले, या गोष्टी मला वाचायला मिळाल्या तर मला त्यापासून कसला आनंद होणार? पण उलट, संध्याकाळीं मी एकटीच डोंगरावर फिरायला गेलें आणि एका शिलातलावर बसून सूर्यास्ताकडे पाहात राहिलें, तेव्हां क्षितिजावर-च्या विविध रंगांत, आकाशांत उडणाऱ्या पांखरांच्या शब्दांत, अंगावरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या हालचालींत माझ्या अंतःकरणांतल्या भावनांचे

प्रतिध्वनि उठल्यासारखं मला वाटलं; त्या वेळीं ज्या गांभीर्यानं अन् आनंदानं माझं चित्त भरून आलं, तें जर मला दहा वर्षांनीं जुन्या डायरींत पुन्हां वाचायला मिळेल तर? — तर मला अपूर्व सुख होईल. अमुख तारखेला पहांटे पांच वाजतां जी मुलगी उठली ती मी, अशी माझी मला ओळख पटली तर त्यांत स्वारस्य नाहीं. पण निरनिराळ्या वेळीं — कधीं क्षुल्लक कधीं मोठ्या — कारणानं जी हंसली अगर रडली, आनंदली, गहिंवरली ती मी, अशी जुन्या डायरीनं माझी मला ओळख दिली तर ती मला हवीशी वाटेल. तरच डायरी लिहिली ती सार्थकीं लागेल!

पण सुखदुःखांचे हे सूक्ष्म अनुभव लिहितां येण्यासारखे नसतात. एक तर शब्दांच्या रूपानं ते कागदावर उतरूं लागतांच त्यांचा सूक्ष्मपणा अन् हळुवारपणा कमी होतो. शिवाय डायरींत ते लिहिले कीं ते कोणाच्या दृष्टीला पडतील याचा काय नेम! त्या अत्यंत खाजगी अन् म्हणूनच अत्यंत पवित्र सुखदुःखांना कुणाची सहानुभूतिशून्य नजर लागावी ही कल्पनादेखील असह्य वाटते.

सारांश, डायरींत जें सहज लिहितां येईल त्याचा कांहीं उपयोग नाहीं, आणि जें लिहून ठेवलं असतां माझीं आजचीं सुखदुःखं मला उद्यां स्मृतिरूपानं अनुभवतां येतील तें लिहितां येत नाहीं!...

अशा विचारांनीं मला भेट मिळालेल्या त्या डायरींत मी कांहींच लिहूं शकलें नाहीं. ती कोरीच राहिली. माझी पहिली डायरी मी विकत आणली तेव्हां मी लहान होतें. माझी हौस क्षणिक होती. माझ्या अंगीं निश्चय नव्हता म्हणून ती बहुतेक कोरी राहिली. या दुसऱ्या डायरीच्या वेळीं मी मोठी झालें होतें; मानवी सुखदुःखांविषयीं थोडासा समज माझ्या अंगीं आला होता, म्हणून ती मी अजिबात कोरी ठेवून दिली. आतां पुन्हां डायरी माझ्या वाटेला जाणार नाहीं अशी आशा आहे मला!

# य. गो. जोशी

## उद्यां मेलों तर ?

तो दिवस मी कधीं जन्मांत विसरणार नाहीं !

त्या दिवशीं आम्ही चारजण स्नेही चांदण्यांत बोलत बसलों होतों. आम्ही सर्व एकमेकांना नेहमीं भेटणारे असल्यामुळें बोलण्याला नवीन असा विषय आमच्याजवळ राहिला नव्हता ! कोणी चांदण्याकडे पाहत होता, कोणी नुसताच तोंडानें शीळ घालीत होता, कोणी हातांतल्या काठीनें जमिनीवर वर्तुळें काढीत होता, आणि एकजण जमिनीवरचा एक खडा घेऊन वरखालीं फेंकून झेलीत बसला होता; आणि मी फक्त हें सारें पाहात होतों. माझ्या मनांत त्या वेळेला कांहीं म्हटल्या कांहींच विचार नव्हते !

इतक्यांत जो खडा झेलीत बसला होता त्याचें अंग सहज हललें आणि त्यानें वर फेंकलेला खडा त्याच्या हातांत न पडतां त्याच्या डोळ्यावर पडला.

तो खडा नव्हता. तें एक मातीचें ढेंकूळ होतें. तें फुटलें आणि त्याच्या दोन्हीं डोळ्यांत माती गेली. तो आपले डोळे चोळूं लागला.

तो जवळजवळ आंधळ्यासारखा झाला.

सर्वजण हंसूं लागले !

"खरंच, काय रे—आंधळा झालास तर काय वाटेल तुला ?"

एकानें गंमत म्हणून त्याला विचारलें.

"आनंद वाटेल !" तो म्हणाला.

"असं कां ?" सर्वजण उद्गारले.

"हं. म्हणजे तुमचीं तोंडें पाहायचा प्रसंग येणार नाहीं पुन्हां !" तो अद्याप आपले डोळे चोळीतच होता.

झालेलीं प्रश्नोत्तरें तो आतां विसरला आणि खरेंच मोकळेपणानें हंसूं लागला. "खरंच आंधळा झालों तर काय रे होईल माझं ?"

"आपण दर एकादशीला पैसा देत जाऊं तुला !"

....सर्वजण म्हणाले.

पण या प्रश्नानें मात्र सर्वजण एकदम गंभीर झाले.

आणि प्रत्येकजण तो प्रश्न स्वतःला विचारून पाहूं लागला.

"खरंच मी आंधळा झालों तर माझं काय होईल ?"

इतक्यांत आकाशांत चांदण्या पाहात बसलेले गृहस्थ एकदम मला म्हणाले, "बरं झालं, आज बोलायला विषयच नव्हता कांहीं. आयता मिळाला. 'आपण आंधळे झालों तर ?' या प्रश्नाचें कौतुक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. समज तूं उद्यां मरणार आहेस— असं तुला आज कळलं— तुझ्या मनाची चलबिचल कांहीं झाली नाहीं असं आपण गृहीत धरूं, तर मरायच्या अगोदरचे चोवीस तास तूं कसे काढशील ?"

"प्रश्न तुझा आहे तेव्हां तूंच उत्तर दे पाहूं ?"

"कुठं लेखीं न गुंततां मला जेवढे पैसे हातउसने गोळा करतां येतील तेवढे गोळा करून पाठीमागच्या माणसांकरितां घरांत आणून ठेवीन आणि मरून जाईन मी !"

तो चेष्टेनें म्हणाला.

"आपला आतां एकच दिवस राहिला आहे. तेव्हां परिस्थितीच्या दडपणामुळें मी जेवढे अपमान सहन केले आहेत तेवढ्यांना त्यांच्या तोंडावर शिव्या देऊन मनाचें समाधान करून घेईन आणि मग मी शांतपणानं देह ठेवीन !"

दुसऱ्यानेंहि न विचारतांच उत्तर दिलें—

"आपण तेवढा एक दिवस चैनींत काढून—"

"आणि तूं रे ?"

मला प्रश्न विचारला गेला.

माझा स्वभाव माहीत असलेला एकजण म्हणाला, "अरे, हा कांहीं करणार नाहीं. मी फक्त उद्यां जाणार असं सर्वांना सांगण्यांतच याचा दिवस जाईल !"

मी हंसलों आणि खरेंच मनाशीं विचार करूं लागलों—

'खरंच मला उद्यां मरायचं आहे असं नक्की कळलं तर मी हातीं असलेला एक दिवस कसा काढीन ?'

कोणतीहि गोष्ट सोडून जातांना— त्या गोष्टींत एक प्रकारचें

अलौकिक सौंदर्य आपल्याला वाटूं लागतें! तें सौंदर्य टेहळण्यांतच माझा सर्व दिवस संपून जाईल असें मला वाटलें!

मी समोर बसलेल्या माझ्या मित्रांकडे पाहूं लागलों, तों उद्यां उजाडत आहे—आणि समोर बसलेले स्नेही माझी मृत्युवेळ जवळ असल्यामुळें एक एक वितळून जात आहेत असें मला वाटलें!

मग मरणार आहेत कोण? मी का ते? मी मेलों तरी कुठेंतरी असणारच! माझ्यापुरता विचार करायचा झाला तर माझे सर्व स्नेही, आप्तगोत—मला माहीत असलेलें सर्व जग मरणार आहे!

—आणि मी कोठल्यातरी अज्ञात प्रांतांत प्रवासाला निघणार आहे!

—आयत्या वेळेला काय होईल तें सांगतां येत नाहीं—पण नवीन देश पाहायला जातांना जी आतुर उत्कंठा प्रदीप्त होते तसेंच मला मरतांना वाटेल असें आतां वाटतें आहे! प्रश्न पडणार आहे फक्त सोबतीचा.—चार ओळखीचे किंवा आप्त बरोबर असेल तर प्रवासांत खरी मौज असते; पण तें या प्रवासांत कसें शक्य आहे?

आपल्या एकट्यालाच जावें लागणार!

वा:! पण ते कोणी बरोबर येणार नसले तरी त्यांच्या त्यांच्या सहवासामुळें कित्येक सुखद प्रसंगांचें दहिंवर मीं सांठवलें आहे तें कोण घेणार आहे माझ्यापासून हिसकावून? त्या दहिंवरावरही मी प्रवासांतली सोबतीची उणीव भरून काढूं शकेन!—काय, त्या आठवणी माझ्याबरोबर येणार नाहींत? वा:! वा:! तर मग फारच आनंद! या सर्वांची मरत्या वेळीं किंवा नंतर आठवणच जर नाहींशी होणार असेल—तर मग कशाची हो हुरहूर?

बरें, सुखद आठवणींच्या दहिंवराबरोबर कांहीं दुःखद प्रसंग—

पण प्रवासाला निघतांना आपण शक्य तों कमी सामान बरोबर नेत नाहीं का? दुःखद आठवणींचीं ओझीं कोण वागवणार अशा वेळीं बरोबर?

पण खरेंच, आपल्याला उद्यां मरायचें आहे या कल्पनेनें तरारलेला माणूस बेभानपणानें कोणाचीही भीड-मुरवत न ठेवतां जर बोलूं लागेल—तर किती कडवट सत्यें बोलायला लागेल तो? तीं ऐकबायचीसुद्धां

नाहींत एखाद्याला !—तीं न ऐकण्याकरितांसुद्धां एखादा मनुष्य उद्यांच्या ऐवजीं आजच्च मरायला तयार होईल !

इतक्यांत एकजण मला म्हणाला, "अरे, खरंच उद्यां मरायचं आहे अशा गंभीरतेनं कसला विचार करतो आहेस ? झटकन् सुचेल ती कल्पना सांग ! का तुझ्या मनांत कांहींतरीच कल्पना आली आहे ?"

"कसली ?"

"आतांपर्यंत संभावितपणानं आयुष्य घालविलंस—त्याचा सूड उगवणार आहेस एका दिवसांत ?"

"नाहीं, कुणाजवळ कांहींएक न बोलतां— किंवा मी उद्यां जाणार आहे याचा कुणाला कानोसाही लागूं न देतां मी वेळ भरतांच गुपचूप होईन !"

"मला वाटलंच तूं असा कांहीं तरी विक्षिप्तासारखं बोलशील म्हणून ! अरे, आपलं मरण असं आपल्याला आधीं कळलं असूनसुद्धां असलं म्हातारं मरण मरणं आपल्याला नाहीं आवडणार ! अरे, जिथून आपल्याला निघून जायचं आहे आणि परत केव्हांही यायचं नाहीं अशा ठिकाणीं जातांना अशी एखादी लाथ झाडून गेलं पाहिजे कीं, पाण्यांत दगड टाकला किंवा गणपतिविसर्जनाकरितां गणपति पाण्यांत सोडला कीं जसं पाणी हेलावतं, भोंवरे करतं, तसं कांहींतरी झालं पाहिजे आपण निघून गेल्याबरोबर ! अरे, लहान मुलींना खेळतांना पाहिलं आहेस ना तूं ? भातुकलीचा एक खेळ संपवितांना—असेल-नसेल त्याचा चट्टामट्टा करून, खेळायचीं चूलबोळकीं किती घिसाडघाईनं भरून ठेवतात त्या ! किंवा लाथेनंच एखाद्या कोंपऱ्यांत गोळा करून ठेवतात–एखादं बोळकं फुटतंसुद्धां त्या धांदलींत आणि जातात भुर्रदिशीं निघून दुसऱ्या खेळांत रंगण्याकरतां ! तसं कांहींतरी करायला पाहिजे."

मी मनांत विचार करूं लागलों. अशा धसमुसळ्या वृत्तीच्या खोडकर माणसांना भिऊनच परमेश्वरानें माणसाचें मरण त्याला कळूं न देण्याची हिकमत योजिली असेल का ?

—कारण अगोदर मरणाची नोटीस मिळाल्यास जितकीं चांगलीं कृत्यें माणसाच्या हातून घडणें शक्य आहे – त्यापेक्षां वाईट घडणेंहि जास्त शक्य आहे !

—शिक्षेला भिऊन — एखाद्यानें एखाद्याचा खून करण्याचें तहकूब ठेवलें असेल—अशांचे खून त्या दिवशीं घडतील !

—मनांत भरलेल्या, पण अप्राप्य ठरलेल्या प्रेयसींना तो दिवस कठीण जाईल !

—चोऱ्या, दरोडे यांचे धुमाकूळ होतील !

—काय सांगावें, परिस्थितीमुळें सत्य-अहिंसेनें मिरवणारे देशभक्त तेवढ्या वेळांत कित्येक राजकीय खूनसुद्धां पदरीं पाडून घेतील !

घरकोंबड्या माणसानें आपल्या खोलींत घुमवलेले विचार जगाच्या माथीं मारणें मोठें कठीण आहे !

'कांहीं कल्पना' म्हणून त्यांचें कौतुक करतां येईल. वाङ्मयांत त्या कल्पना चांगल्या म्हणून ठरतील, पण खऱ्या जीवनांत—?

—मी कांहीं न बोलतांच तोंडानें शीळ घालूं लागलों.

—तसे सर्वजण उठले व म्हणाले,

"चला आपण जाऊं या आतां; हा बहुतेक लागला घुमायला !"

मी त्यांच्या जाण्याला कांहींच अडथळा केला नाहीं.

तेही मुकाट्यानें निघून गेले !

आम्ही आमच्या अंगणांतच बोलत बसलों होतों. आमच्या घराला अंगण खूप मोठें होतें.

रात्रीचा एक-दीड वाजून गेला होता.

मी घरांत जायच्या विचारांत होतों.

आणि— माझ्या काय अंगांत आल्यासारखें झालें कुणाला ठाऊक ! एक-दोन मिनिटांनीं लहान पोरासारखा मी अंगणांत खूप धांवलों, बागडलों, जमिनीवरच लोळण घेतली !

'उद्यां मेलों तर ?' या कल्पनेनें मी खरोखरच खूप झिंगलों होतों !

थोड्याच वेळांत माझा तो उन्माद थोडासा कमी झाला.

मी एखाद्या पुढाऱ्यासारखा धीमेपणानें घरांत जाऊं लागलों !

जाता माणूस नेहमींच मोठा असतो !

मी आपल्या खोलींत आलों !

आजच मी उदबत्त्यांचा नवीन पुडा विकत आणलेला होता.

तो मी सोडला. आणि खरें सांगू— एक-दोन उदबत्त्या न पेटवितां मी सबंध पुडाच एकदम पेटवला!

दिवस उन्हाळ्याचे होते.

मी तसा फारसा रसिक मनुष्य नव्हे! मला फुलेंसुद्धां फारशीं कोणतींच आवडत नाहींत. मला फक्त एकदोन शौक आहेत!

बसल्या जागीं नेहमीं एखादी उदबत्ती तेवत ठेवणें.

—आणि उन्हाळ्याच्या रात्रीं—

"गजरा मोतियाचा!"

—आजही मोतियाचा गजरा माझ्या टेबलावर होताच! मी त्याचा दोरा सोडला. फुलें मोकळीं केलीं. हातांत घेतलीं.

एखाद्या पुस्तकांत मन रमतें का पाहावें म्हणून एक पुस्तक काढलें, दुसरें काढलें—तिसरें काढलें—पुस्तकें तशींच टाकलीं—आणि अंथरुणावर पडलों.

—हातांतील फुलें मी आपल्या अंगावरच उधळलीं!

माझ्या मनावर कसलीतरी गोड गुंगीच मोहिनी घालून बसली होती!

माझ्या मनांत पण एकदम झटकन् विचार आला कीं, 'उद्यां मेलों तर?' या कल्पनेनें एवढें कां मला मोहिलें आहे?

"उद्यां मेलों तर?" या कल्पनेंतील उद्यां जर पुसली—तर हा प्रश्न नेहमींचाच नाहीं का? प्रत्येकजण आपलें मरण फार तर लांब गृहीत धरीत असेल—पण आपणाला मरणच नाहीं असें तर कोणी गृहीत धरीत नसेल?

"मग उद्यां मेलों तर?" या कल्पनेनें मला एवढें तरारल्या-सारखें कां व्हावें?—काय मी आपलें मरण केव्हांच गृहीत धरलें नव्हतें?

कसें शक्य आहे?

—पण तो विचार कधीं माझ्या मनांत आतांपर्यंत आलाच नव्हता!

—आज तो विचार सहज माझ्या मनांत आला—भांबावून गेलों मी त्या कल्पनेनें!

पण हा कैफ उद्यां उतरेल—या कैफाच्या आठवणीनें एखाद्या वेळीं चार कागद काळे करीन. त्या वेळींही कदाचित् बरें वाटेल!

—पण जीवनावर काय परिणाम होणार त्यांचा ?

—जीवन !

—मृत्यु !!

—सूर्योदय !

—सूर्यास्त !!

—परमेश्वरानें हें जगच मुळीं कसल्यातरी कैफांत निर्माण केलें आहे !

*　　*　　*

—रात्रीचे अडीच-तीन वाजून गेले होते. लवकरच उजाडणाऱ्या पहांटेचा गारवा हवेंत संचरूं लागला होता !

—माझे डोळे मिटत चालले होते !

—"उद्यां मेलों तर ?" मी मनांत पुटपुटलों—

आणि रोजचें मरण जी झोंप तें येण्याकरितां मी अंगावर पांघरूण घेऊन डोळे मिटले.

—आणि सर्व कल्पना तिथेंच थांबल्या.

—कल्पनेची गुंगी झोंपेंत विलीन पावली !

# श्यं. रा. वनमाळी

## बोलके चेहरे

कपडे करून मी बाहेर पडणार, तोंच दारावर 'टिक् टिक् टिक् !' महत्त्वाच्या कामासाठीं बाहेर जातांना व्यत्यय आला म्हणजे कुणाचीही जशी मुद्रा व्हावी तशीच माझी झाली.

"काय रे, या वेळीं बाहेर कुठें ?" आंत येत मोहन म्हणाला. "ही तुझी वेळ म्हणजे पुस्तकें वाचण्याची ! तूं घरीं या वेळीं सांपडायचास, म्हणून तर आलों; नि तूं तर बाहेर पडतो आहेस – कांहीं महत्त्वाचें दिसतें आहे ?" माझ्या पाठीवर थाप मारीत त्यानें विचारलें.

"होय, आहे तसेंच महत्त्वाचें !" मी म्हणालों.

"तें दिसतेंच आहे म्हणा. नाहींतर तुझा बर्नार्ड शॉ नि टॉलस्टॉय नि अल्डुस हक्सले यांचा सहवास सोडून तूं जाणार कसा ?" त्यानें टिंगल केली, व नंतर हळूंच विचारलें, "तरी पण कुठें जात आहे स्वारी ?"

"स्टेशनवर."

"कुणी येणार आहे का ?" व 'कुणी' शब्दावर त्यानें जोर देऊन जो अभिनय केला, त्याबरोबर मला हंसू आलें व मी त्याचा हात हातांत घेत "चल माझ्याबरोबर, जातांना सांगतों तुला" असें म्हणत आम्ही बाहेर पडलों.

कांहीं वेळ न बोलतां आम्ही चालत होतों. "बघ मोहन, तें असें आहे –" माझ्या चेहऱ्याकडे मोहननें बघितलें. पुष्कळसें बोलायचें असलें म्हणजे जी आतुरता चेहऱ्यावर साहजिक यावी, ती छटा मोहनला दिसली.

"एखाद वेळ असा कंटाळा येतो या पुस्तकांचा कीं वाटतें कुठें-तरी गोंगाट, कोलाहल असेल तिथें जावें ! तसें म्हटलें तर mob मला अगदीं आवडत नाहीं, पण खिडकींत उभें राहून, दुरूनच मिरवणूक बघण्यांत जी एक प्रकारची मौज असते ना, तसेंच लांब कोंपऱ्यांत उभें राहून गर्दी, गलबला बघावा असें वाटतें कधीं कधीं ! त्या निर्जीव

पुस्तकांचा व त्यांतल्या काल्पनिक पात्रांचा इतका वीट येतो कीं, खरें life काय आहे हें स्वतः बघावेंसें वाटतें. बाहेरच्या जीवनाची विशालता, संग्राम व काव्य पुस्तकांत सारखें गढून दिसणार कसें? अन् त्या पुस्तकांनीं इतकें एकांगी वाटतें कीं, जीवनांतला महत्तम आनंद आपण गमावतों आहों असें वाटायला लागतें पुन्हां पुन्हां! असें फिरायला निघावें संध्याकाळीं, वाहत्या पाण्याकडे बघत बसावें नि एखादा साधा शेतकरी भेटावा; त्याच्याशीं दोन शब्द बोलल्यावर जी नवीन दृष्टि मिळाल्यासारखी वाटते, ती या पुस्तकांत सांपडत नाहीं पुष्कळदां! पुस्तकें वाईट असें माझें म्हणणें नाहीं, पण तीं किती जीवशून्य, प्राणहीन वाटतात! टेनिसनच्या लेडी ऑफ शॅलॉटप्रमाणें जगाकडे पाठ करून बसावें व खोट्या प्रतिबिंबावरच समाधान मानावें—मला नाहीं आवडत हें! प्रिस्ट्ले, रिचर्ड्स् व गॅल्सवर्दी वाचून इटालियन सुनीताची रचना मला सांगतां येईल किंवा नाटकाचा प्रारंभ कसा करावा हें समजेल, पण रसमय जीवनाची गोडी मला लाभायची नाहीं व आयुष्यांतील कटु प्रमेयें मला समजायचीं नाहींत. आपण आपल्या व्यवसायांत इतके गर्क असतों कीं, एक मुख्य गोष्ट आपण नेहमीं विसरत असतों: ती म्हणजे जीवन! चारचौघांत मला जर सोडलें तर त्यांच्याशीं सहज, न घाबरतां कसें बोलायचें हा मला प्रश्नच पडेल, तेंच एखाद्या भटक्याला (Bohemian) सांगा, त्याला जगाचा जास्त अनुभव असतो, विविध व्यक्ती त्यानें बघितल्या असतात. मुख्य वक्ता यायला उशीर झाला तर काय करावें मला सुचणार नाहीं; 'केसरी' काढून वाचत बसावें लागेल. किंवा पांचगणीला जातांना मध्येंच bus पंक्चर झाली तर तो वेळ कसा घालवावा हें न समजल्यामुळें बावळटासारखा तोंड करून बसेन. पण तो Bohemian चांगलीशी जागा बघेल, डोक्याखालीं उशीसारखे हात घेऊन आकाशाकडे बघत, जवळच्या झुडुपांतल्या पांखराचें गाणें ऐकत, मजेनें, ऐटींत त्या तालावर शीळ घालीत वेळ काढील. कार्लाईल म्हणतो कीं, 'पुस्तकालय म्हणजे विद्यापीठ (University)'. मी नाकारत नाहीं हें एका अर्थीं, पण मला मात्र स्टिव्हन्सनचें म्हणणें जास्त पटतें—'That mighty school of education—the street!' शेक्सपिअर, डिकन्स व बॅल्झॅक

यांनीं मनुष्यस्वभावाचें ज्ञान असेंच रस्त्यांतून, गर्दींत हिंडतांनाच मिळवलें असेल असें वाटतें. माझ्या हातीं थोडी सत्ता असती तर प्रत्येक कॉलेजियननें आठवड्यांतून दोनतीनदां स्टेशनवर जाऊन मेल ट्रेन्स बघितल्याच पाहिजेत, असा नियम केला असता."

"म्हणून तूं स्टेशनवर चाललास वाटतें ?" मोहन म्हणाला.

"आणखी एक कारण आहे यापेक्षां जास्त महत्त्वाचें; ऐक. एखादा चांगला चेहरा मिळतो का बघायला म्हणून जात आहें स्टेशनवर—"

मोहन मधेंच रस्त्यांत थांबला.

"अरे, माझ्याकडे असें बघतोस काय ? खरंच, एखादा 'चांगला' चेहरा बघायला मिळावा या अपेक्षेनें जात आहें. एखादे वेळीं इतकी तीव्र व दुर्दमनीय इच्छा होते चांगला चेहरा बघण्याची म्हणतोस ! तुला नाहीं होत तशी इच्छा ? तूं मघां आलास तेव्हां तसली मला प्रबल इच्छा झाली म्हणून बाहेर निघालों होतों."

"पण त्याला बाहेर कशाला जायला हवें ? खिडकींत बसलें कीं वाटेल तेवढे सुंदर चेहरे जातात रस्त्यानें !" मोहन म्हणाला.

"सुंदर नाहीं, चांगला ! सुंदर चेहरा चांगलाच असतो, eloquent असतो असें नव्हे. मुलींची शाळा सुटली म्हणजे वाटेल तेवढे सुंदर चेहरे दिसतात, पण ते सगळेच चांगले, बोलके नसतात. ती पावडर, ते curls, तो गालावरचा रंग–त्यांना का चांगला चेहरा म्हणायचें ? गोऱ्या कातडीचे मुखवटे आपण पुष्कळ बघतों पण तिथें संजीवनी कुठें असते ? बहुतेक सगळे चेहरे कृत्रिमतेनें, वासनांनीं, बुद्धिशून्यतेनें जड, रसशून्य, insipid, coarse दिसतात ! उत्तम काव्य, उत्तम गाणें जसें विरळा, तसेंच उत्तम eloquent चेहरा एखाददुसराच !

"अन् तुला नवल वाटेल, कीं चांगला चेहरा म्हणजे जसें गोरेपण नव्हे किंवा तारुण्य नव्हे कीं रेखीव अवयव नव्हे, तसेंच हा माझा कलावान्, काव्यमय चेहरा श्रीमंतींत सांपडत नाहीं किंवा देहसौंदर्यावर विसंबून नसतो. माळावर उभें राहून पांखरें हांकलणाऱ्या एखाद्या अकिंचन्, साध्या मराठमोळ्या भामिनीचा चेहरा चांगला असतो; किंवा हातांत एकतारी घेऊन रस्त्यानें गाणें म्हणत जाणाऱ्या, चिंध्याचिरगुटांतल्या

वृद्ध भिकाऱ्याचा चेहरा मोहक असतो. आणि तसें म्हटलें तर तरुणांपेक्षां वृद्धांचेच चेहरे जास्त आकर्षक व बोलके असतात. फोटोग्रॅफिक चढा-ओढीमधल्या 'Portrait' या नांवानें येणाऱ्या वृद्धांचे चेहरे बघ! आयुष्याच्या निखाऱ्यांतून प्रवास केल्यावरही, मृत्यूची सांवली पडली असतांना, निरागस, हांसरा, बालिश भाव दाखविणारा चेहरा श्रीमंतींत दिसायचा नाहीं. स्फटिकपात्रांतून दीपकळीनें लकाकावें त्याप्रमाणें अंतरींची सोज्ज्वलता त्यांच्या मुखमंडलावर खेळते. कडू हालाहल प्राशन करून मस्तकावर चंद्रकोर व श्रीगंगा धारण करणाऱ्या शंकराच्या प्रसन्नतेची छटा त्या वृद्धांच्या चेहऱ्यावर दिसते, नि असें वाटतें कीं, त्या प्रत्येक धवल केंसांत, कपाळावरील रेषेंत व डोळ्या-ओंठाभोंवतींच्या प्रत्येक सुरकुतींत 'आयुष्य म्हणजे समरभूमि आहे; बघ — हीं वीराचीं चिन्हें!' असा लेख लिहिला आहे कीं काय!

"अशा बोलक्या, गूढ चेहऱ्यांचें मला वेड आहे व मी कुठेंही गेलों तरी माझी दृष्टि अशी भिरभिरत असते. पुष्कळदां निराशाच होते; क्वचित् हवें तें दिसतें. वॉल्ट् व्हिट्मनची "Faces" कविता माहीत आहे तुला?

"लहानपणीं आपण कादंबऱ्या वाचत असूं ना, त्या वेळीं मला काय आवडायचें सांगूं? बागेचें किंवा सृष्टिशोभेचें वर्णन! कांहीं दिवसांनीं तें आवडेनासें झालें; संवाद आवडूं लागला; नंतर पात्रांचे स्वभाव व त्यांचे मनोव्यापार आवडूं लागले; सृष्टिवर्णनें व संवाद फिके पडले. या चेहऱ्यांच्या बाबतींतही तसेंच झालें आहे. आधीं फिरायला गेलों म्हणजे मावळता सूर्य, आकाशाचा निळा पसारा, पांखरांचा थवा यांतच मन रमे. आतां त्यांपासून आनंद होत नाहीं असें नव्हे, पण आतां चांगला चेहरा शोधत असतों व तो इतका arresting कां हें शोधण्यांत मन गर्क असतें. 'ह्या चेहऱ्याच्या मोहकतेचें कारण काय? मी बघत इतका वेळ कां उभा राहतो? तो चांगला चेहरा बघितला म्हणजे मला कसची आठवण होते? तो मला काय सांगतो?' असे प्रश्न मन सारखें विचारीत असतें. तें गूढ, तें रहस्य पुष्कळदां उकलत नाहीं, पण त्या आकर्षकतेचें रहस्य कळलें म्हणजे विश्वाच्या मध्यबिंदूजवळ आल्यासारखें वाटतें.

"एक ग्रंथकार म्हणतो तें खरें आहे कीं, मनाला असें शिक्षण देऊन, दृष्टि अशी शोधक करून रस्त्यानें निघालें म्हणजे शंभर पावलांच्या आंत असा एकतरी चेहरा दिसेल कीं, ज्यावरील गूढ, किंवा tragic, किंवा अव्याज भाव बघून तुम्हांला किंचित् चपापल्यासारखें होईल. पण त्या चेहऱ्याची ओढ पुष्कळ वेळ टिकत नाहीं. दुसरा तेवढाच आकर्षक चेहरा दिसतो व कांहीं काळानंतर त्याची विस्मृति पडते. पण कधींकाळीं, पुष्कळ अंतरानें, वर्षांतून एखादवेळ, असा एखादा चेहरा तुमच्या बघण्यांत येतो कीं कांहीं केल्या त्याची ओढ कमी होत नाहीं, it haunts you, व स्मृति पुसट होत नाहीं.

"असे एकदोन चेहरे माझ्या स्मृतिमंजुषिकेंत आहेत व मजजवळच्या साऱ्या पुस्तकांपेक्षां ते मला जास्त मोलाचे वाटतात. कधीं मला उदास वाटलें व कशानेंहि मनाला गोड वाटलें नाहीं—पाऊस सारखा पडत असला म्हणजे मला अस्वस्थ होतें—म्हणजे त्या बोलक्या चेहऱ्यांच्या आठवणीनें दीर्घकाळानंतर प्रियजनांची भेट झाल्याप्रमाणें शांत व प्रसन्न वाटतें.

"बघ, मोहन, स्टेशन आलें. मेल आली असेल. बघूं या एखादा चांगला चेहरा दिसण्याचें भाग्य आहे का आपलें!"

# शंकर साठे

## दुसऱ्याला दिलेलीं पुस्तकें

'पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम्' असें एक जुनें सुभाषित आहे; परंतु दुसऱ्याकडे दिलेलीं सर्वच पुस्तकें, स्त्रिया अगर पैसा नाहींसा होतोच असें नाहीं. स्त्रियांविषयीं बोलणें नाजूक म्हणून तो भाग सोडला तरी वित्त हें (कर्जाऊ दिल्यास) वाढण्याचाच संभव. पुस्तकें वाढत नाहींत. त्याचे चार-दोन पंख कापल्या स्थितींत अगर 'यदि चेत्पुनरायाति नष्टं भ्रष्टं च खंडितम्' या उत्तरचरणाप्रमाणें नष्टावस्थेंत परत येण्याचा संभव असतो.

परंतु दुसऱ्याकडे दिलेलीं पुस्तकें परत येतांना केव्हां केव्हां गंमतीचा इतिहास परत आणतात यांत शंका नाहीं. लैंगिक विषयांवरचीं पुस्तकें परत येतांना एखाद्या लग्नपत्रिकेप्रमाणें कुंकुमचर्चित होऊन परत येतात व आपण मनांत तरी समजतों कीं, या पुस्तकाला एखाद्या दांपत्याचा अगर कामप्रदेशांत नव्यानें प्रवेश करणाऱ्या युवतीचा हस्त-स्पर्श झाला आहे. असलीं पुस्तकें बिछान्याखालीं ठेवून वाचलीं जात असल्यानें जातांना नवकलिकेसारखें गेलेलें पुस्तक येतांना चुरून वाळलेल्या पाचोळ्याप्रमाणें परत येतें. तत्त्वज्ञानावरचें पुस्तक पहिलीं पांच-सहा पानें हाताळल्यानंतर कोऱ्या स्थितींतच परत येण्याची शक्यता. उलट, चित्रयुक्त पुस्तक बब्रीपासून बाब्रापर्यंत सर्वांच्याच बोटांचे ठसे घेऊन प्रवेश करतें. कवितेच्या पुस्तकासंबंधीं मात्र केव्हां केव्हां मजेचा अनुभव येतो. त्यांतील प्रणयाराधनेसंबंधीं असलेल्या कवितेवर पेन्सिलीची बारीकशी खूण आढळते. केव्हां केव्हां तर द्वितीय हस्ताकडून तृतीय हस्ताकडे व तिथून परत प्रवास केलेलें हें पुस्तक घाईघाईत परतलें गेल्यामुळें एखादी प्रेमचिठ्ठीही परत आणतें. दोन प्रणयी युगुलांना आपल्या मूक भावना व्यक्त करण्याकरितां आपल्या पुस्तकाचा उपयोग झाला हें पाहून आनंद वाटतो. उलट, एखादे वेळीं असाही अनुभव येतो कीं, आपल्या शिकारीवर नेम धरण्याची प्रतारणा आपला मित्र

करीत आहे; आणि अशा वेळीं जें वाटतें तें सावज हुकलेल्या शिकाऱ्यालाच पुसावें झालें!

पुस्तकावर वेष्टणपत्र घातलें असेल तर तें काढून मुखचित्र पाहण्याचा मोह न होणारा वाचक स्थितप्रज्ञ स्थितीला पोंचलेला असावा असें खुशाल समजावें. वक्ता व गवयी यांची वाणी ऐकावयाची असली तरी त्यांचें तोंड दृष्टीच्या टप्प्यांत असल्याखेरीज जसें आपलें समाधान होत नाहीं, तसेंच पुस्तकाचें असतें. या मनोजिज्ञासेला फारसें नांव ठेवतां येणार नाहीं. परंतु बुरखा टाकून दिलेल्या तरुणीप्रमाणें जेव्हां नग्नमुख पुस्तक परत येतें, तेव्हां अस्सल सुधारकालाही दुःख होतें. कारण तरुणींच्या गालांवरील संस्कार परत येईतों नाहींसेहि झालेले असतात; परंतु या स्थितींत आलेलीं पुस्तकें आपल्या गालांवर अंगुलिचिन्हांचा छाप घेऊन येतात. मग मात्र आपण सावध होतों व फिरून पुस्तक देते वेळीं आलेक्झांडर ड्यूमाच्या लोखंडी मुखवट्याप्रमाणें पक्क्या मुखवट्यानें पुस्तकाचें मुख झांकूनच मग द्यावयाचें तें पुस्तक देतों. उलट, अशीही केव्हां केव्हां गोष्ट घडते, नाहीं असें नाहीं, कीं शेजारच्या घरांत गेलेलें मांजरीचें पोर जसें लाल फितीची गळपट्टी गळ्यास बांधून येतें, तसें पुस्तकही सुंदरशी गळपट्टी बांधून येतें. पण हा अनुभव एकंदरींत विरळाच!

चित्रांचें पुस्तक दुसऱ्याकडे देतांना मात्र मी नेहमींच भयग्रस्त असतों. कारण आमच्या मधुकरानें पुस्तक नेलें कीं त्यांतील चित्रांच्या बाह्यरेषा आणखी पांचसहा पानांवर उमटलेल्या असतात. चित्र कापून न घेतां पुस्तक बिघडविण्याचा हा राजमार्ग आहे. अशा वेळीं पुस्तक येतें त्यांत चित्रागणिक शेतनांगरणी केल्याचा भास होतो. या नांगरणीपेक्षा 'कापणी' करणारीं कुळें बरीं असें वाटूं लागतें.

कांहीं वाचक मात्र समंजस असतात. दात्याकरितां ते केवढी पाकसिद्धि तयार करून ठेवतात! त्यांत पानन् पान तांबड्या-निळ्या खुणा व मार्येत वाचकमहाशयांचे शेरेहि असतात. अशा वेळीं दिलेलें पुस्तक येतांना मल्लीनाथीसह येतें. आपल्या पुस्तकाची ही निघालेली सटीक आवृत्ति पाहून आनंद मानणारे दाते मात्र क्वचित्! पण हा काय त्या वाचकांचा दोष वाटतें? वाचकांशी या बाबतींत बोलूं जाणें

म्हणजे कृतघ्नता प्रकट करणेंच नव्हे काय? तो बिचारा आपलें डोकें व हात यांना शीण देऊन आपलें सर्व ज्ञान त्या पुस्तकावर उमटवितो आणि आपण काय पुस्तक थोडेंसें बिघडविलें म्हणून त्याला दोष द्यावयाचा?

एका गृहस्थाकडे मी राजकारणशास्त्रावरचें एक पुस्तक दिलें होतें. विषय राजकीय असल्यामुळेंच कीं काय, तें परत आलें तेव्हां त्याला रणांगणाचें स्वरूप आलें होतें. जुनीं विधानें खोडून टाकून म्हणजे त्यांच्या कत्तलीमुळें---तांबड्यानिळ्या रक्तवाहिन्याही दिसत होत्या. त्या जागीं वाचक महाशयांचीं विधानें स्थानापन्न झालीं होतीं. कांहीं कांहीं ठिकाणीं मार्येत माऱ्याच्या जागा रोखून ठेवण्यांत आल्या होत्या. कुठें कुठें 'अगदींच मौर्ख्य' वगैरे उद्गारांनीं शत्रूची हेटाळणी करण्यांत आली होती. शेवटीं पुस्तक परत आलें तेव्हां त्या पुस्तकाचा लेखक व माझ्या-कडून पुस्तक नेलेला वाचक यांच्या द्वंद्व युद्धाच्या सामन्याचें त्याला स्वरूप प्राप्त झालें होतें.

पण इतकें असूनही दुसऱ्याकडे पुस्तकें देणेंच मला आवडतें. पुस्तक नेणारा प्रत्यक्षाप्रत्यक्ष आपल्या घरांतील कितीतरी इंगितें मला सांगतो. त्यांची यादी द्यावयाची तर चर्पटपंजरीच होईल. त्याच्या घरांत मुलें आहेत काय, असल्यास त्यांच्या वाढलेल्या नखांची लांबी किती, तो तेल कोणतें वापरतो, घरांत घासलेटचा दिवा आहे कीं विजेचा, तोंडाला हिमालया स्नो चोपडतो काय, उघडपणें पुस्तकें वाचण्याची त्याला मनाई आहे काय, घरांत अलीकडे हळदीकुंकू झालें होतें काय, पुस्तक 'सह' वाचलें जातें काय, तसें असल्यास दोघांत कधीं लढाई होते काय, वाचकाला ग्रंथाचा उपयोग लहान पोरांच्या शीर्षभेदाकरितां शस्त्र म्हणून करण्याची संवय आहे काय— थांबा, पुढें सांगत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें तर, तुम्ही आपापलीं पुस्तकें तपासा म्हणजे कळेल कीं दुसऱ्याकडे दिलेल्या पुस्तकांवर कितीतरी शेरलॉक होम्सी करतां येते ती!

# ज. का. भिडे

## फुकट आइस्क्रीम

परवां आम्ही कांहीं स्नेही अहमदाबादला सुखसंचारार्थ गेलों असतांना तिथें एका गुजराथी हॉटेलांत उतरलों होतों. तिथें एक दिवशीं रात्रीं एक छोटासा गमतीदार प्रसंग घडला. दिवसभर स्वैर भटकल्याकारणानें आम्ही दमलों होतों. भागलेलीं शरीरें कॉटवर पसरून शिणलेल्या मनांनीं एकमेकांशीं झोंपतां झोंपतां गप्पा करीत नुकतेच आम्ही पडलों होतों. रात्रींचे साडेदहा वाजून गेले होते आणि पोटांत कांहीं घेण्याची आम्हांला मुळींच इच्छा नव्हती. इतक्यांत कोंपऱ्यांतल्या जिन्यावरून एका प्रवासी माणसानें बातमी आणली. अगदीं आनंदानें गहिंवरून सांगितलें त्यानें: "खालीं आइस्क्रीम तयार झालं आहे; ज्यांना खायचं असेल त्यांना मालकांनीं बोलावलं आहे."

मोठी स्वागतार्ह वाटली आम्हांला ही बातमी. एकसारखें गार पाणी पिऊनही आमची तहान अतृप्त राहिली होती. अशा वेळीं आइस्क्रीमचं आमंत्रण! किती बहारीची गोष्ट! पण पैशाचा प्रश्न होताच आमच्या डोळ्यांपुढें. प्लेझर ट्रीपसाठींच आम्ही अहमदाबादला गेलों होतों; तेव्हां सर्व दिवसभर आमचे पैसे एकसारखे खर्च होत होते. त्यामुळें अस्वस्थ मनानें आम्ही आइस्क्रीमचें हें आमंत्रण ऐकून एकमेकां-कडे नुसतें पाहिलें. आमच्या त्या दृष्टींतून आम्ही जणूं परस्परांना मूक अभिप्रायच विचारीत होतों, "का हो? खायचं का आइस्क्रीम? पण पैसे?..."

आम्हांला आइस्क्रीम पाहिजे होतं; पण पैसे खर्चावे लागणार या कल्पनेनं आम्ही स्वस्थ राहून आढ्याकडे नजरा लावून चळवळत पडलों. इतक्यांत हॉटेलचा मॅनेजर वर आला आणि सर्वांना उद्देशून हात वर करून त्यानें चुटकी वाजविली अन् तो म्हणाला, "हॉटेलच्या रेस्टॉरंटमधें आइस्क्रीम तयार आहे. ज्यांना खायचं असेल त्यांनीं तिथं जावं! पैसेबिसे द्यावे लागणार नाहींत—फुकट आहे..."

तें ऐकल्याबरोबर पोटापर्यंत ओढलेल्या चादरी आम्ही सर्वांनीं फेंकल्या आणि आपापल्या कॉटवर उठून बसलों. फुकट आइस्क्रीम खायला मिळणार होतं आम्हांला! फुकट!!

आम्ही पायांत वहाणा सरकवल्या व आनंदानें जिन्याकडे गर्दी केली. त्या समाईक हॉलमधले इतर चारपांच प्रवासीही जिन्याकडे धांवले. किती आनंद झाला होता आम्हांला! जणूं आमचे सर्व सुखदुःखाचे प्रश्न त्या 'फुकट आइस्क्रीम'नें सुटणार होते! खरेंच, मनुष्याला जर कोणीं सांगितलें कीं, "हें विश्व तुझं आहे. जगांतल्या वाटेल त्या वस्तूची तूं इच्छा कर, ती तुला फुकट मिळेल! खा, पी, मजा कर! मन मानेल त्याची लूट कर! फुकट आहे सर्व!" तर त्याचे सुखदुःखाचे प्रश्न अजिबात सुटतील— किंबहुना ते उद्भवूंच शकणार नाहींत असें म्हणतां येईल काय?

निदान आम्हांपैकीं प्रत्येकानें अशा परमोत्कट हर्षभरानें जिन्यांतून खालीं जायची अशी गर्दी केली कीं, "फुकट म्हणजे सर्व सुखांचा शोध नि दुःखांचा नायनाट!" असाच अर्थ त्यांतून कुणींही काढावा. पण...

मी सहज मागें वळून पाहिलें. हॉलच्या कोंपऱ्यांत आमच्याबरोबर न धांवणारा एक प्रवासी कॉटवर तसाच पडून राहिलेला मला दिसला. रोज त्याच्याजवळचीं वर्तमानपत्रें फुकट वाचायच्या निमित्तानें माझी नि त्याची ओळख झालेली होती. मी त्याच्याजवळ गेलों आणि त्याला विचारलं, "तुम्ही चला कीं आइस्क्रीम खायला!" त्यावर तो किंचित् हंसला आणि "आतां या गृहस्थाला काय सांगावं?" असा आविर्भाव करून त्यानं भिंवया आंकसून मोडल्या. पण लगेच तो म्हणाला, "आलों असतों आइस्क्रीम खायला, पण तें फुकट आहे तेव्हां नाहीं वाटत जावंसं मला."

मी एकदम चमकलों त्याच्या त्या किंचित् उपरोधिक, मानी व सुसंस्कृत उद्गारांनीं. आणि मग 'फुकट' या विषयावर आमचें बोलणें झालें. म्हणजे तोच जवळजवळ सर्व बोलत होता.

अत्यंत प्रामाणिकपणें सांगत होता तो: "फुकट मिळणाऱ्या वस्तू-इतका महाग जिन्नस जगांत दुसरा कोणताही नाहीं. उधारी, उसनवारी यापेक्षांही मानहानीचं जिणं 'फुकट' पासून भोगावं लागतं. त्यांत समाधान

मानणारे लोक बहुतेक सर्वच असतात. कारण, ज्याला मोल द्यावं लागतं तो जिन्नस फुकट मिळत असल्यास घ्यायचा मोह अनावर असाच असणार. आपले पैसे वांचत असले तर लोकांना हवे असतात. पण एखादी गोष्ट तुम्हांला फुकट मिळाली तर तुमचे पैसे वांचले असं समजणं चूक आहे. कारण एखादी गोष्ट फुकट देणारा माणूस तुमच्यापासून पैसे घेणार नाहीं हें खरं; पण पैसा हीच का एक मोलाची गोष्ट आहे? तो माणूस तुमच्यापासून पैशाशिवाय अधिक मौल्यवान् असं कांहींतरी घेऊन ठेवीत असतो आणि तें म्हणजे तुमची भीड, तुमची कृतज्ञता, तुमचा विश्वास! त्याचा उपयोग वेळ आली कीं करून घेतल्याशिवाय तो कधींही राहावयाचा नाहीं, आणि जेव्हां तशी वेळ येते तेव्हां त्यानं दिलेल्या त्या 'फुकट' वस्तूच्या मूळ किंमतीपेक्षांही कितीतरी पटीनं जास्त किंमतीचीं अशीं आपलीं कामं तो तुमच्याकडून करून घेत असतो."

तो माणूस इथेच थांबला– नव्हे, थांबावें लागलें त्याला. कारण 'फुकट आइस्क्रीम'वाले माझे स्नेही रुमालानें तोंड पुशीत वर आले होते आणि माझ्या न येण्याचें कारण विचारण्याऐवजीं आपापसांत ते उद्गारीत होते, "बस्स, याच ठिकाणीं उतरायचं बुवा नेहमीं!" "हॉटेलचा मालक मोठा उमदा माणूस हं!" तिसरे गृहस्थ कौतुकानें बहरून उजव्या हाताचा पंजा हवेंत पसरून उद्गारले, "अहो, आग्रह तरी किती! जाईना शेवटीं!!"

माझ्या डोळ्यांपुढें मात्र त्या वेळेस 'फुकट आइस्क्रीम'चें कौतुक मुळींच नव्हतें, तर त्या सुसंस्कृत प्रवाशाचें म्हणणें पुनःपुन्हां येत होतें. आपल्या ग्राहकांच्या मनांत आपल्या हॉटेलबद्दल कायमचें आकर्षण टिकविण्यास्तव आमच्या मालकानें सर्वांना तें आइस्क्रीम दिलें होतें. माझ्या डोळ्यांपुढें माझ्या विमा-एजंटाचें चित्र लगेच उभें राहिलें. मी पुण्यास असतांना पहिल्या भेटींत त्यानें मला 'लकी'मध्यें 'लेमन स्क्वॅश' दिलें होतें आणि अगत्यपूर्वक सिगरेट-केस उघडून माझ्यापुढें 'गोल्ड फ्लेक' केली होती. अगदीं हीच तऱ्हा माझ्या कापडवाल्याची! कोटासाठीं 'रेवेरा ॲन्टी-क्रीझ्' कापड घेण्यासाठीं मी त्याच्याकडे जातों; पण लगेच तो माझ्यासमोर रेशमी, पाम बीच, नेव्ही ब्ल्यू, फ्रेंच लिनन इत्यादि उंची कोटिंगचा ढीग उभा करतो, माझ्याभोंवतीं दिव्यांचा झगझगाट

करून टाकतो, डोक्यावरचा पंखा सुरू करतो आणि मी "कशाला हें इतकं ?" असें सारखें म्हणत असतांही "आपण यांतलं घेऊं नका साहेब ! पण नुसतं पाहा" असें नम्रतेनें म्हणून आपलें अगत्य दाखवीत असतो ! मला मनांत सहजपणें वाटतें, कशाला तो उगाच 'साहेब' असें सन्मानानें संबोधीत असतो मला ? व पांचदहा मिनिटं तरी एक-रुपया-वार कापड घेणाऱ्या माझ्यासारख्या माणसांसाठीं सेवा कां करतो ?...

केवळ फुकट ?

तो माझी भीड, कृतज्ञता जिंकीत असतो. नेहमींच्या व्यवहारांत धंदेवाईक माणूस तुमच्यासाठीं असं 'फुकट' अगत्य दाखवून तुमचें 'आईस्क्रीम' कसें करीत असतो, हें वर सांगितलेल्या दोनतीन उदाहरणांनीं दिसेल. धंदेवाल्या माणसाची ती एक कला आहे असेंही म्हणतां येईल...

पण त्याच अनुरोधानें प्रत्येकानें आपापले अनुभव तपासून पाहावे म्हणजे त्याला कळून येईल कीं, जें आपल्याला फुकट वाटतें तें फार महाग आहे ! अशा दृष्टीनें कीं, समाजांत वावरतांना आपल्या सांस्कृतिक दर्जाचा अपकर्ष ज्यांचे आपण 'फुकट'चे उपकृत झालेले असतों त्यांच्याकडून होत असतो. त्याचप्रमाणें कोणतीही वस्तु बिनमोल मिळवायची संवय झाली कीं, आपल्या आयुष्याची किंमतही कमी होत जाणार यांत शंका नाहीं. कारण असें पाहा, तुमच्या घरांतल्या जिनसा जर तुम्ही 'फुकट' मिळवायचा प्रयत्न करून मिळविलेल्या असतील, तर तुमच्या त्या संसाराला कांहीं मोल आहे असें म्हणतां येईल काय ? शिवाय असेंही पाहा, आपल्या आयुष्यांत आपण मिळविलेल्या गोष्टींकडे कधीं नजर टाकावयाची स्फूर्ति आपल्याला झाली आणि त्या गोष्टींत असा 'फुकट'चा इतिहास आहे असें जर आपल्यास कळून आलें, तर किती उद्वेग वाटेल आपल्या मनाला आपलें तें बिनमोल जीवित पाहून ?

उद्यां तुम्हां-आम्हांला जगांतल्या साऱ्या वस्तू फुकट आहेत, त्यांची लूट करा, असें सांगितलें तर तुमचे सुखदुःखांचे प्रश्न सुटतील काय ? यावर आतां असें सांगतां येईल कीं, प्रत्येक गोष्ट मिळवावयाची तर तिला मोल दिलेंच पाहिजे हा व्यवहार आहे. तें मोल देऊन पाहिजे ती वस्तु मिळवायची म्हणजे श्रम, बुद्धि, सामर्थ्य यांचें मोल खर्चीं घालून

आपण आपलें किंमती नाणें मिळविलें पाहिजे. कांहींच खर्चीं न घालतां सर्व जग 'फुकट' मिळालें तर बहार होईल हा विचार कल्पनारम्य दिसला तरी अतिशय उद्वेगजनक नाहीं का? कारण मग ईर्षा, पराक्रम, साहस इत्यादींनीं जीविताला प्राप्त होणारी मौलिकता नष्ट होणार नाहीं काय? सर्वच गोष्टी माणसांना फुकट मिळूं लागल्या कीं त्यांच्या ठिकाणीं जगण्याची तळमळ, कर्तृत्वाची आकांक्षा, मानमरातब मिळवायची हांव, आपल्या सांस्कृतिक विकासाची धडपड इत्यादि जिवंत चळवळी नाहींशा होऊन तो 'फुकट' मृतप्राय होऊन पडून राहील!

'फुकट' हा शब्द ऐकल्याबरोबर हे सारे विचार मला प्रगट करावेसे वाटतात. निदान तो शब्द ज्यांना जादूसारखा वाटतो त्यांना अहमदाबादच्या त्या हॉटेलांत मला भेटलेल्या त्या सुसंस्कृत, श्रेष्ठ दर्जाच्या माणसाचा तो 'संदेश' द्यावासा वाटतो कीं, "फुकट मिळणाऱ्या वस्तूइतका महाग जिन्नस जगांत दुसरा नाहीं!"

# ना. मा. सन्त

## आजारीपणाचं सुख

गेल्या कित्येक दिवसांपासून आजारी पडण्याचा बेत मी मनाशीं करीत आहें; पण तो कांहीं केल्या सफळ होऊं नये असाच योग दिसत आहे. त्यामुळें माझं मन कसं अगदीं बेचैन झालं आहे. चित्रपट पाहायची इच्छा व्हावी आणि तो चटकन् पाहतां यावा, किंवा सहलीला जायचं मनांत यावं आणि तेंही सहज सहज जमवतां यावं, तसं आजारी पडण्याचं सहज सहज जमलं असतं तर किती किती बरं झालं असतं! मनांत आलं कीं आजारी होतां येण्याची युक्ति अजून कशी कुणीं शोधून काढली नाहीं याबद्दल मला राहून राहून आश्चर्य वाटत आहे. नाहीं म्हणायला माझ्या एका मित्रानें मागें परीक्षेला चाट द्यायची म्हणून ताप भरण्याचं इंजेक्शन घेतल्याचं मला पक्कं आठवतं. पण ज्या अमोघ इंजेक्शननं हमखास ताप भरतो तें अजून सर्वसाधारण डॉक्टरमहाशयांनां ज्ञात झालेलं दिसत नाहीं. अन् ज्या माझ्या मित्रानं हा प्रयोग अगदीं यशस्वी रीतीनं करून पाहिला होता, त्याचा मजजवळचा पत्ता गहाळ झाल्यानें त्या अवलिया डॉक्टरचा तलास लावणंही मोठं कठीण काम होऊन बसलं आहे. आजारी पडण्याची—थोडंसं आजारी पडून अंथरुणांत लोळत पडण्याची—लहर तर मला वारंवार येते आणि आजारी पडण्याचं तंत्र हें असं परावलंबी! माझी किती कुचंबणा होत असेल तें एक माझं मलाच ठाऊक!

आजारी पडण्याची हुक्की मला जी वारंवार येते ती दररोजच्या चक्रनेमिक्रमांतून कांहीं काळ सुटी मिळावी म्हणून नव्हे किंवा अतिकामानं जीव वैतागला म्हणजे आजाराच्या निमित्तानं विश्रांतीचं सुख मिळावं म्हणूनही नव्हे. कारण विश्रांतीचं सुख केवळ आजारांतच घेतां येतं असं थोडंच आहे? विश्रांतिसुखाची मौज लुटण्याच्या अनेक तऱ्हा आहेत आणि त्या आपापल्या परीनं अत्यंत आल्हाद देणाऱ्या आहेत हें मला मान्य आहे. पण आजारी पडण्यांत—थोडंसं अंग मोडून येऊन अंथरुण पसरविण्यांत

—जें एक सुख आहे तें या सर्वांहून अगदीं न्यारं आहे असं माझं मत आहे.

आजारीपणाची कल्पनाच किती हृद्य आहे पहा! अंग मोडून आल्याचं निमित्त करून ऑफिसला चिठ्ठी पाठवायचा योग आला कीं एकाद्या पर्वणीचा योग यावा असं मला वाटतं! एखादा सुंदर नांवाजलेला चोलपट संध्याकाळीं पाहायला येण्याचं आमंत्रण अचानकपणें यावं म्हणजे जी एक सुखाची हुरहूर मनाला लागून राहते तशीच अगदीं मला त्या दिवशीं लागून राहते. मग त्या दिवशीं माझा मुक्काम अंथरुणांत; आणि खरं सांगायचं तर अंथरुणाचं सुख घ्यायचा प्रसंग आजारीपणाशिवाय तरी केव्हां येतो? एरवीं डोळ्यांवर झोंप आली कीं अंथरुणावर अंग टाकायचं आणि निद्रेच्या आधीन व्हायचं हा कार्यक्रम! पण आजारीपणांत तसं नसतं. गादीच्या भरदारपणाचा आल्हाद घेण्याकडे आपली प्रवृत्ति असते. उशांच्या मृदुमृदुल संभारांत आपलं डोकं रुतवून घेण्याचं सुख आपण मनमुराद घेत असतों. पांघरुणाच्या गुलगुलित उबदारपणाची लपेट तर या वेळीं इतकी सुखावह वाटते कीं, तिला कसली उपमा द्यायची म्हटलं तरी देतां यायची नाहीं. या ऐषारामांत तापाच्या ग्लानीची मजा घेत पडावं आणि जरा वेळानं जों डोळे उघडावेत तों आपली खोली आपल्याला निराळी वाटूं लागते. नेहमींपेक्षां खोलीची स्वच्छता आणि टापटीप वाढल्याचं प्रत्ययाला येतं. खिडकीचे निळसर तलम पडदे आटोपशीरपणें सरकवून घेतल्यावर अन् खिडकीचीं तावदानं किलकिलतीं करून घेतल्यावर खोलींत जो एक गारवट मंद अंधार पसरतो, त्यामुळें तेथील वातावरणाला अद्भुतरम्यतेची झांक आल्यासारखं वाटतं! पण ज्या एका गोष्टीनं माझं मन एकदम प्रसन्न होतं ती गोष्ट म्हणजे खोलींत पसरलेला मंद मंद दरवळ! माझा कोमट झालेला हात माझ्या मस्तकाकडे वळतो आणि तिथं आपल्या शीतल स्पर्शानं मस्तकाला आणि डोळ्यांना आराम देणारी कोलनवॉटरची घडी ठेवलेली आढळून येते. पलंगा-जवळच्या शुभ्रवस्त्राच्छादित तिवईवर ठेवलेली तांबड्या औषधाची बाटली आणि ग्लास नजरेस पडलीं कीं मात्र अंगांतून शहाऱ्याची एक चमक निघून जाते. पण तिच्याच पलीकडे पांढऱ्या चकाकणाऱ्या डिशमध्यें मांडून ठेवलेलीं रसाळ घोंसदार द्राक्षें आणि दाळिंबी रंगानं रसरसलेलं दाणेदार दाळिंब हीं पाहलीं कीं जीव खालीं पडतो.

पण आजारीपण मला जें हवंहवंसं वाटतं तें केवळ औषधावर द्राक्षदाळिंबाची चविष्ट मुखशुद्धि खायला मिळते म्हणून नव्हे, तर दाळिंबाहून मधुर आणि द्राक्षाहून गोड अशा माझ्या पत्नीचा प्रेमळ सहवास या वेळीं मला घडतो म्हणून ! होय, याच वेळीं घडतो म्हणून ! कारण एरवीं तिच्या स्वभावाला व्यवहाराची मुरड पडल्यानं एक प्रकारची रूक्षता प्राप्त झालेली असते. मुलांच्या खस्ता काढतां काढतां त्रासिकपणाची लकेर तिच्या स्वभावांत चमकतांना आढळते. संसाराचे कष्ट उपसतांना वल्लभेचीं कर्तव्यं दुर्लक्षित करण्याकडे तिचा कल होऊं लागतो. मग तिच्या या तुटक संसारीपणाचे सल माझ्या हृदयाला इतके बोंचूं लागतात कीं, या सहजीवनाचा सासुरवास संपावा म्हणून मी आजारी पडण्याची इच्छा तीव्रतेनें करूं लागतों. कारण मी एकदां अंथरूण पसरलं कीं तिच्या या कडवट वृत्ती एकदम मधुर स्वरूप धारण करतात, आणि तिच्या प्रेमळपणाला जणुं उधाण येतं. तिच्या स्वभावांतल्या साऱ्या कोमल वृत्ती एकदम उचंबळून येतात, आणि त्यांचं सिंचन तिला ज्या ज्या तऱ्हेनं करणं शक्य असतं त्या त्या तऱ्हेनं ती मजवर करूं लागते. माझ्या उशालगत तिनं एकदां बैठक मारली कीं तेथून हालणं तिच्या जिवावर येतं. मग ती आपल्या नाजुक हातानं कपाळाला बाम चोळील किंवा उगीचच चाळा म्हणून डोक्याचे केंस कुरवाळीत राहील. ताप अंगांत भरला कीं तिचा गार कोमल स्पर्श अमृतासारखा वाटावा ! पाय चेपल्याशिवाय किंवा पाठ दाबल्याशिवाय तिला चैन पडणार नाहीं. हें चाटण घ्या, तो सुंठवडा घ्या, मोरावळा देऊं का ?— म्हणून नाहीं नाहीं ते लाडिक आग्रह करील ! अन् हें सर्व चालू असतांना तिचं जें बोलणं सुरू असतं तें तरी किती गोड आणि लाडिक ! अमुक करूं या अन् तमुक करूं या म्हणून तिच्या मनांतले सारे मधुर बेत मला या वेळीं कळायचे. आणि माझ्या आजाराच्या निमित्तानं घडलेल्या या मधुर-मीलनांत आमच्यांत सांठलेलीं गैरसमजाचीं जळमटं जळून खाक होऊन मनं पुन्हां निर्मळ व्हायचीं !

मित्रांचं तरी काय असंच ! ज्यांच्या भेटीचीं वाट पहात तिष्ठत असावं त्यांची भेट एरवीं सुखासुखीं होईल तर शपथ ! कामाच्या कचाट्यानं जेव्हां ज्याला सवड होईल तेव्हां त्याची भेट. मनांत असूनही

परिस्थितीमुळें कठोरतेचं कवच धारण करावं लागतं तें असं! पण आजारी-पणाचा सुगावा लागायचा अवकाश कीं हें कठोरपणाचं कवच जेथल्या तेथें गळून पडावं आणि आंतला स्नेहाळ गाभा विकसित व्हावा. मग या ना त्या कारणानं दुर्मिळ झालेले सारे दोस्त एकामागून एक हजर व्हायचे आणि त्यांच्या प्रेमळ कीं संमीलनाचं विलोभनीय सुख त्या वेळीं मिळायचं! सारे जमले कीं जिव्हाळ्याची विचारपूस व्हावयाची, फिरफिरून भेटण्याचीं स्नेहाळ आश्वासनं मिळायचीं आणि काव्यशास्त्रविनोदाचा आनंद खळखळून वहावयाचा!

पण आजारीपणांत ज्यांच्या भेटीची अपरंपार भूक मला लागलेली असते ते माझे स्नेहाळ सोबती मात्र माझ्या फुरसतीच्या क्षणाची वाट पहात माझ्या उशालगत मुग्धपणानं तिष्ठत असतात! मीं त्यांना स्पर्श करायचा अवकाश कीं त्यांनीं आपलं अंतरंग खोलून आपल्या सर्वस्वाचा वर्षाव मजवर सुरू केलाच! या माझ्या जिव्हाळ्याच्या ग्रंथमंडळींना मी मुद्दामच माझ्या उशालगतच्या आलमारींत जागा दिली आहे; कारण असं पडल्या पडल्यादेखील त्यांच्या सान्निध्याचं सुख मला मिळावं. पण मला जरी त्यांच्या सान्निध्याचा लाभ सतत होत असला तरी ते मात्र बिचारे माझ्या स्वागताची अपेक्षा करीत कपाटांत तिष्ठत उभे असतात! कारण ग्रंथ खरेदी करण्याचा माझा हव्यास आणि मला मिळणारी फुरसत यांचा मेळ घालणं कठीण होतं. शिवाय हप्त्याहप्त्यानं वाचन करायला लागणारा धीर माझ्या स्वभावांत नाहीं. म्हणून त्यांच्या वाचनाचे माझे बेत सारखे लांबणीवर पडत असतात. पण जेव्हां शेल्फवर पांचसहा ताज्या पुस्तकांची रांग सांचलेली माझ्या नजरेस पडते, तेव्हां आतां आजारीपणाचीच फुरसत काढली पाहिजे, त्याशिवाय यांचं वाचन व्हायचं नाहीं असं मला वाटूं लागतं. आणि याच कारणास्तव माझे आजारीपणांतले दिवस इतके संस्मरणीय झाले आहेत. मागें एका तीन दिवसाच्या तापांत मी प्रसिद्ध रशियन लेखक शोलोकॉव्ह याची 'And Quiet Flows the Don' ही रम्योदात्त कादंबरी वाचली. अंथरुणावर पडून ती वाचतां वाचतां मी रशियन रणांगणावर कोसॅक लोकांच्या गर्दीत केव्हां घुसलों तें माझं मलाच कळलं नाहीं. तो सबंध दिवस स्त्रीपुरुषांच्या सुखदुःखांचे आणि रणांगणावरील अद्‌भुत पराक्रमांचे अनुभव मी घेत होतों. ज्या दिवशीं

मीं तें पुस्तक संपवून हातावेगळं केलं त्या वेळीं माझ्याच घरांत मला नवखं नवखं वाटूं लागलं आणि मी आजारी होतों ही गोष्ट मला सांगूनसुद्धां खरी वाटेना! आणि एका आजारांत मी नामवंत फ्रेंच लेखक रोमाँ रोलाँ याची 'जोन ख्रिस्तोफ' ही जगद्वंद्य कादंबरी वाचली. परवांच्या आजारांत शरद्बाबूंची 'पाथेर दाबी' उर्फ 'भारती' वाचून हातावेगळी केली. या ग्रंथांनीं माझा आजारीपणाचा काल किती उज्ज्वल केला आहे तें माझं मलाच ठाऊक! आणि आज त्या त्या आजारीपणाच्या स्मृती माझ्या मनांत रेंगाळत आहेत त्या तरी या ग्रंथांमुळेंच ना?

पण या आजारीपणांत तापाचं प्रमाण जर का चढतं असलं तर वाचनाचा ग्रंथ आटपलाच! कारण अशा वेळीं ग्रंथ वाचावयास लागणारा थंडपणा मजजवळ क्वचितच शिल्लक असतो. मेंदूची स्थिति तर या वेळीं इतकी तल्लख झालेली असते कीं, दुसऱ्याचे ग्रंथ वाचण्याऐवजीं स्वतःचेच निर्माण करण्याकडे प्रवृत्ति होते. हें जें मीं म्हटलं तें अक्षरशः खरं आहे. गवयाच्या आवाजाप्रमाणें मेंदु एकदां तापला कीं त्याची फिरत सुरू होते. मग त्यांतून कशाकशाचे धागे निघतील तें सांगतां येणार नाहीं. कल्पनाशक्तीदेखील इतकी तरल होते कीं नाहीं तीं कल्पनाचित्रं मनश्चक्षूंना दिसूं लागतात. एका आजारांत मी एका कादंबरीचं तपशीलवार कथानक तयार केलं होतं. शेवटल्या पूर्णविरामापर्यंत सर्व गोष्टी इतक्या बेमालूम जमल्या होत्या कीं, तापांत मला उठवत नव्हतं म्हणून, नाहींतर कादंबरीचं हस्तलिखित मी तेथल्या तेथें लिहून मोकळा झालों असतों. दुसऱ्या एका आजारांत मी वाङ्मयाच्या इतिहासाचा प्रकरणशः आराखडा तयार केल्याचं स्मरतं. लघुकथा आणि लघुनिबंध यांच्या कल्पना आणि घटना मला या ग्लानींत किती सुचल्या असतील त्याची मोजदादच नाहीं! पण इंद्रधनुष्याचं जीवित ज्याप्रमाणें सूर्योदयाबरोबर मावळावं त्याप्रमाणें या साऱ्यांचं झालं आहे. हें सारं जरी क्षणवत् ठरलं तरी त्या त्या वेळीं मला जें नवनिर्मितीचं सुख मिळालं तें कांहीं नाहींसं होऊं शकलं नाहीं. आणि ग्रंथकर्तृत्वाचं श्रेय एरवीं मला मिळो वा न मिळो, तें मला तापाच्या धुंदींत अनुभवावयाला मिळतं हें काय थोडं झालं?

अशा कितीतरी प्रकारांनीं मला सुख आणि समाधान हवंसं वाटलं कीं मला आजारी पडण्याची तीव्र इच्छा होते.

# का. वि. जोशी
(बडोदें)

## श्रेष्ठ पोरकटपणा

एका सतरा-अठरा वर्षांच्या तरुणीनें पाटमोऱ्या बसलेल्या एका चाळीस-बेचाळीस वर्षांच्या पोक्त वयाच्या पुरुषाचे डोळे हातानें घट्ट धरले. त्याबरोबर डब्यांतील सर्व मंडळी तिच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागली. पूना एक्सप्रेसमध्यें आणि ऐन प्रवासाच्या मोसमांत आगगाडीच्या डब्यांत किती चिकार गर्दी होती म्हणून काय निराळें वर्णन करावयाचें? मधल्या वाटेंतूनही मुसाफर लोक दाटीवाटीनें उभे राहिले होते. तशा गर्दीतून मराठा जातींतील आणि काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी वर्गांतील १७-१८ वयाच्या त्या उफाड्याच्या पोरीनें झपाट्यानें दोन्ही हातांनीं रस्ता करीत जात असतांनाच सर्वांचें लक्ष वेधून घेतलें होतें. तशांत तिनें त्या दुसऱ्या इसमाचे डोळे मागून झांकले तें पाहून तर सर्व डबा चकित झाला. ती आपल्या बेगुमान आनंदांतच हंसत होती, आणि आपणास सदर इसम ओळखतो कीं नाहीं या हर्षातिरेकांत मग्न होती. तिच्याकडे लागलेल्या असंख्य डोळ्यांची तिला कल्पना नव्हती आणि पर्वाही वाटली नाहीं. त्या गृहस्थानें 'कोण? सोड' असा तुटक जबाब दिला व तिचे हात झिडकारून बाजूला सारले, त्यासरशीं तिचा चेहरा एकदम वरमला. "जाने, तूं कव्हांशी आलीस?" असा त्या गृहस्थाचा प्रेमळ प्रश्न तिला पुन्हां उल्हसित करूं शकला नाहीं, आणि सर्वांचे डोळे त्या दोघांकडे लागले असतां लज्जा आणि संकोच यांनीं त्या दोघांचे चेहरे खरकन् उतरले. पुष्कळ वर्षांनीं आतेमामेभावंडांची घडलेली भेट! पण काय उपयोग? दोघेंही हिरमुसलीं झालीं. ती मुलगी परत आपल्या जागीं जाऊन बसली; तो गृहस्थ तोंड चुकविण्यासाठीं खिडकीबाहेर पाहात होता.

तिसऱ्या वर्गांतला प्रवास म्हणजे भरगच्च मांडलेल्या मनुष्यप्राण्यांच्या प्रदर्शनांतून काढलेली सहलच होय. त्या वर्गांतील प्रवाश्यांचे अनन्वित हाल होत असतात खरे; पण हीं मनुष्यस्वभावांचीं दरेक डब्यागणिक उघडून मांडलेलीं प्रदर्शनें ते सर्व हाल सह्य करून त्या हालअपेष्टांची

भरपाई भरपूर करमणुकीनें पुरेपुरी करून देतात. मात्र जिज्ञासु प्रवाशांनीं आपले कान, डोळे, विशेषतः मनं उघडीं ठेविलीं पाहिजेत. सहानुभूतीच्या आपलेपणानें सर्वांशीं सलोख्यानें वागून, सभोंवतालच्या सरमेसळ गिच समूहांतून, गलबल्यांतून, नात्यागोत्यांची, कार्यहेतूंची, भिन्न स्वभावांची गुंतागुंत बारकाईनें सोडवितां आली पाहिजे. माझा दरेक प्रवास मला आल्हाददायक होतो; इतकेंच नव्हे तर तो माझ्या अनुभवाच्या पोतडींत अनेक चमत्कृतिजनक मनुष्याकृतींची, स्वभावदर्शनांची संपत्ति आणून रिती करीत असतो. माझ्या ललितवाङ्मयांतील बऱ्याचशा व्यक्ती या ना त्या निमित्तानें माझ्याबरोबर प्रवास करणाऱ्या प्रवाशी होत्या. हें दृश्य मी बारकाईनें पाहात होतों; उभयतांच्या भावनांचीं आंदोलनें बारकाईनें तपाशीत होतों. फार काय, पण संकोचानें मध्येंच तोडलेल्या त्या कथानकाचे धागेदोरे मीं खास तपास करून शोधून काढलेही.

एवढ्या तुफान गर्दींतून बेधडक जाऊन आपल्या भावाचे डोळे सर्वांसमक्ष झांकणें हें त्या मुलीचें कृत्य अतिप्रसंग म्हणतां येईल का? पुष्कळ वर्षांनीं पुनर्भेट होण्याचा महोत्सव मनुष्यास बेफाम करणारच. अगदीं गेल्या वर्षींच माझ्या जुन्या समवयस्क स्नेह्याची पहिली भेट झाली. त्या वेळीं तो पाठमोरा उभा असतांना मी त्याच्या बरगडींत एक असा कांहीं ठोसा लगावला होता कीं तो जागच्या जागीं कळवळलाही. मी थोडासा वरमणार इतक्यांत त्यानेंच मागें वळून पाहिलें आणि 'अरे लेका' असें म्हणून सवाई ठोश्यानें माझी सव्याज फेड केली. ही माझ्यासारख्या पोक्त आणि विचारी गृहस्थाची गोष्ट. माझ्या मानानें आगगाडींतील ती मुलगी कितीतरी लहान, अशिक्षित आणि असंस्कृत! तेव्हां तिनें केलेल्या अतिप्रसंगास दोष तो काय देणार? फार काय, पण तो अतिप्रसंगही म्हणतां येणार नाहीं. सळसळणाऱ्या भावना संकोचाचें झांकण तेव्हांच फेकून देतात, आणि कोणताही प्रसंग त्या वेळीं अतिप्रसंग नसतोच. बरं, अनपेक्षित रीतीनें कोणी अंगलट केली तर त्यास झिडकारून टाकणें हेंही तितकेंच स्वाभाविक, तेव्हां तिच्या भावाचें करणें सदोष कसें म्हणावें? मात्र एवढें खरें कीं, ओळख पटल्यावर त्यानें तितक्याच पोरकटपणें जानीला ओढून घेऊन आपल्याजवळ बसवून घ्यावयास पाहिजे होतें, आणि तिच्या उद्धटपणाबद्दल त्यानें तिचा —कानगुचा नव्हे — गालगुच्चा

ध्यावयास पाहिजे होता. आनंदी माणसाच्या भावनाशीं दुसऱ्या इसमास समरस होतां आलें तरच त्याचा आणि पर्यायानें दोघांचा आनंद वृद्धिंगत होत असतो.

पण ही समरस होण्याची कला पुष्कळांना साधत नाहीं. आगंतुक संकोचाच्या कल्पनांनीं पुष्कळ वेळीं मनांत फुटणाऱ्या आनंदाच्या उकळ्या आपण ओंठाबाहेर पडूं देत नाहीं. फुकाचा उत्तेजनपर गोड शब्दही आपण उच्चारीत नाहीं. एकादी कांहीं गम्मत सांपडावी आणि ती दाखविण्यासाठीं लहान मुलांनीं वडील माणसाकडे यावें; अशा वेळीं वडिलांनीं शिष्टाचार सांभाळणें म्हणजे अशिष्ट बनणें होय. मुलांच्या खेळण्यांत तन्मय होऊन जाणें, समरसता दाखवणें हाच त्या प्रसंगीं खरा शिष्टाचार होय. मुर्कुंडी वळेतोंवर हांसविणारी कोटी करणाऱ्याच्या हातांवर टाळी न देणें, अगर गायकाच्या तंद्रींत 'वाहवा'च्या सहानुभूतीनें समरस न होणें हा मोठा गुन्हा होय! अनाठायीं गंभीरपणा हा अशिष्टच समजला पाहिजे. कित्येकांना दुसऱ्याच्या आनंदांत सामील होणें हें कमीपणाचें वाटतें. असे लोक मुलामाणसांना, नातेवाईकांना, मित्रस्नेह्यांना आपल्या तटस्थवृत्तीनें, तिरस्काराच्या वागणुकीनें हिरमुसले करतात आणि स्वतः अप्रिय होतात. आपण हिंदू लोक पाळण्यांतच जगन्मिथ्याचीं गाणीं ऐकतों, पुनर्जन्माचाच पहिला बोबडा शब्द उच्चारतों आणि दैवाच्या पांगुळगाड्याला धरूनच पहिलें पाऊल टाकतों. सर्व प्रकारच्या भावनांना (राजस, तामसच काय, पण सात्त्विकसुद्धां) सदाचाराच्या, शिष्टाचाराच्या खोट्या कल्पनेचे कोयते चालवून अगदीं अयोग्य प्रकारें खच्ची करीत असतों. आणि सात्त्विक आनंदाच्या प्रत्यहीं हाताशीं येणाऱ्या प्रसंगांचा विरस करून शुद्ध आनंदालाही आपण पारखे होतों. आनंदाची वृद्धि होण्यास समरसता असावी लागते, ती प्रकट करावी लागते; आणि समरसता प्रकट करतांना संकोचाच्या कल्पना अगदीं बाजूस ठेवल्या पाहिजेत. नाहींतर वरील दृश्यांत ज्याप्रमाणें दोघेंही भावंडें हिरमुसलीं झालीं, तशीच इतरांचीही नेहमीं गत होते. 'तुसड्या स्वभावाचा' असें संबोधून आपण ज्याचा तिरस्कार करतों तो दुसरातिसरा कोणी नसून, संकोचामुळें, शिष्टाचाराच्या खोट्या कल्पनेमुळें, तटस्थवृत्ति दाखविणारा तिरस्करणीय असा इसम होय कीं जो दुसऱ्याच्या आनंदावर विरजण घालतो.

दुसऱ्याचें मन न दुखविणें हा सर्व शिष्टाचाराचा पाया होय. तसें पाहिलें तर आनंदांत असलेल्या व्यक्तीची अपेक्षा आपल्या आनंदाला दुसऱ्यांनीं झेलून घ्यावें, आपली पाट थोपटावी अशीच असते. ती अपेक्षा अतृप्त ठेवतां त्याच्या मनास दुःख होतें, आणि शिष्टाचार म्हणूनसुद्धां 'दुसऱ्याच्या सुखें सुखावें' हा श्रेष्ठधर्म मानला पाहिजे. हा समरस होण्याचा पोरकटपणा पर्यायानें श्रेष्ठ आचारधर्मच मानला पाहिजे.

# प. मा. टोके

## लॉरेटा यंग आणि विवेकानंद

लॉरेटा यंगचं रंगित छायाचित्र त्या दिवशीं माझ्या हातीं आलं तेव्हां मला किती आनंद झाला! कुणाचंही मन प्रसन्न होईल इतकं सुंदर चित्र होतं तें. माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला त्या दिवशीं मी विचारीत होतों, "आज काय नवीन दिसतंय् तुम्हांला?" प्रत्येकजण एकच उत्तर द्यायचा: "लॉरेटा यंग." मला आश्चर्य वाटायचं कीं सर्वजण कसं पटकन् ओळखतात? मग वाटलं, आहेच लॉरेटा तेवढी डोळ्यांत भरण्यासारखी. संध्याकाळीं एक मित्र आला माझ्याकडे. त्याला मी तोच प्रश्न टाकला,—उत्तर तेंच. मग मात्र मला राहवेना. मी त्याला विचारलें, "कसं रे ओळखलंस तूं एवढ्यांत?" "अरे, 'तुम्हांला नवीन काय दिसतंय?' म्हणून विचारतोस खरा, परंतु तुझे डोळे कुठें असतात प्रश्न विचारतांना ठाऊक आहे का? त्या गोल टेबलावरील लॉरेटा यंगच्या छायाचित्राकडे. तुझ्या डोळ्यांच्या दिशेनें प्रवासाला निघालं कीं नेमकं सांपडतं हवं तें गांव..."

त्यानंतर थोड्याच दिवसांनीं माझ्या एका मित्रानें विवेकानंदांचा एक पांढरा शुभ्र, छोटासा पुतळा मला भेट म्हणून दिला. त्या दिवशीं मी घाईत होतों म्हणून तो टेबलावर ठेवला आणि कामाला निघून गेलों. पुढें तीन दिवसपर्यंत परीक्षा, प्रश्नपत्रिका....अनेक व्यवसायांत स्वस्थतेनें खोलीकडे नजर टाकायला जमलेंच नाहीं. पण आज परीक्षा संपली अन् उद्यां शिपाई पेपरांचा गठ्ठा आणून टाकणारच, तेव्हां उद्यांची चिंता आज हवी कशाला म्हणून जरा हातपाय लांब करून स्वस्थ पडण्याच्या हेतूनें खिडकीजवळील आरामखुर्चीवर मीं अंग टाकलें. मागें रेलून पडलों अन् पाहूं लागलों तर समोर गोलमेजावर दिसली लॉरेटा यंग! मनाचा शीण थोडासा शमल्यासारखा झाला. दुसऱ्या क्षणाला दिसले विवेकानंद. कांहींतरी नवीन दृश्य पहावें तसें झालें मला. परंतु लगेच तीन दिवसां-पूर्वींचा इतिहास स्मरला. गडबडींत पुतळा मेजावर ठेऊन दिल्याची

आठवण झाली. मध्यंतरींचा काळ युगासारखा वाटला. सत्य आणि स्वप्न यांच्यामध्यें हेलकावे घेणाऱ्या मनाला वस्तुस्थितीची जाणीव झाल्यावर मी जरा निरखून पाहूं लागलों मेजावरील त्या दोन चित्रांकडे. माझ्या त्या मित्रानें माझा मूर्खपणा पटवून दिल्यापासून हा वेळपर्यंत खिडकी-जवळ बसून हंसल्याचें मला आठवत नाहीं. काय योगायोग पहा—त्या दोन चित्रांकडे पाहतां पाहतां जें हंसूं कोसळलं मला. खोलींत कुणी नव्हतं म्हणून बरं. माझ्या हंसण्यावर एक अप्रत्यक्ष बंधनच पडलं. नाहींतर, "काय ? काय झालं ?" म्हणून विचारायला असतं कुणी तर माझं कांहीं हंसूं तेव्हां आवरलं नसतं मला. या वेळींही माझ्या मूर्खपणाचंच हसूं आलं मला. घाईत मीं विवेकानंदांचा पुतळा लॉरेटा यंगच्या छायाचित्राजवळच ठेवला होता. सिनेमानटी लॉरेटा अन् स्वामी विवेकानंद ! अर्धनग्नवेषांत महात्मा गांधी पांचव्या जॉर्जना भेटले तेव्हांचें दृश्य डोळ्यांपुढें आलें. लॉरेटा आणि विवेकानंद ह्यांची ती भेट अपूर्व वाटली. विवेकानंद अमेरिकेंत हिंदु स्त्रीचें ध्येय, तिच्या आकांक्षा, तिचा त्याग—तेथील स्त्रीपुरुषांना समजावून सांगत होते तेव्हां लॉरेटा छोटीशी मुलगी असेल. त्यांच्या पाणीदार डोळ्यांकडे पाहतांना आणि अस्खलित भाषणाचें श्रवण करतांना—तिचेही पाणीदार डोळे लुकलुकले असतील, कान टंवकारले असतील. त्या थोर हिंदु पुरुषाशीं आपला परिचय व्हावा अशी इच्छाही कदाचित् तिच्या चिमुकल्या मनांत आली असेल. आज तिची ती इच्छा त्या थोर पुरुषाच्या देशांतच किती वेगळ्या तऱ्हेनें पुरी झाली होती !

पण ह्या साऱ्या विचारांपेक्षां त्या दोघांतील अंतरच मला अधिक जाणवलें. त्यामुळेंच नकळत माझ्या हातून घडलेल्या विचित्रपणाचें हंसूं आलें मला. तासातासाला लग्न, घटस्फोट अन् पुनर्विवाह ज्या "न-मानवी, न-यक्ष" नगरींत घडत आहेत तेथें जीवन कंठणारी लॉरेटा कुठें अन् हिंदु स्त्रीच्या चूल-मूल ध्येयांतील थोरपणा पटविण्यासाठीं जीवाचं रान करणारे विवेकानंद कुठें ! एक सिनेमानटी तर एक स्वामी ! परस्परविरोधी गोष्टी एकत्र आल्याचा भास झाला. उत्तर ध्रुव कधींतरी दक्षिण ध्रुवाजवळ येईल का ? पण तसंच कांहींतरी दिसूं लागलं. लहानपणीं हस्तलिखित मासिकें काढण्याचा नाद होता.

एका अंकांतील चित्र अजून आठवतें मला. नांव होतं त्या माणसाचं दयाराम पण धंद्यानें खाटीक. तेव्हां हातांत सुरा घेऊन मुक्या बिचाऱ्या शेळ्यांची मान धरण्यासाठीं तो जात आहे असं त्या चित्रांत दाखविलं होतं. सडपातळ नवरा अन् लठ्ठ बायको अशीं जोडपीं कितीतरी दिसतात आपणाला ! शारीरिक भेद सोडून दिला तरी मानसिक विषमतेचीं उदाहरणं कांहीं कमी नाहींत. हुशार कारकून आणि मठ्ठ अंमलदार यांची जंत्री कागदावर होत नसली तरी प्रत्यक्षांत छपून थोडीच रहाते ? मला तर पुष्कळदां असंच वाटतं कीं, आकाशांत बसल्या बसल्या ईश्वर एक शहाणा अन् एक वेडा ह्यांची जोड शोधून काढीत असावा. त्यामुळें मी देवाला दररोज हेंच बजावीत असतों, " हे देवा, मी वेड्यांतला वेडा आहे. माझ्यासारखा वेडा कुणी झाला नाहीं–होणार नाहीं." हेतु असा कीं आपला जोडीदार शहाणा मिळावा. ज्या दिवशीं ही जगांतील विषमता मला अधिक स्पष्ट झाली त्या दिवशीं मला मनुष्याच्या आवडीनावडी-मागील कारणमीमांसा कळली. मनुष्य आपल्याभोंवतीं सारखेपणा अधिकाधिक निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. घराला दिलेला रंग अन् त्यांतील वस्तूंचा रंग एकमेकांना खुलवील असाच ठेवण्याकडे मनुष्याच्या मनाचा कल दिसतो. साडीला शोभेल असंच ब्लाउजचं कापड सुंदर स्त्री पसंत करते. अनुरूपता निर्माण करण्याकडे मनुष्याचें मन धांवत असतें याचें कारण त्याच्याभोंवतीं दिसणारी विषमताच नाहीं का ? वाङ्मय आयुष्याच्या रुक्षपणापासून पळून जाण्याचं एक ठिकाण आहे म्हणतात. मनुष्याची अननुरूपतेची आवड प्रत्यक्षांत अनुभवावयास लागणाऱ्या अननुरूपतेपासून पळून जाण्याचाच एक प्रयोग नाहीं का ? जीवन हें परस्परविरोधी गोष्टींनींच भरलें आहे. आयुष्यांतील विरोध प्रतीक म्हणून लॅरेटा आणि विवेकानंद यांच्या रूपानें माझ्या खोलींत सामावला होता.

परंतु माझ्या दृष्टीला त्या दोन चित्रांची भेट आणखी निराळ्या दृष्टीनें मनोरंजक वाटली. आयुष्यांत विरोध असला तरी विरोधांत विविधताही असलेच कीं. तुम्ही कधीं जिप्सी लोकांना पाहिलं आहे का ? त्यांचा पोषाख आवडला नाहीं तुम्हांला ? त्यांच्या बायका उंच, सशक्त अन् उत्साही दिसतात. डोक्याला गर्द निळ्या रंगाचा रुमाल बांधतील

त्या कधीं, अन् अंगांतील कपडे केशरी–अगर लाल आणि पांढऱ्या–आडव्यातिडव्या पट्टयाच्या कापडाचे असतील. हा पोषाख तुम्ही स्वतः करणार नाहीं, परंतु त्या गायकांच्या शरीरांवर, त्यांच्या चेहऱ्यांवरील बेदरकारवृत्तीला पार्श्वभूमी म्हणून, तेच कपडे योग्य वाटत नाहींत का तुम्हाला ? त्या स्त्रीपुरुषांना पांढरेशुभ्र कपडे दिले आहेत असं दृश्य डोळ्यापुढं आणलं कीं कांहींतरीच वाटतं. पृथ्वीच्या पाठीवर जगणारे मनुष्यप्राणी येथून तेथून सगळे एकच. परंतु पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास करूं लागलों तर त्यांच्या वेषभूषेंत, राहण्याच्या पद्धतींत, त्यांच्या सुखाच्या कल्पनांमध्यें जमीन-अस्मानाएवढं अंतर दिसून येतं. सर्व जग एकसारखंच केलं, सर्व लोकांच्या सुखाच्या कल्पना एकच झाल्या, सर्व माणसांचा पोषाख सारखाच व्हायला लागला तर पृथ्वीवरील आनंद, सौंदर्य आणि जीवन धुक्याप्रमाणें अदृश्य होतील. अपवादाला जागा न ठेवतां केलेलीं विधानं अर्धसत्य असतात; तरीही असंच म्हणावंसं वाटतं, "विविधता हेंच जीवन आहे." सूर्यप्रकाशाची सोनेरी किरणंच अधिक आल्हाददायक वाटतात. प्रकाशाचीं श्वेतकिरणं जेव्हां इंद्रधनुष्याच्या रूपांत दिसतात तेव्हांच त्यांत जिवंतपणा अधिक दिसतो. इंद्रधनुष्याचे विविध रंग किती मनोहर वाटतात ! तसंच जीवनाचं आहे. हिंदु स्त्रीची वेषभूषा, केशरचना; जपानी स्त्रीची वेषभूषा, केशरचना; आंग्ल युवतीची वेषभूषा, केशरचना; – प्रत्येकांत किती विविधता आहे ! तरीही ज्याला सौंदर्यदृष्टी आहे तो ह्या तीनही स्त्रियांच्या वेषभूषेंत, केशरचनापद्धतींत एक श्रेष्ठ अन् एक निकृष्ट असं म्हणणार नाहीं. प्रत्येक पद्धतींत सौंदर्य आहे, आणि तें सौंदर्य ओळखण्यास त्या तीनही राष्ट्रांची जीवनाकडे पाहण्याची जी दृष्टी आहे तीच आपण धारण करावयास हवी. त्या दृष्टीनें आपण पाहूं लागलों म्हणजे जीवन एका प्रकारच्या नवचैतन्यानें फुलून गेल्यासारखं वाटूं लागतं. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत बोलली जाणारी मराठी भाषा, महाराष्ट्रांतील मोठ्या नगरांत बोलली जाणारी मराठी भाषा, महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या तोंडीं बसलेली मराठी भाषा एकच वाटते का ? शब्दांचे उच्चार, प्रयोग, रचना पुष्कळच भिन्न वाटतात नाहीं ? या विविधतेमध्येंच त्या निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या लोकांचं जीवन प्रतीत झालेलं असतं. बडोद्याहून पुण्यास गेलेला मनुष्य

सुरुवातीस "खिडकी"ऐवजीं "बारी", "अंथरुणा"ऐवजीं "पथारी" वगैरे शब्दप्रयोग करतो तेव्हां पुण्यांतील महाराष्ट्रीयांना मोठी गंमत वाटते. ह्यांतच जीवनाचा आनंद आहे. ह्या विविधतेंतच रमणीयता आहे. तुमच्या मित्रवर्गांत आयुष्याच्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत राबणाऱ्या विविध लोकांचा समावेश तुम्ही करून पहा. तुमचें जीवन अधिक आनंददायक वाटूं लागेल तुम्हांला. तुम्हांला वाङ्मयाची आवड असेल तर एखादा व्यापारांत पडलेला मनुष्य मित्र करा, एखादा पोलीस-खात्यांतील इसम तुमच्या मंडळांत असूं द्या, एखादा सिनेमानटसुद्धां बसूं द्या कीं तुमच्या समोरच्या खुर्चीवर! मात्र एक गोष्ट करावयास हवी. तुम्ही स्वतः वाङ्मयभक्त म्हणून या सर्व लोकांनींही फडके-खांडेकरांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला असला पाहिजे अशी समजूत सोडून देऊन त्यांच्याशीं संभाषण करावयास पाहिजे. पोलीसखात्यांतील इसमाशीं बोलतांना दोन-चार "लई वंगाळ" शब्दप्रयोग ऐकावे लागतील तुम्हांला. पण दचकूं नका; हे शब्द त्याच्या तोंडीं "आणि, वर, जर, तर, परंतु" सारखे बसलेले आहेत. गुन्हेगारांशीं, हलक्या प्रतीच्या गुंडखोरांशीं त्यांचा संबंध जास्त येत नाहीं का? त्यांच्या सहवासांत काल घालवावा लागल्यामुळें बडोदेंकरांच्या "पथारी, बारी" शब्दप्रयोगा-सारखेच त्याचे ते शब्दप्रयोग आहेत. त्यांच्या मनाच्या पातळीपेक्षां अधिक उंच न जातां त्यांच्याशीं गप्पागोष्टी करा. खूप गंमत वाटेल तुम्हांला. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण तुमच्याहून अति-निराळा दिसेल. तुमचा व्यापारी मित्र तुमच्याशीं बोलूं लागला म्हणजे त्याच्या व्यापारांतील दुःखांची कहाणी तो तुम्हांस सांगेल. कंटाळल्याचा चेहरा करूं नका. त्याच्याच जागीं स्वतःला कल्पून त्याच्याशीं समभागी व्हा. जीवनाचें एक निराळंच दालन उघडलेलें तुम्हांला दिसेल. त्या सर्व लोकांची सुखाची, दुःखाची कल्पना परस्परांच्यापासून किती वेगळी! ह्या विविधते-मध्येंच पृथ्वीवरील जीवनाचा आत्मा आहे. लॉरेटा यंग आणि विवेकानंद ह्यांची भेट जगांतील विरोध दर्शवीत नाहीं, मी मनांत म्हणालों, साऱ्या जगांतील जीवनाची समालोचना तेथें झाली आहे. जगाचें सौंदर्य वाढविण्याच्या कामीं विवेकानंदांनीं जेवढे कष्ट घेतले असें आपण हिंदु-पद्धतींनें जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीनें म्हणूं—तेवढेंच यंगच्या मानानें

तिनेंही जग सुंदर केलं आहे असं पाश्चात्य दृष्टीनें जीवनाकडे पाहणारे म्हणतील. त्यांच्या त्या विविधतेनें जगण्याच्या पद्धतींतच जगाचं सौंदर्य सांठविलेलें आहे. चर्चिल, सिनेमानटी, जवाहरलाल, देहविक्रयानें पोट भरणारी वेश्या, चार्ली चॅप्लिन्, गोराकुंभारः हेच जगाचे घटक. त्यांच्या एकमेकांहून अगदीं विचित्र असणाऱ्या कल्पनांमुळेंच निरनिराळ्या रंगांच्या फुलांनीं शोभणाऱ्या बागेप्रमाणें जगही मनोहर झालें आहे. लॅरेटा आणि विवेकानंद यांच्यांतील विरोध समजत असूनही त्यांच्या जीवनक्रमाबद्दल विचार माझ्या मनांत येऊन मी म्हणालों, "स्वामी आणि सिनेमानटी एकत्र आले यांत विसंगत कांहींच नाहीं. जगरहाटीशीं सुसंगतच आहे ही भेट. या भेटींतच जगाचं सार सामावलेलं आहे." माझे डोळे आपोआपच त्या दोन प्रतिमांकडे वळले. मला भास झाला विवेकानंद मला म्हणत आहेत, "किती खुळा तूं आमच्याकडे पाहून हंसलास तो!" लॅरेटाही मोठ्यांदां हंसली. तिला म्हणायचं होतं, "अगदीं बरोबर आहे तुमचं म्हणणं, विवेकानंद!"

# स. वि. देशपांडे

## उद्यां

"दादा, दादा, मला खाऊ केव्हां आणणार? आणि मला नवा बूटसुद्धां आणायचा आहे. आणणार ना?"

"हो बाळ, आणूं बरं उद्यां!"

मूर्तिमंत वत्सलता नि निष्पापता! मोकळ्या मनानें तिनें आपल्या वडिलांना हव्या त्या वस्तू सांगितल्या आणि वडिलांच्या उद्यांच्या आश्वासनावर भोळ्या भावानें विश्वास ठेवून ती दुडुदुडु धांवतही गेली. "दादा उद्यां मला खाऊ आणणार आहेत! आणि उद्यां मला बूट आणायचे आहेत!" आपल्या मैत्रिणीजवळ उद्यांच्या आपल्या प्राप्तीबद्दल बोलतांना तिला कोण खात्री वाटत होती! तिनें गाल कसे फुगीर केले!! बोलण्यांत डौल किती आणला!!! सारें, सारें कांहीं प्रेक्षणीय होतें. तिचा हा विश्वास चुकीचा होता काय? छे, मुळींच नाहीं!

तिच्या वडिलांनीं तरी तिची काय फसवणूक केली? छट्, आपल्या रोजच्या व्यवहारांत आज न होण्याजोग्या गोष्टी आपण 'उद्यां'वर ढकलतों, त्याप्रमाणें त्यांनींही तिला 'उद्यां'चें आश्वासन दिलें. त्या प्रेमळ पित्याला मुलीच्या समाधानाचा लाभ झाला तो वेगळाच.

खरंच, ही 'उद्यां' आशाजनक आहे. एका संपादकाकडे पाठविलेल्या माझ्या लेखाबद्दल स्वीकाराचें त्यांचें पत्र मी अपेक्षित होतों. टपालवाला दिसला कीं माझी उत्कंठा क्षणाक्षणाला वाढे. वाटे कीं त्याच्या हातांतील एवढ्या ढिगांत आपल्या नांवांची ती बोटभर चिठ्ठी खात्रीनें असणारच. मोठ्या आशेनें मी प्रश्न विचारी व तो म्हणे, "नाहीं साहेब, आज कांहीं नाहीं!" अरेरे, कोण निराशा! पण लगेच माझें विचारी, समाधानी मन मला सांगे, "कांहीं हरकत नाहीं, आज पत्र आलें नाहीं तरी उद्यां तरी खास येईल." आणि हा विचार मनांत आला कीं कितीतरी हलकें वाटे, एकदम सारी जडता नाहींशी होई, व पुनः नवा उत्साह जागा होई. ही 'उद्यां'च तेव्हां धीर देई.

अशी ही 'उद्यां'च माणसाला अनेक संकटांत सहाय्य करते. कंटाळून, दमूनभागून एकाद्या अपूर्ण गोष्टीमुळें आपण त्रासलों, गोष्ट तर पूर्ण करणें आहे परंतु हातून क्रिया मात्र होत नाहीं, अशा वेळीं "करूं आतां उद्यां" म्हणून आपण ती बाजूला सारतो व हुश्श म्हणून सुटकेचा श्वास टाकतो. कागदाच्या ढिगांत एकादा कचेरींतला कारकून डोकें खुपसून बसला तर त्याचे चहाबाज स्नेही म्हणतात, "राहूं द्या हो, होईल काम उद्यां, चला चहाला." अभ्यासाची अळंटळं करणारा विद्यार्थी अगदीं निश्चयानें प्रतिज्ञा करतो कीं, "आतां उद्यांपासून नियमित अभ्यास करावयाचा." ऋणानें बुजबुजलेला परंतु नित्य नवें ऋण काढणारा एकादा निर्लज्ज ऋणको असाच लगबगीनें येऊन एकाद्या नव्या धनकोला गांठतो व म्हणतो कीं, "अहो, कसेंही करून एवढी वेळ भागवाच. उद्यां तुमची रक्कम तुमची तुम्हांला परत करतों." सारांश, व्यवहारांत असे हे 'उद्यां'चे वायदे अखंड चालू आहेत.

पण तसे ते चालू आहेत म्हणून तर आयुष्यांत आशा आहे, माणसाला धीर आहे व संसाराला गति आहे. नाहींतर साराच कारभार जागच्या जागीं थंड झाला असता. ही 'उद्यां' म्हणजेच कालाचें अनन्तत्व व हेंच तिचें थोरपण. ह्या थोरपणाच्या विश्वासावर तर माणसाचा सारा भविष्यकाल अवलंबून आहे !

# दीनानाथ तक्कर

## उपयुक्ततेचे अभिमानी

—आणि खरोखरच मला प्रत्येक गोष्ट उपयुक्त असावी असा अट्टाहास धरणें मुळींच आवडत नाहीं. पण मनुष्याच्या साऱ्या कृती सहेतुक असल्या पाहिजेत असा कंठरव करणारे लोक कांहीं कमी नसतात. जगांतल्या साऱ्या वस्तुजातांतून कांहींतरी उपयोग धुंडाळण्याची यांना खोड लागलेली असते. कित्येकदां तर हे लोक इतक्या एकान्तिक वृत्तीचे होतात कीं, सौंदर्याचा आनंद हीसुद्धां मानवी जीवनांतली एक उपयुक्त चीज आहे याची जाणीवही त्यांना रहात नाहीं. यांना एखादी सुंदर कविता किंवा कादंबरी वाचायला दिली तर ते म्हणतील, "तसंच पाहिलं तर ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं, भाषाही सुंदर आहे, आणि वाचतांना मनाला आनंदही होतो; पण पुस्तकांत कांहीं बोध घेण्यासारखं नाहीं बुवा! कांहीं उपयोग नाहीं अशा पुस्तकांचा!" सीतेनें दिलेल्या मोत्यांच्या माळेंत राम नाहीं असें पाहून मारुतीनें ती फेंकून दिली होती म्हणतात. मला वाटतें हा मारुतीच या उपयुक्ततावाद्यांचा गुरू असावा! कारण एखादी वस्तू पिळून तींतून उपयुक्ततेचा अर्क निघाला नाहीं कीं हे लोकही असंच म्हणतात, "छे! यांत कांहीं राम नाहीं!" हे उपयुक्ततावादी कधीं रपेट करायला गेले—('मौजेनें सहल करायला जाणें' हे शब्द त्यांच्या कोशांत नसतातच)—कीं त्यांचें लक्ष्य भोंवतालच्या सृष्टिसौंदर्याकडे कधींच जाणार नाहीं. हिरव्यागार शेतांभोंवतीं अस्पष्ट दिसणाऱ्या झोंपड्या आणि त्या इवल्याशा तळ्यांत सांचलेलें चमचमणारें पाणी त्यांना पहावेसें वाटणार नाहीं. कोंवळ्या सूर्यकिरणांनीं न्हाऊन निघालेले मंदिरांचे घुमट त्यांचें मन आकर्षिणार नाहींत. गुरांच्या गळ्यांतील घंटांचा खिण्‌खिण् नाद, पक्ष्यांची किलबिल किंवा मधूनच वाहणाऱ्या वाऱ्याची शीळ यांतही कांहीं स्वर्गीय संगीत आहे याची जाणीव त्यांना राहणार नाहीं. ते म्हणतील, "छे! छे! असल्या दृश्यांकडे पहात बसून आपल्या शक्तीचा अन् वेळेचा अपव्यय करण्यांत काय अर्थ?"

माझा एक मित्र असाच कट्टर उपयुक्ततावादी आहे. त्याच्याबरोबर आम्ही येथील राजवाड्यावरून जाणाऱ्या रस्त्यांकडे नेहमीं फिरायला जातों. तेव्हां राजवाड्याच्या घुमटाप्रमाणें पसरलेले लालनिळे ढग पाहात, रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांच्या पानांशीं चाळे करीत, महालाच्या प्रवेशद्वारांत चालू असलेलें सनईवादन ऐकत किंवा वायुलहरींशीं गुजगोष्टी करीत आम्ही 'रेंगाळूं' लागलों कीं या आमच्या मित्राचा अगदीं संताप होतो आणि तो लगेच डावा-उंजवा करीत लष्करी पद्धतीनें पावलें टाकीत निघून जातो. तो असा रागावला कीं मला तांब्यांच्या "किति महामूर्ख तूं शहाजहां!" या कवितेंतील

"किति महामूर्ख तूं शहाजहां!

गुपित पळपुटें पञ्जरिं धरण्या व्यूह काय रचिलास अहा!"

असें म्हणणाऱ्या उपयुक्ततावाद्याची नेहमीं आठवण होते.

आपल्या प्रेयसीचं एक मनोरम स्मारक करून आपल्या असीम प्रेमभावनेला अजरामर करणाऱ्या शहाजहांला या गृहस्थानें मूर्ख ठरविलें होतें! असल्या एकान्तिक उपयुक्ततावाद्यांच्या सौंदर्यशून्य दृष्टीची मला कींव येते. मला वाटतें चुंबनांत जीवनसत्त्वें नसतात म्हणून तीं घेऊं नयेत असा उपदेश यांनीं केला तरी आश्चर्य वाटायला नको! पण सकाळच्या कोंवळ्या सूर्यप्रकाशांत हिंडतांना सूर्यकिरणांच्या औषधी उपयोगांचा विचार करायचा असतो का? हरिश्चंद्रानें स्वप्नांत केलेलें राज्यदान विश्वामित्राला कितपत उपयोगी पडलें याचा उल्लेख माझ्या वाचनांत नाहीं. पण आपला अनुभव तर असा आहे कीं, स्वप्नांत मिळालेली पैसुद्धां व्यवहारांत कामास येत नाहीं. पण म्हणून का आपण सुंदर स्वप्नें पडूं नयेत अशी इच्छा करतों कधीं? हवेंत बांधलेल्या मनोऱ्यांत कुणी राहूं शकत नाहीं हें मला कळतें. पण मनोराज्यें करण्याचा नाद मी या जन्मीं तरी सोडणें शक्य नाहीं. मला वाटतें, ही उपयुक्ततेची भानगड निसर्गालासुद्धां फारशी पसंत नसावी. नाहींतर त्यानें पृथ्वीवर प्रकाश पाडण्याचं काम सूर्याकडे सोंपविलं असतांही, उषेला अन् संध्येला रंगी-बेरंगी वस्त्रें पुरविण्याचा आडधंदा त्याला कां करायला लावला असता? किंवा त्यानें सूर्यकिरण आणि जलबिंदू यांना सुंदर पण निरूपयोगी इंद्रधनुष्य घडविण्याची यातायात कां करायला लावली असती? जगांतल्या

साऱ्या वस्तुजातामागें उपयुक्ततेचा ससेमिरा लावून दिला तर बिचाऱ्या सौंदर्यदेवतेला पळतां भुई थोडी होईल !

पण याचा अर्थ असा नव्हे कीं, मी आपल्या आयुष्यांतील उपयुक्ततेची महती सर्वस्वीं अमान्य करतों. उपयुक्ततेच्या हव्यासामुळें सौंदर्यदृष्टीचें उच्चाटन होऊं नये एवढेंच माझें म्हणणें. उपयुक्तता व सौंदर्य यांचा सुंदरसा समन्वय साधतां आला तर तो मलाही हवाच आहे. पण उपयुक्तता हें सौंदर्याचें एक अंग असावें असा हट्ट मी कधींच धरणार नाहीं.

उपयुक्ततावाद्यांच्या सौंदर्यशून्य दृष्टीचें एका विनोदी लेखकानें केलेलें विडम्बन मला आठवतें. एक चिनी राजा होता. प्रत्येक गोष्टींतून कांहींतरी बोध घेतां आला पाहिजे असा त्याचा अट्टाहास असे. गाणें ऐकण्याचे उपयोग न सांगतां आल्यामुळें त्यानें गवयांच्या घशांत शेन्दूर कोंबायचा हुकूम सोडला होता. नृत्यांतील मोहक अंगविक्षेपांपासून काय बोध घ्यावयाचा हें न सांगतां आल्यामुळें त्यानें नर्तकींच्या पायाच्या शिरा तोडून टाकण्याची आज्ञा केली होती. इतका निष्ठावंत उपयुक्ततावादी क्वचित्‌च आढळेल ! त्याच्या या बोधामृताच्या वेडाला कंटाळून शेवटीं कवीनें त्याला विचारलें, "पण सरकार, आपल्या या लांब वेणीपासून काय बोध घ्यावयाचा ?"

मी त्या कवीच्या जागीं असतों तर मी त्या अरसिक राजाला विचारलें असतें, "राजेसाहेब, आपल्या या आयुष्यापासून तरी काय बोध घ्यावयाचा ?"

आणि खरोखरच, मी कधीं या विषयाचा विचार करूं लागलों कीं माझ्या डोळ्यांपुढें असा प्रश्न उभा राहिल्यावांचून रहात नाहीं. प्रत्येक गोष्टींतून उपयुक्ततेचें सार काढण्याच्या या वृत्तीनेंच मानवी जीवनाचें गूढ उलगडण्याच्या धडपडीला जन्म दिला असेल का ? प्रत्येक वस्तूंतून उपयोग शोधण्याच्या वृत्तीचीच परिणति जीवनाचें सार आणि अर्थ शोधण्याच्या तत्त्वज्ञानांत झाली असेल का ? तें कांहींही असो; पण सुंदर वस्तूंचे उपयोग शोधण्याच्या धडपडीमुळेंच आपण कसलेंतरी भयंकर तत्त्वज्ञान निर्माण करीत असतों असें मला वाटतें. जीवनाचा अंतिम अर्थ शोधण्याचा प्रयत्न मीं तरी निदान अजून केला नाहीं. मी असा कांहीं

विचार करूं लागलों कीं माझ्यापुढें एक प्रश्न उभा राहातो — जीवनाचा अर्थ कांहींही असला तरी तें क्षणभंगुर आहे, नाशिवंत आहे — मग त्या अर्थांत काय अर्थ आहे? अन् मग मी उदास होतों. मानवतेचा मार्ग सुखकर करणें हेंच मनुष्याचं कार्य, मानव्याची सेवा हेंच मनुष्याचं ध्येय, आणि मानवी संस्कृतीचा विकास हेंच मनुष्याचं उद्दिष्ट— बस्स! इथेंच येऊन मी थांबतों आणि त्या अर्थाचा अंत पाहाणें सोडून देतों. साऱ्या मानवी जीवनाचें कोडें उकलण्याचें काम तत्त्वज्ञांचें. मी आपला उमर खय्यामच्या

"पण वाद घालुं दे त्या शास्त्र्यांस हटेल
जाऊं दे प्रश्न जर विश्वाचा न सुटेल"

या ओळी गुणगुणत बसणें अशा वेळीं पसंत करतों.

मानवी जीवनाला कुणी कुणी उद्यानाची उपमा देतात. पण या उद्यानाचा उपयोग काय अन् त्याच्या टोंकाशीं काय आहे हें पाहाण्याची धडपड मी नाहीं करीत! आपण कुठून आलों, कां आलों, कुठें जाणार— असल्या विचारांत एकचित्त होऊन, माना उंचावून, दूरच्या टोंकांकडे नजर टाकण्याची यातायात आपण करूं लागलों कीं जवळपास असलेल्या गुलाबमोगरींच्या नयनाल्हादक सौंदर्याचा अन् मोहक सुवासाचा आस्वाद घेण्याची संधि आपण गमावणार नाहीं का? या उद्यानाचा झांपा बंद व्हायची वेळ आली कीं तो कुठेंतरी लपून बसलेला "बडा रखवालदार" अचानक आपल्याला निरोप देईल कीं!!

REFBK-0006125
क्र. ६१२५

# पु. आ. चित्रे

## एक भावाञ्जली

मी चोरून इकडेतिकडे बघितलें. माझ्या, डाव्या-उजव्या बाजूला, समोर, सगळीकडे औषधासाठीं आलेले रुग्ण लोक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांची ही गर्दी जमलेली होती. त्यापैकीं नित्य त्या पवित्र स्थळीं दृष्टिभेट होण्यामुळें ज्यांना मी व जे मला ओळखीत होते असे कितीतरी असतील. आणि म्हणून तर मला जास्तच संकोचल्यासारखें होऊं लागलें. पण अखेर मी केलाच मनाचा हिय्या, आणि अगदीं एकादें आवश्यक कटु कर्तव्य करावें लागत आहे अशा लटक्या आविर्भावानें पायांतील बूट काढले आणि त्यांच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पाहणाऱ्या त्या काळ्या; मळकट, बूटपॉलीश करणाऱ्या छोकऱ्याकडे केले—किती उत्सुकतेनें त्यानें त्यांवर झेंप टाकली म्हणून सांगूं !

गळ्यांत एक मोडकीतोडकी पेटी, डाव्या हातांत पृथ्वीवरील जल व भूपृष्ठ यांच्या प्रमाणांत लांकडी भाग व केंस असलेला एक ब्रश—ब्रस्, या भांडवलावर उजव्या हातानें आणि चेहऱ्यावरील आविर्भावानें तुम्हां-आम्हांला आपल्या पादत्राणांची मलीनता काकुळतीनें पटवून देणाऱ्या या मजेदार व्यक्तीकडे तुम्ही कधी नीट-नीट पाहिलें आहे का ?

जेमतेम ७-८ च वय असेल त्याचें—ज्या वयांत तुम्हां-आम्हांला कपडे घालायलाही मोठ्या माणसांचें सहाय्य लागत असे—पण याच खेळण्याच्या, रडण्याच्या, हट्ट करण्याच्या, कोंवळ्या वयांत ही मलीनवसना बालमूर्ति चार पैसे कमविण्यासाठीं घराबाहेर पडलेली असते. आणि—आश्चर्य वाटेल तुम्हांला—त्याची कमाई खरोखरच चार किंवा फार तर सहा पैशांपलीकडे जात नाहीं. अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या संशोधनानंतरच मी हें अधिकृत विधान करतों आहे. आणि या हास्या-स्पद कमाईचें—म्हणजे कमाईच्या हास्यास्पदतेचें—सारें श्रेय रस्त्यांतून नाकासमोर चालण्याचा अभिमान बाळगणाऱ्या ‘ स्वे स्वे कर्मण्यभिरताः ’ अशा–किंवा असें भासविणाऱ्या–तुम्हां-आम्हां शिष्ट लोकांनाच असतें.

"कुठलें पॉलीश आहे रे तुझ्याजवळ?" आमचे व्यवहारदक्ष मित्र विचारतात, "'कोब्रा' छाप आहे कीं नाहीं अं?—छे, मग नको जा—"

"अहो, कसले लेकाचे पॉलीश करतात हे!" आमचे दूरदर्शी स्नेही उद्गारतात, "—लुच्चे साऱ्या मुलुखाचे! अहो, चार दिवस तरी टिकतें का हें पॉलीश? सगळ्यांत उत्तम म्हणजे बेहत्तर आहे अर्धा आणा गेला तर, पण दुकानांतून करून घ्यावें नाहींतर आपलें घरीं हातानें—"

'कोब्रा' छापाचा उत्कृष्टपणा, दुकानी पॉलीशचा टिकाऊपणा किंवा घराऊ पॉलिशांतील स्वावलंबीपणा यांपैकीं कशाबद्दलच माझा मतभेद नाहीं. मलाही हें सारें अगदीं पटतें; पण मी जेव्हां अशा एखाद्या छोकऱ्याला पॉलीशसाटीं ताबडतोब बूट काढून देतों, तेव्हां कधींच कांटेकोरपणें त्याच्या बूट पॉलीशची सफाई, टिकाऊपणा, डबीवरील छाप यांची विचक्षणा करीत बसत नाहीं. मला तर हें सारें एकाद्या विनोदगर्भ घटनेकडे गांभीर्याच्या कोटीबुद्धी चष्म्यानें पाहण्याइतकेंच विसंगत वाटतें.

मी जो एक पैसा त्याला देतों (आणि खरेंच सांगा, या बिदागींत उत्कृष्ट बूटपॉलीश मिळणें शक्य तरी असतें का?) तो पराकाष्ठेच्या निरपेक्षतेनें—दानधर्मांतील दुव्याची आशा किंवा देवालयांतील कामना-पूर्तीची आकांक्षा या दोन्हींपासूनही अलिप्त अशा निरपेक्षतेनें देत असतों. माझ्या मनांत त्या वेळीं केवळ आदर, प्रेम, कौतुक यांची संमिश्र भावनाच उचंबळत असते. तो तांब्याचा एक तुकडा म्हणजे निव्वळ दयेवर जगणारा याचक आणि स्वकष्टानें मीठभाकरी मिळविणारा मजूर या दोहोंमधील त्या हृदयस्पर्शी दुव्यापुढें—जीवनसंग्रामांत अकालीं झेंप टाकणाऱ्या त्या बाल-अभिमन्यूपुढें—मी वाहिलेली एक चिमुकली भावाञ्जली असते!

Gents' Outfitter

# Maestro

PRO
D. B. Deolekar
D.M.T.C.A.,
LONDON.

*A Trial Solicited!*

*Moderate Rates!!*

DANDIA BAZAR,
BARODA.

# विक्रम टॅब्लेट्स्

(रजिस्टर्ड)

जुलाब व मुरडा न होतां शौचास साफ होण्यासाठीं व मलावरोधावर या वड्यांचा फार उपयोग होतो. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत देतां येतात थोड्या प्रमाणांत रोज अगर एक दिवसाआड वापरल्यास पोटांत गुबारा न धरतां नियमित शौचाची संवय लागते. ती लागल्यावर पुढें बंद कराव्यात. इतर औषधांप्रमाणें ह्या नेहमीं घेण्याची संवय जडत नाहीं. नियमित शौचास साफ झाल्यानें प्रकृति निकोप राहून भावी आजारांची धास्ती रहात नाहीं. सर्व मदार आपले शरीरावर असल्यामुळें वेळींच उपयोग करावा.

**सूचनाः**—जड कोठ्यामुळें एक दिवस लागू न पडल्यास दुसरे दिवशीं तेवढेंच प्रमाण ठेवणें. प्रमाणपत्र बाटलीसोबत.

**ट्रायल पॅकेट १ आणा, २५ चे बाटलीस ६ आणे, १०० चे बाटलीस १। रु.**

पोस्ट खर्च निराळा.

तयार करणार : **विक्रम फार्मसी, बडोदें.**

सोल एजन्ट्स् : **मराठे ब्रदर्स, केमिस्ट्स्, बडोदें.**

मुंबई स्टॉकिस्ट्स् : **माधव एजन्सी, गिरगांव रोड, मुंबई.**

*ठिकठिकाणीं मेहनतू एजंट व स्पेशल एजंट पाहिजे आहेत !*

# जनतेची सेवा हेंच आमचें ध्येय !

★ स्त्रियांच्या विम्यांचें अद्वितीय वैशिष्ट्य !
★ स्त्रियांसाठीं स्वतंत्र विमाकोष्टकें !
★ प्रसूतिप्रसंगीं अत्युपयोगी मॅटर्निटी बेनिफिटची योजना !
★ घर बांधण्यासाठीं किंवा विकत घेण्यासाठीं विम्याच्या पूर्ण रकमेचें कर्ज !
★ अपंगपणाबद्दल हप्ता भरण्याची माफी !

या व इतर आकर्षक योजना फक्त

# लॉंग-लाइफ

## इन्शुरन्स कं., लिमिटेड.

या संपूर्ण स्वदेशी व मजबूत आर्थिक पायावर आधारलेल्या कंपनींतच आपल्याला आढळतील !

मॅनेजिंग एजंटस् :
लक्ष्मीरोड, बुधवार, पुणें.

चिफ एजन्टस् फॉर गुजराथ अँन्ड काठियावाड :
मेसर्स शेवडे अँन्ड को.,
खारीबाव, बडोदें.

*मुख्य कचेरीसाठीं कंपनीची भव्य इमारत तयार होत आहे !*

*Here is a Charter of your Economic Freedom :*

# BOMBAY BARODA LIFE POLICY

**Means a MAGNA CHARTA of your Economic Emancipation.**

**Safety & Stability are the Key-notes of BOMBAY BARODA'S Continuous Progress**

## Brilliant Quinquennial Bonus :

| | |
|---|---|
| ENDOWMENT | Rs. 50/-per Rs. 1000/- |
| WHOLE LIFE | Rs. 60/-per Rs. 1000/- |

# BOMBAY BARODA ASSURANCE COMPANY LIMITED.

**ESTABLISHED 1925.**

**Head Office:—BARODA.**

Applications from influential ladies & gentlemen are cordially invited for representation.

Apply to:-SUPERINTENDENT OF AGENCIES OFEICE,
KERMANI BUILDING, HORNBY ROAD,
FORT, BOMBAY.